## श्री. क्षेत्र तुळजापूर मंदिर, मंदिर परिसर व शहर विकास कार्यक्रम
## दिनांक १२/०२/२००९, रोजी सर्कीट हाऊस तुळजापूर येथे सपंन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

श्रीक्षेत्र तुळजापूर मंदिर, मंदिर परिसर व शहर विकासाच्या रू.३१५ कोटी किंमतीच्या आराखडयाबाबत, तुळजापूर विकास प्राधिकरणाची आढावा बैठक, गुरूवार दिनांक १२/०२/२००९ रोजी सर्कीट हाऊस तुळजापूर येथे मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, तुळजापूर विकास प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

बैठकीच्या प्रारंभी मा. जिल्हाधिकारी यांनी मा. ना. श्री. मधुकरराव चव्हाण, अध्यक्ष, मराठवाडा वैधानिक विकास मंडळ औरंगाबाद व मा. सौ साधना साखरे, अध्यक्षा, नगर परिषद तुळजापूर यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले.

मा. जिल्हा नियोजन अधिकारी तथा सदस्य सचिव, तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी बैठकीचे सुत्रसंचलन करून, खालील विषयावर चर्चा होणे आवश्यक असल्याचे नमुद करून मा. अध्यक्षांच्या परवानगीने बैठकीच्या कामकाजास सुरूवात केली.

१: आराखडा तयार करणेबाबत संबंधितांना सुचना देणे.
२: प्राधिकरण कार्यालय स्थापना व कर्मचारी नियुक्तीबाबत.
३: तुळजापूर शहरातील जनतेच्या हारकती मागविणे, जागा भूसंपादन करणे
४: भाग एक मधील कामांचे अंदाजपत्रके तयार करणे व त्यास प्रशासकीय मान्यता देणे
५: भाग एक मधील कामासाठी व भूसंपादनासाठी शासनाकडे निधीची मागणी करणे.

तुळजापूर-सोलापूर हा राष्ट्रीय महामार्ग तुळजापूर पासुन ५ किमी पर्यंत विकसीत करावयाचा असुन सदरील रस्ता विशेष मार्ग प्रकल्प यांच्या अधीनस्त आहे. याबाबत भूसंपादनाची आवश्यकता असल्यास त्याची कार्यवाही तातडीने करून, तसा अहवाल सादर करणेबाबत बाबत मा. जिल्हाधिकारी यांनी कार्यकारी अभियंता, विशेष मार्ग प्रकल्प यांना सुचित केले असता, या रस्त्याच्या विकासासाठी जागा ताब्यात असुन भूसंपादन करणेची आवश्यकता नाही. व तसेच जागेवरील असलेली अतिक्रमने तातडीने काढुन टाकण्यात येतील असे संबंधितानी सांगितले.

तुळजापूर शहरातील प्रमुख रस्ते, अस्तीत्वात असलेल्या पाण्याच्या जुन्या पाईपलाईन काढून टाकणे व त्याऐवजी नवीन पाइपलाइन टाकणे यासाठी व भूयारी गटारी, शहर हद्दीतील प्रमुख रस्त्यांसाठी निधी प्राप्त करणे आणी या बाबींसाठी आवश्यक भूसंपादनाची कार्यवाही तातडीने करून, तसा अहवाल प्राधिकरणास सादर करावा अशा सुचना मा. ना. श्री. मधुकरराव चव्हाण, अध्यक्ष, मराठवाडा वैधानिक विकास मंडळ औरंगाबाद यांनी सर्व संबंधित कार्यान्वयीन यंत्रणांना दिल्या. आराखडा शासनास सादर करणेस विलंब होत असल्याची बाब मा. सौ. साधना साखरे, अध्यक्षा, नगर परिषद तुळजापूर यांनी बैठकीत निदर्शनास आणुन दिली. असता, श्रीक्षेत्र तुळजापूर मंदिर, मंदिर परिसर व शहर विकासासाठी, क्रिसील रीस्क ॲन्ड इनफ्रास्टक्चर सोलेशन लिमीटेड, हैद्राबाद यांनी केलेल्या सर्वेक्षणाचा अहवाल व प्लॅन दीड महिण्यात सादर करावा व तसेच आपले कार्यालय आठ दिवसात तुळजापूर शहरात स्थापन करून जबाबदार अधिक-याची नियुक्ती करावी अशाही सुचना मा. ना. श्री. मधुकरराव चव्हाण, व मा. जिल्हाधिकारी यांनी संबंधितांना दिल्या.

तुळजापूर विकास प्राधिकरणाची अंमलबजावणी चांगल्या प्रकारे व्हावी यासाठी पाठपुरावा करण्यासाठी एक उपसमिती स्थापन करून, उपसमितीस मान्यता मिळणेचा प्रस्ताव व प्रस्तावित आराखडयातील भाग क्र.०१ मधील विकासकामांसाठी रू.१८८ कोटी ८३ लाख ८८ हजार निधी अर्थसंकल्पित करून वितरीत करणेबाबत शासनास प्रस्ताव सादर करावा अशा अशा सुचना मा. जिल्हाधिकारी यांनी जिल्हा नियोजन अधिकारी यांना दिल्या. माहे डिसेंबर २००८ च्या हिवाळी अधिवेशनामध्ये निधी मंजूर करण्यात आल्याची घोषणा झालेली असुन, पटलावर ठेवलेल्या याविषयाच्या माहितीची प्रत नगर रचनाकार यांनी नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडुन प्राप्त करावी अशा सुचना मा. जिल्हाधिकारी यांनी संबंधितास दिल्या. तुळजापूर-बार्शी व तुळजापूर-उस्मानाबाद हा ५ किमी रस्ता विकसीत करणेकरिता जागा उपलब्ध असुन भूसंपादनाची आवश्यकता नसल्याने, या कामास खासबाब म्हणुन मान्यता देण्याचा प्रस्तावही शासनास सादर करावा अशा सुचना मा. जिल्हाधिकारी यांनी जिल्हा नियोजन अधिकारी तथा सदस्य सचिव, यांना दिल्या.

श्रीक्षेत्र तुळजापूर मंदिर, मंदिर परिसर व शहर विकास आराखडा प्राप्त होताच नगर रचनाकार, यांनी त्यास प्रसिध्दी देवून जनतेच्या हारकती मागवाव्यात आणि पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी अशा सुचना, मा. जिल्हाधिकारी यांनी नगर रचनाकार, उस्मानाबाद यांना दिल्या. तेव्हा सर्वेक्षण करणा-या कंपनीने आराखडयातील सर्व

कार्यान्वयीन यंत्रणांशी व्यक्तीशा संपर्क साधुन त्यांच्या सल्ल्यानुसार आराखडा तयार करावा अशी विनंती नगर रचनाकार यांनी केली. व तसेच आराखडयातील कामे संबंधित शासकीय / निमशासकीय यंत्रणानी करण्यास शासनाने मान्यता दिली आहे ही बाब विचारात घेवून, सर्व संबधितांनी स्वतंत्ररित्या प्लॅन तयार करून सादर करावा अशीही विनंती केली असता त्यास मा जिल्हाधिकारी यांनी मान्यता दिली.

सन २००८-०९ या वित्तीय वर्षात तुळजापूर विकास प्राधिकरणासाठी रू.५.०० कोटी निधी मंजुर आहे. सदरील निधीतुन, मंदिर संस्थानच्या जागेत धर्मशाळा बांधणे व सोलापूर-तुळजापूर-उस्मानाबादकडे जाणारा बाहयवळण रस्ता करणे या दोन कामांचा विकास करण्याचे प्रस्तावित आहे. सदरील कामासाठी जागा उपलब्ध असुन भूसंपादनाची आवश्यकता नाही. तरी या दोन कामास मान्यता मिळावी असा मुद्दा मा. जिल्हाधिकारी यांनी उपस्थितीत केला असता, बैठकीस उपस्थितीत असलेल्या प्राधिकरणातील सर्व सदस्यांनी एकमताने मान्यता दिली. या दोन कामांस खास बाब म्हणुन मान्यता मिळणेचा प्रस्ताव शासनास सादर करावा अशा सुचना जिल्हा नियोजन अधिकारी यांना दिल्या.

श्रीक्षेत्र तुळजापूर मंदिर, मंदिर परिसर व शहर विकास आराखडयास मान्यता मिळेल या अटीच्या अधीन राहुन, मुख्याधिकारी नगर परिषद तुळजापूर यांनी तुळजापूर शहर हद्यीतील विकासकामे करणेसाठी लागणा-या जागेची भूसंपादानाची कार्यवाही तातडीने करावी व तसा अहवाल प्राधिकरणास सादर करावा अशा सुचना मा. जिल्हाधिकारी यांनी मुख्याधिकारी नगर परिषद तुळजापूर यांना दिल्या.

श्रीक्षेत्र तुळजापूर मंदिर, मंदिर परिसर व शहर विकास आराखडयाची अंमलबजावणी करणेसाठी शासनाने तुळजापूर विकास प्राधिकरण स्थापन केले असुन यात्रास्थळांच्या विकासासाठी विशेष कार्यक्रम या लेखाशिर्षाखाली १०० टक्के अनुदान शासनाकडुन टप्प्या टप्प्याने उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सध्यस्थितीत प्राधिकरणासाठी होणारा सर्व खर्च जिल्हा नियोजन समितीच्या आकस्मिक खर्चातुन भागविण्यात येत आहे. ही बाब विचारात घेऊन प्राधिकरणासाठी आकस्मिक खर्चाची तरतुद मंजूर करावी, व तसेच प्राधिकरणासाठी आस्थापना स्थापन करून, त्यासाठी आवश्यक असणारे अधिकारी / कर्मचारी यांची नियुक्ती करावी अशी विनंती जिल्हा नियोजन अधिकारी तथा सदस्य सचिव यांनी केली असता, आराखडयाच्या एक टक्का रक्कम प्राधिकरणाच्या आकस्मिक खर्चासाठी उपलब्ध करून देणेबाबत, शासनास प्रस्ताव पाठवावा अशा सुचना मा. जिल्हाधिकारी यांनी संबंधितांना दिल्या.

वरील प्रमाणे आवश्यक त्या सुचना सर्व संबंधितांना देवून तुळजापूर विकास प्राधिकरणाची पुढील आढावा बैठक शुक्रवार दिनांक २७/०२/२००९ रोजी आयोजित केली आहे. याची व्यक्तीशा नोंद घ्यावी व तसेच जे कार्यालय प्रमुख आजच्या बैठकीस उपस्थितीत नव्हते, त्यांनी यापुढील प्राधिकरणाच्या बैठकीस स्वतः उपस्थित रहावे प्रतिनिधी पाठविल्यास आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल अशा सुचना देवून बैठक संपल्याचे जाहीर केले.

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
तुळजापूर विकास प्राधिकरण,
जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद.

**श्री. क्षेत्र तुळजापूर मंदिर, मंदिर परिसर व शहर विकास कार्यक्रम**

**दिनांक २८/०२/२००९, रोजी सर्कीट हाऊस तुळजापूर येथे सपंन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.**

श्री क्षेत्र तुळजापूर मंदिर, मंदिर परिसर व शहर विकासाच्या रू.३१५ कोटी किंमतीच्या आराखडयाबाबत, तुळजापूर विकास प्राधिकरणाची आढावा बैठक, शनिवार दिनांक २८/०२/२००९ रोजी सर्कीट हाऊस तुळजापूर येथे संपन्न झाली. बैठकीच्या प्रारंभी मा. जिल्हाधिकारी यांनी मा. ना. श्री. मधुकरराव चव्हाण, अध्यक्ष, मराठवाडा वैधानिक विकास मंडळ औरंगाबाद व मा. सौ साधना साखरे, अध्यक्षा, नगर परिषद तुळजापूर यांचे शब्द सुमनाने स्वागत केले.

मागील बैठकीचे इतिवृत्त माहितीस्तव व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव सर्व संबंधिताना दिनांक १६/०२/२००९ रोजीच्या पत्रान्वये पाठविण्यात आलेले आहेत. तरी सदरील बैठकीच्या इतिवृत्तास अंतिम मान्यता देवून इतिवृत्त कायम करावे अशी विनंती मा. अध्यक्ष महोदयांना केली असता त्यास सर्वानुमते मान्यता देवून इतिवृत्त कायम केले.

जिल्हा नियोजन अधिकारी तथा सदस्य सचिव, तुळजापूर विकास प्राधिकरण या बैठकीसाठी उपस्थित राहणार नसल्याची बाब मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष यांनी निदर्शनास आणुन बैठकीच्या कामकाजास सुरूवात केली.

दिनांक १२/०२/२००९ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत मा. अध्यक्ष महोदयांनी दिलेल्या सुचनास अनुसरून जिल्हा नियोजन समिती कार्यालयामार्फत, तुळजापूर विकास प्राधिकरणाची अंमलबजावणी चांगल्या प्रकारे व्हावी यासाठी पाठपुरावा करण्यासाठी एक उपसमिती स्थापन करणे. प्राधिकरणाच्या आकस्मिक खर्चासाठी तरतुद उपलब्ध करणे. प्रस्तावित आराखडयातील भाग क्र.०१ मधील विकासकामांसाठी रू.१८८ कोटी ८३ लाख ८८ हजार निधी अर्थसंकल्पित करून वितरीत करणे. माहे डिसेंबर २००८ च्या हिवाळी अधिवेशनामध्ये रू. ५.०० कोटी मंजूर असलेल्या निधीतुन खालील कामे करण्यास परवानगी मागणे बाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आल्याची बाब सर्वाच्या निदर्शनास आणुन दिली.

(रू. लाखात)

| अ. क्र | कामाचे नांव | विकास कामांची किंमत | भूसंपादन किंमत | एकुण किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | **कार्यकारी अभियंता, विशेष मार्ग प्रकल्प** | | | |
| १ | सोलापूर-धुळे रा.म.मा.क्र.२११ किमी.४२/३६५ ते ४३/२०० मधील राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरण करणे (तुळजापूर ते उस्मानाबाद बाजु भाग २) | ३६२.२५ | ०.०० | ३६२.२५ |
| २ | सोलापूर-धुळे रा.म.मा.क्र.३५/००ते ३९/७०० मधील राष्ट्रीय महामार्गाचे रस्ता दुभाजकासह चौपदरीकरण करणे व तुळजापूर घाटातील (किमी.३९/७०० ते ४१/२२०) राष्ट्रीय महामार्गाची सुधारणा करणे (तुळजापूर ते सोलापूर बाजु भाग १) | २३५३.०० | ०.०० | २३५३.०० |
| | **एकुण विशेष मार्ग प्रकल्प** | **२७१५.२५** | **०.००** | **२७१५.२५** |
| | **कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग** | | | |
| १ | तुळजापूर शहरासाठी बाहयवळण रस्ता तयार करणे | १३८५.०० | ०.०० | १३८५.०० |
| २ | बार्शी तुळजापूर रस्त्याची सुधारणे करणे (तीनपदरी किमी.४२/०० ते ४९/००-७.०० किमी.) | ३५०.०० | ०.०० | ३५०.०० |
| | **एकुण कार्यकारी अभियंता सां.बा.वि** | **१७३५.००** | **०.००** | **१७३५.००** |
| | तुळजाभवानी मंदिर संस्थान | | | |
| १ | तुळजा भवानी मंदिर परिसरात १०८ खोल्याचे भक्तनिवास बांधणे | ३५०.०० | ०.०० | ३५०.०० |
| | **एकुण तुळजाभवानी मंदिर** | **३५०.००** | **०.००** | **३५०.००** |
| | **एकुण सर्व** | ४८००.०० | ०.०० | ४८००.०० |

मा. अध्यक्ष महोदयांच्या सुचनानुसार विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई रजि.नं.एमएच/ एमआर/ साऊथ-२२९/२००६-०८, दिनांक ०६/०१/२००९ अन्वये, तुळजापूर प्राधिकरण अधिनियम २००८ हा सन २००९ क्रमांक ३ राजपत्रात प्रसिध्द झालेल्या अधिनियमाचे बैठकीत वाचन करण्यात आले.

तुळजापूर विकास प्राधिकरणाच्या बैठकीस सर्व कार्यालय प्रमुखांनी स्वतः उपस्थित राहणेबाबत लेखी व दुरध्वनीद्वारे कळविण्यात आले असताना सुध्दा ते गैरहजर असल्याबाबत, मा. ना. श्री. मधुकरराव चव्हाण, अध्यक्ष, मराठवाडा वैधानिक विकास मंडळ, औरंगाबाद, तथा सदस्य तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी नाराजी व्यक्त करून, जे कार्यालय प्रमुख बैठकीस गैरहजर आहेत त्यांचा लेखी वस्तुनिष्ठ खुलासा मागवावा व यापुढील बैठकीस स्वतः उपस्थितीत राहण्याची दक्षता घेणेबाबत सर्व संबंधितांना सुचना देण्यात देवून, अधिक्षक अभियंता, उस्मानाबाद पाटबंधारे विभाग, उस्मानाबाद यांना तुळजापूर विकास प्राधिकरणाच्या पुढील बैठकांसाठी विशेष निमंत्रीत म्हणुन बोलविण्यात यावे अशाही सुचना जिल्हा नियोजन अधिकारी तथा सदस्य सचिव यांना दिल्या.

तुळजापूर शहरात नविन पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकणे, भुमिगत विद्युत केबल टाकणे, भुमिगत गटारी करणे, व रस्ता रूंदीकरण करताना विद्युत खांब इतरत्र लावणे ही कामे करित असताना, मुख्याधिकारी नगर परिषद, तुळजापूर, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जिवन प्राधिकरण, अधिक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपणी, अधिक्षक अभियंता, व कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी परस्परांशी समन्वय साधुन कामांचे योग्य नियोजन करून आराखडयातील कामे करावीत. व सर्व संबधित कार्यालय प्रमुखानी आपल्या विभागाशी संबंधित असणा-या कामांचे सर्वेक्षण करून तसा अहवाल पुढील प्राधिकरणाच्या बैठकीत सादर करावा अशा सुचना, मा. ना. श्री. मधुकरराव चव्हाण, व मा. जिल्हाधिकारी यांनी सर्व संबंधितांना दिल्या.

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक तिक्षेवि-२००८ प्र.क्र.१३७/नवि-१६, मंत्रालय, मुंबई दिनांक ३१/१०/२००८ मधील **"परिशिष्ट-क बाब अ "** मध्ये नमुद केले प्रमाणे तुळजापूर नगर पालिकेच्या हद्दीच्या सभोवतालच्या ५ कि.मी. परिसराच्या क्षेत्रासाठी, महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियमाच्या तरतुदीखाली विकास आराखडा तयार करणे व त्यास शासनाची मान्यता घेणे याबाबत मा. सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याशी दुरध्वनीद्वारे चर्चा केली असता, तुळजापूर विकासाचा रू.३१५ कोटी किमतीचा सादर केलेल्या आराखडयास वरील शासन निर्णयाद्वारे विशेष बाब म्हणुन दिलेली असल्याने पुन्हा विकास आराखडा मान्यतेसाठी शासनास सादर करण्याची काहीही आवश्यकता नाही . ही बाब मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी बैठकीत सर्वांच्या निदर्शनास आणुन देवून, भाग क्र.०१ मध्ये प्रस्तावित केलेल्या कामांचे अंदाजपत्रके, नकाशे, आराखडे, व अनुषंगीक दस्तदेवजासह (देखभाल दुरूस्ती प्रमाणपत्र, जागा उपलब्ध असल्याचे प्रमाणपत्र, आठ अ व सात बारा उतारा, नगर परिषद ठराव, नाहरकत प्रमाणपत्र, ई) अंदाजपत्रके दोन

प्रतीत प्राधिकरणास सादर करण्यासाठी तयार करावीत अशा सुचना सर्व कार्यान्वीयन यंत्रणाना मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी दिल्या.

तुळजापूर शहर विकास आराखडयामधील भाग क्र.०१ मध्ये मुख्याधिकारी नगर परिषद तुळजापूर यांनी प्रस्तावित केलेल्या १: भवानी मंदिर महाद्वार समोरील मोकळया जागेचा विकास करणे, २: उस्मानाबाद रोड-लातुर रोड व नळदुर्ग रोड नवीन वळण रस्ता भूसंपादनासह विकसीत करणे, ३: शहरात विविध ठिकाणी वाहनतळ बांधणे या कामाची जागा निश्चिती झालेली नाही. असा मुद्या नगर रचनाकार तथा सदस्य तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी उपस्थित केला असता. अ.क्र. २ च्या कामांचे सर्वेक्षण करून, अहवाल पुढील बैठकीत सादर करण्याच्या सुचना कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग उस्मानाबाद यांना दिल्या व तसेच अ.क. १ आणि ३ च्या मुद्याबाबत पुढील बैठकीत चर्चा करण्यात येईल असे मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष यांनी संबधितांना सुचित केले.

तुळजापूर शहरात येणा-या प्रमुख राज्य मार्गावर नयनरम्य कमानी बांधण्यासाठी त्यांचे सुदर डिझाईन तयार करावे अशा सुचना कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प विभाग व कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना देवून, तुळजापूर-नळदुर्ग रस्ता ५.कि.मी विकास करणे व तुळजापूर-लातुर रस्ता ५.किमी. विकास करणे या कामांच्या संदर्भात, होणा-या खर्चाची रक्कम संबंधित ठेकेदाराकडुन वसुल करावी अशाही सुचना, मा. ना. श्री. मधुकरराव चव्हाण यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना दिल्या. व तसेच तुळजापूर - मंगरूळ- इटकळ-अक्कलकोट रस्त्याची सुधारणा करणे (तीनपदरी) कि.मी. ०/०० ते ३९/६०० (३९.६० किमी) या कामास मराठवाडा विकास कार्यक्रमातंर्गत निधी मंजुर झालेला असल्याने सदरील काम आरखडयातुन कमी करण्यात यावे व या कामावरील रक्कम रू.१९८०.०० लाख आराखडयातील इतर कामावर किंवा नविन पर्यायी कामावर खर्च करण्यास परवानगी मिळावी असा प्रस्ताव शासनास सादर करावा अशा सुचना मा. ना. श्री. मधुकरराव चव्हाण यांनी देवून याचा पाठपुरावा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी करावा असे सुचित केले.

ग्रामीण रूग्णालय तुळजापूर विस्तारासाठी जागा भूसंपादन करणेचा प्रस्ताव तातडीने संबधित विभागास सादर करावा, अशा सुचना जिल्हा शल्य चिकित्सक यांना मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष महोदयांनी दिल्या असता, याबाबत लवकरच कार्यवाही करण्यात येईल असे संबंधितांनी सांगितले. यासाठी तुळजापूर शहराच्या सुधारीत प्रारूप विकास योजनेत रूग्णालयाच्या विस्तारासाठी जागा राखीव ठेवली असल्याचे नगर रचनाकार तथा संदस्य यांनी निदर्शनास आणुन दिले व त्याप्रमाणे भूसंपादनाचा प्रस्ताव आरोग्य विभागाने सादर करावा असा सल्ला दिला.

तुळजापूर शहरातील विजेचा प्रश्न, व नगर परिषदेचा विद्युत देयकाचा भार कमी करण्यासाठी सौर उर्जेचा प्रकल्प राबविण्यासाठी तसा प्रस्ताव शासनास सादर करावा अशा सुचना मा. ना. श्री. मधुकरराव चव्हाण यांनी मुख्याधिकारी नगर परिषद तुळजापूर यांना देवून, सोलापूर-तुळजापूर-उस्मानाबाद

या बाहयवळण रस्त्यावर मंदिराकडे जाणा-या चौकात किंवा भारतीबुवाचे मठाजवळ वाहनतळ बांधणेसाठी जागा भूसुपादन करण्याची कार्यवाही करावी अशा सुचना संबधितास दिल्या.

तुळजापूर शहरात येणा-या भाविकांच्या सोईसाठी सुलभ शौचालय बांधताना स्त्रीया करिता व पुरूषाकरिता स्वतंत्र स्नानगृह, बाथरूम, शौचालये बांधण्यात यावेत व तसेच संलग्न एक क्लोकरूमचे बांधकामही करावे, अशा सुचना मा. ना. श्री. मधुकरराव चव्हाण यांनी, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जिवन प्राधिकरण विभाग व मुख्याधिकारी नगर परिषद तुळजापूर यांना दिल्या.

मुख्याधिकारी नगर परिषद तुळजापूर यांनी तुळजापूर शहर हद्यीतील विकासकामे करणेसाठी लागणा-या जागेची भूसंपादानाची कार्यवाही, मोजमापे तातडीने करावी व तसा अहवाल प्राधिकरणास सादर करावा अशा सुचना मा. जिल्हाधिकारी यांनी मुख्याधिकारी नगर परिषद तुळजापूर यांना दिल्या.

मुख्याधिकारी नगर परिषद तुळजापूर यांनी असे निदर्शनास आणले की, भवानी मंदिर ते राष्ट्रीय महामार्ग क्र.२११ रस्ता रूंदीकरण व विकास (९ मीटरचे १२ मीटर मध्ये भूसंपादनासह रूपातंर), एस.टी स्टॅन्ड ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक १२ मी. रस्त्याचे २० मी. रस्त्यात भुसंपदनासह रूपातर करणे, व भवानी रोड ते घाटशिळ रोडरस्ता १२ मी. रस्त्याचे १८ मी. मध्ये रूपातर करणे या कामांचे काही प्रमाणात भूसंपादन यापूर्वीच झाले आहे. मात्र निवाडयाप्रमाणे नगर भूमापन कार्यालयात क्षेत्रात दुरूस्ती झालेली नाही. ते क्षेत्र अद्याप मुळ मालकाच्या नांवे आहे. याबाबत मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष यांनी आदेशीत केले की, भूसंपादन अधिनियमाच्या तरतुदीनुसार क्षेत्र दुरूस्तीबाबत उप विभागीय अधिकारी उस्मानाबाद यांनी भूमी अभिलेख कार्यालयास तसे आदेश काढावेत व या प्रकरणाचा मुख्याधिकारी नगर परिषद तुळजापूर यानी पाठपुरावा करावा अशाही सुचना दिल्या.

अध्यक्ष नगर परिषद तुळजापूर तथा सदस्य तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी असे निदर्शनास आणले की, जिल्हा परिषदेच्या जुन्या दवाखाण्याच्या जागेवर भूसंपादन करून नाटयगृह, दुकानकेंद्र, सुलभ शौचालय बांधणे या कामाचा समावेश प्राधिकरणाच्या मंजूर कामामध्ये झालेला आहे. तथापि पोलिसासाठी निवास बांधणे या कामासांठी पोलिस विभागाची मागणी व जिल्हा परिषदेचा स्वतःचा एखादा प्रस्ताव या जागेवर असल्याने, नाटयगृह बांधणेसाठी या जागेऐवजी पर्यायी जागा नगर परिषद उपलब्ध करील. यावर मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्षांनी सुचित केले की, नगर परिषदेने असे फेर बदलाचे प्रस्ताव प्राधिकरणाच्या मंजुरीसाठी सादर करावेत म्हणजे प्राधिकरणामार्फत तपासणी करून शासनाकडे शिफारस केली जाईल.

वरील प्रमाणे मागदर्शन करून, व आवश्यक त्या सुचना सर्व संबंधितांना देवून तुळजापूर विकास प्राधिकरणाशी पत्र व्यवहार करताना **जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, तुळजापूर विकास प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद या पत्यावर करावा अशाही सुचना सर्व संबंधितांना दिल्या.**

तुळजापूर विकास प्राधिकरणाची पुढील आढावा बैठक दिनांक १२/०३/२००९ किंवा १३/०३/२००९ रोजी आयोजित करण्यात येईल याची व्यक्तीशा नोंद घ्यावी व तसेच जे कार्यालय प्रमुख आजच्या बैठकीस उपस्थितीत नव्हते, त्यांनी यापुढील प्राधिकरणाच्या बैठकीस स्वतः उपस्थित रहावे प्रतिनिधी पाठविल्यास आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल अशा सुचना देवून बैठक संपल्याचे जाहीर केले.

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
तुळजापूर विकास प्राधिकरण,
जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद.

## श्री. क्षेत्र तुळजापूर मंदिर, मंदिर परिसर व शहर विकास कार्यक्रम
## दिनांक १८/०३/२००९, रोजी सपंन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

श्री क्षेत्र तुळजापूर मंदिर, मंदिर परिसर व शहर विकास आराखडयाबाबत, तुळजापूर विकास प्राधिकरणातील शासकीय / निमशासकीय सदस्य व कार्यान्वयीन यंत्रणाची आढावा बैठक, बुधवार दिनांक १८/०३/२००९ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद येथे संपन्न झाली. बैठकीच्या प्रारंभी जिल्हा नियोजन अधिकारी तथा पदसिध्द सदस्य सचिव, तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी मा. जिल्हाधिकारी तथा पदसिध्द अध्यक्ष तुळजापूर विकास प्राधिकरण यांचे व सर्व उपस्थितांचे शब्द सुमनाने स्वागत केले.

श्री. क्षेत्र तुळजापूर मंदिर, मंदिर परिसर व शहर विकास कामांना लोकसभा निवडणुकीची आदर्श आचारसंहिता घोषित होण्यापूर्वीच, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक तिक्षेवि-२००८ प्र.क्र.१३७/नवि-१६, मंत्रालय, मुंबई दिनांक ३१/१०/२००८ अन्वये मान्यता प्रदान झालेली आहे. ही बाब विचारत घेऊन, प्रस्तुत आराखडयातील कामांना या कार्यालयाच्या स्तरावर प्रशासकीय मान्यता देणे, निविदा प्रसिध्द करणे, निधी वितरीत करणे व कामे सुरू करण्यास लोकसभा निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागु होणार नाही अशी या कार्यालयाची धारणा असल्याने याबाबत मुख्य निवडणुक अधिकारी, मंत्रालय मुंबई यांच्याकडुन आवश्यक ते मार्गदर्शन, मागविण्यात आलेले असल्याची बाब सदस्य सचिव यांनी बैठकीत सर्वांच्या निदर्शनास आणुन दिली.

शनिवार दिनांक २८/०२/२००९ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त माहितीस्तव व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव सर्व संबंधिताना पाठविण्यात आलेले आहेत. तरी सदरील बैठकीच्या इतिवृत्तास अंतिम मान्यता देवून इतिवृत्त कायम करावे अशी विनंती मा. अध्यक्ष महोदयांना केली असता त्यास सर्वानुमते मान्यता देवून इतिवृत्त कायम केले. व तसेच सदरील बैठकीस काही कार्यान्वयीन अधिकारी गैरहजर राहील्यामुळे संबंधितानी वस्तुनिष्ठ खुलासा सादर करणेबाबत कळविण्यात आले असताना सुध्दा अद्याप खुलासा सादर केलेला नसल्याची बाब मा. अध्यक्ष महोदयांच्या निदर्शनास आणुन दिली असता, यापुढील तुळजापूर विकास प्राधिकरणाच्या बैठकीस पूर्व परवानगी शिवाय कोणत्याही कार्यान्वयीन अधिका-यानी गैरहजर राहु नये अशा सुचना देवून, मागील बैठकीस गैरहजर असल्याबाबतचा खुलासा तातडीने सादर करणेबाबत मा. अध्यक्ष महोदयांनी सर्व संबधितांना सुचना दिल्या. व बैठकीच्या कामकाजास सुरूवात करावी अशी सुचना सदस्य सचिव यांना केली.

तुळजापूर शहरात नविन पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकणे, भुमिगत विद्युत केबल टाकणे, भुमिगत गटारी करणे, व रस्ता रूंदीकरण करताना विद्युत खांब इतरत्र लावणे या कामांचे सर्वेक्षण, केले असल्याचे मुख्याधिकारी नगर परिषद, तुळजापूर, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जिवन प्राधिकरण, अधिक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपणी, अधिक्षक अभियंता, व कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी मा. अध्यक्ष महोदयांच्या निदर्शनास आणुन दिले.

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक तिक्षेवि-२००८ प्र.क्र.१३७/नवि-१६, मंत्रालय, मुंबई दिनांक ३१/१०/२००८ मधील **"परिशिष्ट-क बाब अ "** मध्ये नमुद केले प्रमाणे तुळजापूर नगर पालिकेच्या हद्यीच्या सभोवतालच्या ५ कि.मी. परिसराच्या क्षेत्रासाठी, महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियमाच्या तरतुदीखाली विकास आराखडा तयार करून त्यास शासनाची मान्यता घेणे आवश्यक असल्याने तसा आराखाडा नगर रचनाकार, उस्मानाबाद यांनी तयार करून तातडीने प्राधिकरणास सादर करावा अशा सुचना मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी दिल्या.

भाग क्र.०१ मध्ये प्रस्तावित केलेल्या कामांचे अंदाजपत्रके, सक्षम अधिका-याच्या तांत्रीक मान्यतेसह नकाशे, आराखडे, देखभाल दुरूस्ती प्रमाणपत्र, जागा उपलब्ध असल्याचे प्रमाणपत्र, आठ अ व सात बारा उतारा, नगर परिषदेचा ठराव, नाहरकत प्रमाणपत्र, बक्षीसपत्र दानपत्र ई आवश्यक त्या दस्तऐवजासह अंदाजपत्रके दोन प्रतीत प्राधिकरणास सादर करावीत, म्हणजे लोकसभा निवडणुकीची आदर्श आचार संहिता संपल्यानंतर त्यास प्रशासकीय मान्यता देणे सुलभ होईल असे सर्व कार्यान्वयीन यंत्रणांना मा. अध्यक्ष महोदयांनी सुचना दिल्या.

तुळजापूर शहर विकास आराखडयामधील भाग क्र.०१ मधील १ः उस्मानाबाद रोड-लातुर रोड व नळदुर्ग रोड नवीन वळण रस्ता भूसंपादनासह विकसीत करणे, या कामाचे सर्वेक्षण करण्याची कार्यवाही कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग उस्मानाबाद यांनी करावी अशा सुचना मा. अध्यक्ष महोदयांनी दिल्या असता, सदरील काम मुख्याधिकारी नगर परिषद तुळजापूर यांनी प्रस्तावित केलेले आहे. परंतु सदरील काम रस्त्याचे असल्याने या कामासाठी कार्यान्वयन यंत्रणा म्हणुन मुख्याधिकारी नगर परिषद तुळजापूर यांच्या ऐवजी सार्वजनिक बांधकाम विभाग उस्मानाबाद राहील असा मुद्या कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी उपस्थित केला. या कामाबाबत नगर परिषदेकडे सक्षम कर्मचारी वर्ग नसल्याने सदरीले काम सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यामार्फतच करावे अशी विनंती मुख्याधिकारी नगर परिषद तुळजापूर यांनी मा. अध्यक्ष महोदयांना केली. नगर परिषदे मार्फत प्रस्तावित केलेल्या कामापैकी कोणती कामे करण्यात येणार नाहीत याचा ठराव घेवून या कार्यालयास सादर करावा. आणी शहरात विविध ठिकाणी वाहनतळ बांधणे या कामांची जागा निश्चित करून जागा भूसंपादनाची कार्यवाही तातडीने करावी अशा सुचना  मुख्याधिकारी नगर परिषद तुळजापूर यांना दिल्या.

तुळजापूर - मंगरूळ - इटकळ - अक्कलकोट रस्त्याची सुधारणा करणे (तीनपदरी) कि.मी. ०/०० ते ३९/६०० (३९.६० किमी) या कामास मराठवाडा विकास कार्यक्रमातंर्गत मंजूरी प्राप्त झालेली असली तरी निधी प्राप्त होण्यास बराच कालावधी लागण्याची शक्यता आहे. तरी सदरील काम श्री. क्षेत्र तुळजापूर मंदिर, मंदिर परिसर व शहर विकास आराखडयातुन कमी न करता, याच विकास आराखडयात कायम ठेवून निधी उपलब्ध करून दयावा अशी विनंती कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी केली असता, उक्त काम या कार्यक्रमातुन रद्य न करता ते कायम ठेवण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक तिक्षेवि-२००८ प्र.क्र.१३७/नवि-१६, मंत्रालय, मुंबई दिनांक ३१/१०/२००८, व विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई रजि.नं.एमएच/ एमआर/ साऊथ-२२९/२००६-०८, दिनांक ०६/०१/२००९ अन्वये, तुळजापूर प्राधिकरण अधिनियम २००८ हा सन २००९ क्रमांक ३ राजपत्रात प्रसिध्द झालेल्या आहे. अधिनियमा अन्वये व शासन निर्णयान्वये तुळजापूर विकास आराखडयातील सर्व कामे शासकीय व निमशासकीय यंत्रणांनी स्वतः करावयाची आहेत आणि या कामासाठी कोणतेही एजन्सी शुल्क अनुज्ञेय नाही. ही बाब विचारात घेऊन, श्रीक्षेत्र तुळजापूर मंदिर, मंदिर परिसर व शहर विकासासाठी, क्रिसील रीस्क ॲन्ड इनफ्रास्टक्चर सोलेशन लिमीटेड, हैद्राबाद या कंपणीची सल्लागार म्हणुन, मा. विभागीय आयुक्त यांनी केलेली नियुक्ती रद्य करण्यात यावी असे सर्वानुमते निश्चित झाले. व तसा सविस्तर प्रस्ताव मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना पाठविण्यात यावा व त्याची एक प्रत नगर विकास विभागास द्यावी अशा सुचना मा. जिल्हाधिकारी यांनी सदस्य सचिव यांना दिल्या.

ग्रामीण रूग्णालय तुळजापूर विस्तारासाठी जागा भूसंपादन करणेचा प्रस्ताव संबधित विभागास सादर करून जागा तातडीने भूसंपादन करून घ्यावी अशा सुचना मा. अध्यक्ष महोदयांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांना दिल्या .

मुख्याधिकारी नगर परिषद तुळजापूर यांनी भवानी मंदिर ते राष्ट्रीय महामार्ग क्र.२११ रस्ता रूंदीकरण व विकास (९ मीटरचे १२ मीटर मध्ये भूसंपादनासह रूपांतर), एस.टी स्टॅन्ड ते डॉं. बाबासाहेब आंबेडकर चौक १२ मी. रस्त्याचे २० मी. रस्त्यात भुसंपदनासह रूपातर करणे, व भवानी रोड ते घाटशिळ रोडरस्ता १२ मी. रस्त्याचे १८ मी. मध्ये रूपातर करणे या कामांचे निवाडयाप्रमाणे नगर भूमापन कार्यालयात भूसंपादन अधिनियमाच्या तरतुदीनुसार क्षेत्र दुरूस्तीबाबतचा प्रस्ताव, मुख्याधिकारी नगर परिषद तुळजापूर यानी उप विभागीय अधिकारी उस्मानाबाद व भूमी अभिलेख कार्यालयास सादर करून त्याचा पाठपुरावा करणेबाबत मा अध्यक्ष महोदयांनी मुख्याधिकारी नगर परिषद तुळजापुर यांना सुचना दिल्या.

मुख्याधिकारी नगर परिषद तुळजापूर यांनी फेर बदलाचे प्रस्ताव बैठकीत सादर केले असता, मा. अध्यक्ष महोदयानी असे सुचित केले की, फेर बदलाचे काही प्रस्ताव असतील तर, असे प्रस्ताव एकत्रित व एकदाच तातडीने या कार्यालयास सादर करावेत म्हणजे त्यास प्राधिकरणाची मंजूरी घेवून, अंतिम

मान्यतेसाठी शासनास सादर करण्यात येतील परंतु तद्नंतर असे प्रस्ताव सादर केल्यास ते स्वीकारले जाणार नाहीत याची व्यक्तीशः नोंद घ्यावी अशा सुचना सर्व संबंधीतांना मा. अध्यक्ष महोदयांनी दिल्या.

मुख्याधिकारी नगर परिषद तुळजापूर यांनी तुळजापूर शहर हद्यीतील विकासकामे करणेसाठी लागणा-या जागेची भूसंपादानाची कार्यवाही, मोजमापे करण्यास मागील बैठकीत सुचना दिल्या होत्या, त्याचा अनुपालन अहवाल बैठकीत सादर करणेबाबत मुख्याधिकारी, नगर परिषद तुळजापूर यांना आदेशीत केले असता, नगर परिषदेकडे अधिकारी / कर्मचारी वर्ग खुपच कमी आहे. भूसंपादानाची कार्यवाही करणे, मोजमापे करण्यास या कामासाठी नगर रचनाकार ०१, सहाय्यक नगर रचनाकार ०२, व अनुरेखक ०१ यांची आवश्यकता आहं असा मुद्या उपस्थित केला असता, तसा प्रस्ताव शासनास व संचालक, नगर रचना, कार्यालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे पाठवावा व त्याची एकप्रत प्राधिकरणास देणबाबत मा अध्यक्ष महोदयांनी मुख्याधिकारी नगर परिषद तुळजापूर यांना सुचना केल्या.

सिंदफळ येथील सर्वे नंबर २०२ येथे ३३ के.व्ही उपकेंद्र करणे या कामासाठीची जागा ही तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर यांची आहे. ती जागा उपलब्ध करून दयावी अशी विनंती, अधिक्षक अभियंता, व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपणी यांनी केली असता, सदरील जागा ही तुळजाभवानी मंदिर संस्थानची असल्याने, मंदिर संस्थानाच्या कमीटीचा ठराव घेणे आवश्यक असुन तसा ठराव घेतल्यानंतर रितसर जागा उपलब्ध करून देण्यात येईल असे मा. अध्यक्ष महोदयांनी संबधितांना सुचना दिल्या.

तुळजापूर विकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवर कार्यालयीन कामकामकाज करणेसाठी कर्मचारी नियुक्त करणे आवश्यक असल्याची बाब सदस्य सचिव यानी मा. अध्यक्ष महोदयांच्या निदर्शनास आणुन दिली असता, सध्यस्थितीत जिल्हा नियोजन समितीमधील सर्व कर्मचारी प्राधिकरणाचे काम पाहतील याबाबत यापुर्वीच सुचना दिलेल्या आहेत. त्याप्रमाणे आदेश सर्व संबंधिताना दयावेत अशा सुचना मा. अध्यक्ष महोदयांनी जिल्हा नियोजन अधिकारी तथा पदसिध्द सदस्य सचिव, तुळजापूर विकास प्राधिकरण यांना दिल्या.

वरील प्रमाणे मा. अध्यक्ष महोदयांनी मार्गदर्शन करून, व आवश्यक त्या सुचना सर्व संबंधितांना देवून बैठक संपल्याचे जाहीर केले.

जि. नि. अ.तथा, सदस्य सचिव,
तुळजापूर विकास प्राधिकरण,
जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद.

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
तुळजापूर विकास प्राधिकरण,
जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद.

**श्री. क्षेत्र तुळजापूर मंदिर, मंदिर परिसर व शहर विकास कार्यक्रम**
**दिनांक २४/०५/२००९, रोजी सपंन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.**

श्री क्षेत्र तुळजापूर मंदिर, मंदिर परिसर व शहर विकास आराखडयाबाबत, तुळजापूर विकास प्राधिकरणाची आढावा बैठक, रविवार दिनांक २४/०५/२००९ रोजी सर्कीट हाऊस, तुळजापूर येथे संपन्न झाली. बैठकीच्या प्रारंभी जिल्हा नियोजन अधिकारी तथा सदस्य सचिव, तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी मा. ना. श्री. मधुकरराव चव्हाण, अध्यक्ष, मराठवाडा वैधानिक विकास मंडळ, औरंगाबाद तथा सदस्य, तुळजापूर विकास प्राधिकरण व मा. जिल्हाधिकारी तथा पदसिध्द अध्यक्ष तुळजापूर विकास प्राधिकरण यांचे व सर्व उपस्थितांचे शब्द सुमनाने स्वागत केले.

शनिवार दिनांक १८/०३/२००९ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त माहितीस्तव व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव सर्व संबंधिताना पाठविण्यात आलेले आहेत. तरी सदरील बैठकीच्या इतिवृत्तास अंतिम मान्यता देवून इतिवृत्त कायम करावे अशी विनंती मा. अध्यक्ष महोदयांना केली असता, त्यास सर्वानुमते मान्यता देवून इतिवृत्त कायम केले. व बैठकीच्या कामकाजास सुरूवात करणेबाबत मा. अध्यक्ष महोदयांनी सदस्य सचिव यांना सुचित केले.

भाग क्र.०१ मधील रू. १८८ कोटी ८३ लाख ८८ हजार तरतुद चालु आर्थिक वर्षात अर्थसंकल्पित करून या कार्यालयास वितरीत करणे बाबत, नगर विकास विभागास विनंती करण्यात आलेली आहे. परंतु अंदाजपत्रकीय किंमतीत काही बदल झालेला असल्यास, तशी सुधारीत तरतुद अर्थसंकल्पित करून घेणेसाठी प्रस्ताव शासनास सादर करणे आवश्यक असल्याची बाब सदस्य सचिव यांनी, मा. अध्यक्ष महोदयांच्या निदर्शनास आणुन दिली असता, सर्व कार्यान्वयीन यंत्रणानी, भाग क्र.०१ मध्ये प्रस्तावित केलेल्या कामांबाबत काही फेरबदल असतील तर अशा प्रस्तावासह अंदाजपत्रके, सक्षम अधिका-याच्या तांत्रीक मान्यतेसह नकाशे, आराखडे, देखभाल दुरूस्ती हमीपत्र, जागा उपलब्धतेचे प्रमाणपत्र, आठ अ व सात बारा उतारा, नगर परिषदेचा ठराव, नाहरकत प्रमाणपत्र, बक्षीसपत्र, दानपत्र ई आवश्यक त्या दस्तऐवजासह अंदाजपत्रके लवकरात लवकर दोन प्रतीत प्राधिकरणास सादर करावीत. विलंबाची सर्व जबाबदारी आपणावर राहील असे सर्व कार्यान्वयीन यंत्रणांना मा. अध्यक्ष महोदयांनी सुचित केले.

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग उस्मानाबाद व कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प विभाग यांनी रस्ते विकासाच्या कामांची अंदाजपत्रके सादर केलेली आहेत. परंतु कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग उस्मानाबाद यांनी देखभाल दुरूस्ती हमीपत्र व जागा ताब्यात असल्याचे प्रमाणपत्र सादर केले नाही. त्यामुळे रस्ते विकासाच्या कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यास अडचन येत असल्याची बाब सदस्य सचिव यांनी मा. अध्यक्ष महोदयांच्या निदर्शनास आणुन दिली असता, सदरील दस्तऐवज तातडीने प्राधिकरणास सादर करणेबाबत शाख अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांना मा. अध्यक्ष महोदयांनी सुचना देवून, दस्तऐवज प्राप्त होताच सदरील कामांचे प्रशासकीय मान्यतेचे आदेश तयार करणेबाबत सदस्य सचिव, तुळजापूर विकास प्राधिकरण यांना आदेशित केले.

सिंदफळ येथील सर्वे नंबर २०२ येथे ३३ के.व्ही उपकेंद्र करणे या कामासाठी तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या मालकीची असलेली जागा उपलब्ध करून द्यावी अशी विनंती अधिक्षक अभियंता, व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपणी यांनी विनंती असता, तसा प्रस्ताव मंदिर संस्थानकडे पाठवावा म्हणजे तुळजाभवानी मंदिर कमेटीचा ठराव घेवून सदरील कामासाठी जागा उपलब्ध करून देण्यात येईल असे, मा.ना. श्री. मधुकरराव चव्हाण, अध्यक्ष, मराठवाडा वैधानिक विकास मंडळ तथा सदस्य तुळजापूर विकास प्राधिकरण व मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी संबंधिताना सुचित केले.

घाटशिळ परिसरामध्ये भक्त निवास बांधणे या कामांचे अंदाजपत्रक तयार असुन प्रशासकीय मान्यतेसाठी लवकरच प्राधिकरणास सादर करण्यात येईल असे श्री. भोसले, शाखा अभियंता, तुळजाभवानी मंदिर संस्थान यांनी मुद्या उपस्थित केला असता, सदरील काम तुळजापूर विकास आराखडयामध्ये समाविष्ट नसल्याने त्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करता येणार नसल्याची बाब सदस्य सचिव, यांनी मा. अध्यक्ष महोदयांच्या निदर्शनास आणुन दिली. तेव्हा आराखडया मध्ये समाविष्ट असलेले व मंदिर संस्थानमार्फत प्रस्तावित असलेले, तुळजाभवानी मंदिर परिसरात १०८ खोल्याचे भक्त निवास बांधणे रू. ३५०.०० लाख हे काम रद्य करून, त्याऐवजी मंदिर संस्थानच्या मालकीच्या जागेत, घाटशिळ परिसरामध्ये भक्त निवास बांधणे रू.१० कोटी ५० लाख किंमतीच्या कामाचा समावेश करावा. आणि फेर

बदलाच्या प्रस्तावासह अंदाजपत्रकाच्या दोन प्रती सर्व आवश्यक त्या प्रमाणपत्रासह प्राधिकरणास पाठविणेबाबत संबंधित शाखा अभियंत्यास मा. अध्यक्ष महोदयांनी सुचना दिल्या. व तसेच फेरबदलाचा प्रस्ताव मान्यतेसाठी शासनास पाठवावा अशा सुचना सदस्य सचिव यांना दिल्या.

तुळजापूर विकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवर अधिकारी / कर्मचारी नियुक्त करणे. जसे (अंदाजपत्रकांची छाननी करणे, लेखा / आस्थापना विषयक कामे हाताळणे) ई कार्यालयीन कामकाज करणेसाठी अधिकारी / कर्मचारी नियुक्त करणे व प्राधिकरणाच्या अकस्मिक खर्चासाठी तरतुद नसल्याचा मुद्या सदस्य सचिव यानी उपस्थित केला असता, तसा प्रस्ताव तयार करावा म्हणजे मा. सचिव, नगर विकास विभाग हे पुढील महिण्यामध्ये तुळजापूर येथे आल्यानंतर त्यांच्या उपस्थितीत सदील मुद्यावर चर्चा करण्यात येईल असे मा. अध्यक्ष महोदयांनी जिल्हा नियोजन अधिकारी तथा पदसिध्द सदस्य सचिव, तुळजापूर विकास प्राधिकरण यांना सांगितले.

ग्रामीण रूग्णालय तुळजापूर विस्तारासाठी जागा भूसंपादन करणेचा प्रस्ताव संबधित विभागास सादर करून जागा तातडीने भूसंपादन करून घ्यावी अशा सुचना मा. अध्यक्ष महोदयांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांना दिल्या .

तुळजापूर शहरामध्ये भूमीगत गटारी करणे व तुळजापूर शहरासाठी नवीन पाणी वितरण व्यवस्था करणे या कामांचे अंदाजपत्रके सर्व आवश्यक त्या प्रमाणपत्रासह दोन प्रतीत तातडीने प्राधिकरणास सादर करणेबाबत, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जिवन प्राधिकरण बांधकाम विभाग उस्मानाबाद यांना मा. अध्यक्ष महोदयांनी सुचना दिल्या.

रस्ते विकासांची कामे करताना कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प विभाग, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत महावितरण, व तसेच कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जिवन प्राधिकरण विभाग यांनी एकत्रीत चर्चा करून आप-आपल्या कामांचे जसे भूमिगत विद्यत केंबल टाकणे, गटारी करणे, व पिण्याच्या पाण्याचे पाईप टाकणे ही सर्व कामे नियोजन पूर्वक करावीत, व तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल प्राधिकरणास सादर करावा अशा सुचना मा. अध्यक्ष महोदयांनी सर्व संबधितांना दिल्या.

तुळजापूर नगर परिषदे मार्फत प्रस्तावित केलेल्या कामांसाठी भूसंपादनाची कार्यवाही तातडीने करावी अशा सुचना मा. अध्यक्ष महोदयांनी मुख्याधिकारी नगर परिषद तुळजापूर यांना दिल्या असता, तुळजापूर शहरातील जनतेकडून हरकती, सुचना नगर परिषदेस प्राप्त झालेल्या आहेत. प्राप्त हरकती व सुचनांच्या सुनावणी साठी नियोजन समिती स्थापन करण्यात येत असुन, सुनावणीअंती भूसंपादनाची कार्यवाही तातडीने करण्यात येईल असे मुख्याधिकारी नगर परिषद तुळजापूर यांनी बैठकीत स्पष्टीकरण दिले.

भवानी मंदिर ते राष्ट्रीय महामार्ग क्र.२११ रस्ता रूंदीकरण व विकास (९ मीटरचे १२ मीटर मध्ये भूसंपादनासह रूपातंर), एस.टी स्टॅन्ड ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक १२ मी. रस्त्याचे २० मी. रस्त्यात भुसंपदनासह रूपातर करणे, व भवानी रोड ते घाटशिळ रोडरस्ता १२ मी. रस्त्याचे १८ मी. मध्ये रूपातर करणे या कामांचे निवाडयाप्रमाणे नगर भूमापन कार्यालयात भूसंपादन अधिनियमाच्या तरतुदीनुसार क्षेत्र दुरूस्तीबाबतचा प्रस्ताव, उप विभागीय अधिकारी उस्मानाबाद व भूमी अभिलेख कार्यालयास सादर केलेला असुन, सदरील जागा शासनाच्या नावे नोंद करण्याची कार्यवाही संबंधित विभागाकडे प्रलंबित असल्याची बाब मुख्याधिकारी नगर परिषद तुळजापूर यानी मा अध्यक्ष महोदयांच्या निदर्शनास आणुन दिली. उप विभागीय अधिकारी उस्मानाबाद व भूमी अभिलेख कार्यालयास सदरील प्रकरणावर तातडीने कार्यवाही करणेबाबत लेखी सुचना देणेबाबत जिल्हा नियोजन अधिकारी तथा सदस्य सचिव, तुळजापूर विकास प्राधिकरण यांना मा. अध्यक्ष महोदयांनी सुचना दिल्या.

तुळजापूर बस स्थानकाजवळ पोलिसचौकी बांधणे याकामासाठी नगर परिषद तुळजापूर यांनी अंदाजे २०।२० फूट जागा उपलब्ध करून दयावी अशी विनंती पोलिस विभागामार्फत करण्यात आली. परंतु बसस्थानका जवळ नगर परिषदेच्या मालकीची जागा नसल्याकारणाने पोलीस चौकीसाठी जागा उपलब्ध करून देता येणार नाही असे मुख्याधिकारी नगर परिषद तुळजापूर यांनी सांगितले. बसस्थानकामधील सुलभ शौचालय समोरील पूर्व-दक्षिण बाजुची अंदाजे २०।२० फूट जागा पोलिस चौकीसाठी उपलब्ध करून देणे बाबत तुळजापूर आगार प्रमुखांना विनंती करावी अशा सुचना मा. अध्यक्ष महोदयांनी पोलिस विभागास दिल्या.

तुळजापूर शहरातील जेवढे रस्ते रूंदीकरण करावयाची आहेत त्या सर्व रस्त्याचे व इतर जागेचे भूसंपादन करून, ५ कि.मी. हद्दीपर्यंतच्या विकास कामांचा नगर रचनाकार उस्मानाबाद यांच्या मान्यतेने आराखडा तयार करावा आणि जनेतेच्या माहितीसाठी पूर्वीचे भूसंपादन व आत्ता करावयाचे भूसंपादनाची

माहितीसाठी दोन्ही भूसंपादनासाठी वेगवेगळया रंगाने ठळक खुणा करून त्यास प्रसिध्दी दयावी. आणि त्याची प्रत प्राधिकरणास सादर करावी अशा सुचना मा. अध्यक्ष महोदयांनी मुख्याधिकारी नगर परिषद तुळजापूर यांना दिल्या.

उस्मानाबाद रोड-लातुर रोड-व नळदुर्ग रोड नवीन वळणरस्ता रस्ता भूसंपादनासह विकसीत करणे या कामाबाबत चर्चा झाली असता, तुळजापूर शहरातील रस्ते अगोदरच अरूंद आहेत. व हा रस्ता शहरातुन जात असल्यामुळे सदरील रस्ता नगर परिषेदच्या आरक्षीत असलेल्या जागेवर करण्यात यावा. याशिवाय नवीन वळणरस्त्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाने सर्वेक्षण करावे अशा सुचना मा. अध्यक्ष महोदयांनी सार्वजनिक बांधकाम विभाग व मुख्याधिकारी नगर परिषद तुळजापूर यांना दिल्या.

उस्मानाबाद रोडलगत आ.क्र.६४ येथे पार्कींग, धर्मशाळा इत्यादी भूसंपादनासह विकसीत करणे या कामाबाबत चर्चा सुरू असताना मुख्याधिकारी नगर परिषद तुळजापूर यांनी असे सांगितले की, सदरील जागेच्या मालकाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये नगर परिषदेस खरेदी सुचना बजावली होती. याबाबत सहा महिण्याच्या विहित कालावधीत भूसंपादनाची कार्यवाही नकरता सदरील जागेची आवश्यकता नसल्याबाबतचा सर्वसाधारण सभेचा ठराव पारीत केला. त्यानंतर जमीन मालकाने नगर परिषदेकडे विकास परवानगी मागितल्याने नगर परिषदने संबंधिताना विकास परवानगी दिलेली आहे. त्यामुळे सदरील जागेवरील आरक्षण व्यपगत झाले आहे. ही बाब विचारात घेवून उस्मानाबाद रोडलगत आ.क्र.६४ येथे पार्कींग, धर्मशाळा इत्यादी भूसंपादनासह विकसीत करणे हे काम रद्द करून, सदरील धर्मशाळा, पार्कींग हे काम हाडको येथील आ.क्र. ४ या सुधारित आराखडयातील जागेवर करणेसाठी परवानगी दयावी अशी विनंती मुख्याधिकारी नगर परिषद यांनी केली. तेव्हा फेरबदलाच्या कामांचे प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या ठरावासह प्राधिकरणास सादर करावेत. तसे प्रस्ताव प्राप्त होताच मान्यतेसाठी शासनास पाठविण्यात येतील असे मा. अध्यक्ष महोदयांनी संबंधितांना सुचना दिल्या.

जुना सरकारी दवाखान्याची रिकामी जागा (मंगळवार पेठ) भूसंपादन करून नाटयगृह, दुकानकेंद्र, सुलभ शौचालय बांधणे या कामासाठी प्रस्तावित केलेली जागा ही जिल्हा परिषदेच्या मालकीची असुन सदरील ठिकाणी दुकानकेंद्र, व इतर विकासकामे करण्याचे जिल्हा परिषदेने प्रस्तावित केलेले आहे. त्यामुळे उक्त कामासाठी जागा उपलब्ध होऊ शकणार नाही. म्हणुन नगर परिषदेच्या सुधारित विकास आराखडयातील आ.क्र. १३ वरील जागेत नाटयगृह, दुकानकेंद्र, सुलभ शौचालय बांधणेकरिता परवानगी दयावी अशी विनंती मुख्याधिकारी नगर परिषद तुळजापूर यांनी केली. तेव्हा फेरबदलाच्या कामांचे प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या ठरावासह प्राधिकरणास सादर करणेबाबत मा. अध्यक्ष महोदयांनी संबंधितास सुचना दिल्या.

वरील प्रमाणे मा. अध्यक्ष महोदयांनी मार्गदर्शन करून, व आवश्यक त्या सुचना सर्व संबंधितांना देवून बैठक संपल्याचे जाहीर केले.

जि. नि. अ.तथा, सदस्य सचिव,
तुळजापूर विकास प्राधिकरण,
जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद.

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
तुळजापूर विकास प्राधिकरण,
जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद.

## श्री. क्षेत्र तुळजापूर मंदिर, मंदिर परिसर व शहर विकास कार्यक्रम
## दिनांक १०/०६/२००९, रोजी सपंन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

श्री क्षेत्र तुळजापूर मंदिर, मंदिर परिसर व शहर विकास कामाबाबत, तुळजापूर विकास प्राधिकरणाची आढावा बैठक, मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, तुळजापूर विकास प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली, बुधवार दिनांक १०/०६/२००९ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय उस्मानाबाद येथे संपन्न झाली. बैठकीच्या प्रारंभी सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी यांनी मा. जिल्हाधिकारी तथा पदसिध्द अध्यक्ष तुळजापूर विकास प्राधिकरण यांचे व सर्व उपस्थितांचे शब्द सुमनाने स्वागत केले.

रविवार दिनांक २४/०५/२००९ रोजी संपन्न झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देवून मा. अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने बैठकीच्या कामकाजास सुरूवात झाली.

बैठकीच्या प्रारंभी तुळजापूर आराखडयातील खालील परिशिष्ट- ०१ मधील रस्ते विकासाच्या रू.५१३०.२५ लाख किंमतीच्या सहा कामांना दिनांक ०१/०६/२००९ च्या आदेशान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली बाब सर्व उपस्थितांच्या निदर्शनास आणुन दिली. व तसेच प्रशासकीय मान्यता दिलेल्या कामांच्या निविदा प्रसिध्द करण्याची कार्यवाही तातडीने करणेबाबत, मा. अध्यक्ष महोदयांनी सार्वजनिक बांधकाम विभाग व विशेष प्रकल्प विभाग उस्मानाबाद यांना सुचना दिल्या.

परिशिष्ट- ०१ (रू. लाखात)

| अ. क्र | कार्यान्वयीन यंत्रणा / कामांचे नांव | अंदाजित किंमत | प्रशासकीय मान्यता किंमत |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग उस्मानाबाद | | |
| १ | तुळजापूर शहरातुन शहराबाहेर जाणा-या सोलापूर-धुळे बाहय वळण रस्त्याचे बांधकाम करणे कि.मी.०/०० ते ३/३१३ | १३८५.०० | १३८५.०० |
| २ | बार्शी-तुळजापूर रस्त्याची सुधारणा करणे रामा-१५३ कि.मी. ४२/४०० ते ४८ /८०० | ३५०.०० | ३५०.०० |
| ३ | तुळजापूर-उजणी-औसा-लातुर रस्त्याची सुधारण करणे कि.मी.४१६/०० ते ४१७/०० | २३०.०० | २३०.०० |
| ४ | तुळजापूर-नळदुर्ग रामा-१५३ रस्त्याची सुधारणा करणे कि.मी. ४९/०० ते ५०/०० | ४५०.०० | ४५०.०० |
| | एकुण सार्वजनिक बांधकाम विभाग | २४१५.० | २४१५.०० |
| | कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प विभाग उस्मानाबाद | | |
| १ | सोलापूर-धुळे रामक्र.२११ कि.मी.३५/०० ते ३९/७०० मधील राष्ट्रीय महा मार्गाचे रस्ता दुभाजकासह चौपदरीकरण करणे व तुळजापूर घाटातील कि.मी. ३९/७०० ते ४१/२२० रामाचे सुधारणा करणे (किमी.४१/२२० ते ४२/३६५) शहरातील अस्तित्वातील चौपदी रस्त्याची सुधारणा करणे (तुळजापूर-सोलापूर भाग-०१) | २३५३.०० | २३५३.०० |
| २ | सोलापूर- धुळे राम.क्र.२११ किमी.४२/३६५ ते ४३/२०० मधील राष्ट्रीय महामार्गाचे रस्ता दुभाजकासह चौपदरीकरण करणे (तुळजापूर ते उस्मानाबाद बाजु भाग.०२) | ३६२.२५ | ३६२.२५ |
| | एकुण विशेष प्रकल्प विभाग | २७१५.०० | २७१५.२५ |
| | एकुण सर्व | ५१३०.२५ | ५१३०.२५ |

सदरील बैठकीत मा. अध्यक्ष महोदयांनी यंत्रणानिहाय व कामनिहाय आढावा घेताना, सर्व प्रथम मुख्याधिकारी, नगर परिषद तुळजापूर यांनी प्रस्तावित केलेल्या कामाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. विकास आराखडयातील ज्या कामांना जागा उपलब्ध आहे, व ज्या कामाबाबत तुळजापूर शहरातील जनतेच्या सुचना, हरकती नाहीत आणि जी कामे भाग क्र.०१ मध्ये समाविष्ट आहेत अशा कामांचे दोन प्रतीत अंदाजपत्रके, सक्षम प्राधिका-याच्या तांत्रिक मान्यतेसह नगर परिषदेचा सर्व साधारण ठराव, देखभाल दुरूस्ती हमीपत्र, जागा उपलब्धतेचे प्रमाणपत्र, नकाशे, आराखडे ईत्यादीसह परिपूर्ण प्रस्ताव तातडीने प्रशासकीय मान्यतेसाठी प्राधिकरणास सादर करणेबाबत, मा. अध्यक्ष महोदयांनी नगर परिषद, तुळजापूर यांना सुचना देवून खालील प्रमाणे कामनिहाय आढावा घेण्यात आला.

## रस्ते विकास

तुळजापूर शहर व परिसर अंतर्गत रस्ते विकासाच्या कामाबाबत चर्चा चालु असताना, खालील परिशिष्ट-०२ मधील रस्ते विकासाची सर्व कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात यावीत व तसा नगर परिषदेचा सर्व साधारण सभेचा ठराव प्राधिकरणास सादर करावा, अशा सुचना मा. अध्यक्ष महोदयांनी नगर अभियंता, तुळजापूर यांना दिल्या.

परिशिष्ट- ०२ (रू. लाखात)

| अ.क्र | कामाचे नांव | भूसंपादन किंमत | विकास कामांची किंमत | एकुण अंदा.किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | २ | १ | २ | ३ |
| १ | उस्मानाबाद रोड ते तुळजाभवानी (तुळजापूर खुर्द) रस्ता विकसीत करणे | ०.०० | ६६.८६ | ६६.८६ |
| २ | सोलापूर-तुळजापूर वळणरस्ता ते मंदिररस्ता रूंदीकरण व विकास करणे | ७२.०० | १५.०० | ८७.०० |
| ३ | उस्मानाबाद रोड ते लातुररोड-नळदुर्ग रोड वळणरस्ता भूसंपादनसह विकसीत करणे | ७८७.५० | ५२५.५० | १३१३.०० |
| | एकुण | ८५९.५० | ६०७.३६ | १४६६.८६ |

## वाहनतळ

तुळजापूर विकास आराखडयातील खालील परिशिष्ट-०३ मधील वाहनतळास जागा उपलब्ध नसल्याने प्राधिकरणा मार्फत जागा उपलब्ध करून दयावी अशी विनंती, नगर अभियंता तुळजापूर यांनी मा. अध्यक्ष महोदयांना केली. तेव्हा सदरील कामांचा प्रस्ताव प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत चर्चेसाठी ठेवण्यात यावा अशा सुचना सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी उस्मानाबाद यांना मा. अध्यक्ष महोदयांनी दिल्या.

परिशिष्ट- ०३ (रू. लाखात)

| अ.क्र | कामाचे नांव | भूसंपादन किंमत | विकास कामांची किंमत | एकुण अंदा.किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | लातुर रोड लगत भूसंपादनासह वाहनतळ विकसीत करणे | ८१.०० | ६४.११ | १४५.११ |
| २ | उस्मानाबाद रोड लगत भूसंपादनासह वाहनतळ विकसीत करणे | ९६.०० | ६४.११ | १६०.११ |
| ३ | आराधवाडी येथे भूसंपादनासह वाहनतळ विकसीत करणे | ६०.७२ | ५०.२४ | ११०.९६ |
| | एकुण | २३७.७२ | १७८.४६ | ४१६.१८ |

या शिवाय खालील परिशिष्ट-०४ मधील कामासाठीची जागा प्राधिकरणाने निश्चित करून दयावी अशी विनंती नगर अभियंता, तुळजापूर यांनी मा. अध्यक्ष महोदयांना केली असता, सदरील कामांचा प्रस्ताव प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत चर्चेसाठी ठेवण्यात यावा अशा सुचना सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी उस्मानाबाद यांना मा. अध्यक्ष महोदयांनी दिल्या.

परिशिष्ट- ०४ (रू. लाखात)

| अ.क्र | कामाचे नांव | भूसंपादन किंमत | विकास कामांची किंमत | एकुण अंदा.किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | भवानी मंदिर महाद्वार समोरील मोकळया जागेचा विकास करणे | २००.०० | २०.०० | २२०.०० |
| २ | मातंगी मंदिर सभोवती ५० मीटर जागा ठेवणे व विकास करणे | १५०.०० | २५.०० | १७५.०० |
| | एकुण | ३५०.०० | ४५.०० | ३९५.०० |

तुळजापूर शहराची प्रारूप सुधारीत विकास योजना (दुसरी) नगर परिषदेने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम-२६ (१) अन्वये तिचा सर्वसाधारण सभा ठराव क्र.६२९ दिनांक २०/०२/२००९ रोजी प्रसिध्द झालेला असुन, यामध्ये उपरोक्त परिशिष्ट-०४ मधील मातंगी मंदिर सभोवती ५० मीटर जागा ठेवणे व विकास करणे हे काम प्रस्तावित नाही. अशा परिस्थितीत जनतेच्या हरकती, आक्षेपा बाबत कार्यवाही करणेसाठी प्राधिकरणाच्या बैठकीत त्यावर निर्णय घेणे व त्या अनुषंगाने मंजूर तिर्थक्षेत्र विकास कामाच्या आराखडयात बदल करणेस मान्यता देणे. अथवा, सदरचे काम हे नगर

परिषद तुळजापूर यांनी आराखडयात प्रस्तावित केलेले असल्याने, त्यांनीच याबाबत सर्वसाधारण सभेत उचित निर्णय घेणे व त्यानुसार प्रस्तावात बदल करण्याची विनंती प्राधिकरणाकडे व पर्यायाने शासनाकडे करणे हे दोन पर्याय उपलब्ध होतात, असे सहाय्यक नगर रचनाकार यांनी मा. अध्यक्ष महोदयांच्या निदर्शनास आणुन दिले. तेव्हा सदरील मुद्या प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत चर्चेसाठी ठेवणेबाबत सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी यांना मा. अध्यक्ष महोदयांनी सुचित केले.

भाविकासांठी इतर सुविधा

भाविकांसाठी इतर सुविधा उपलब्ध करून देणेसाठी नगर परिषद तुळजापूर यांनी प्रस्तावित केलेल्या खालील परिशिष्ट-०५ प्रमाणे कामनिहाय चर्चा करण्यात आली.

परिशिष्ट-०५ (रू. लाखात)

| अ.क्र | कामाचे नांव | भूसंपादन किंमत | विकास कामांची किंमत | एकुण अंदा.किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | नगर परिषद तुळजापूर करिता पाचुंदा विहिर ते मंगळवार पेठ पाण्याची टाकी नविन पाईप लाईन करणे | ०.०० | ११०.०० | ११०.०० |
| २ | शहरात विविध दहा ठिकाणी प्रकाशझोत बसविणे | ०.०० | ५९.४० | ५९.४० |
| ३ | शहरात विविध दहा ठिकाणी सुलभ शौचालय बांधणे | ४०.०० | ५०.७० | ९०.७० |
| ४ | शहरात यात्राकाळात १० फिरती शौचालये खरेदी करणे | ०.०० | ७०.०० | ७०.०० |
| ५ | शहरात सहा ठिकाणी प्रवेशद्वार करणे | ०.०० | २७०.०० | २७०.०० |
| ६ | जुना सरकारी दवाखान्याचे रिकामी जागा (मंगळवार पेठ) भूसंपादन करून नाटयगृह, दुकानकेंद्र, सुलभ शौचालय बांधणे | १५३.३२ | ३८०.०० | ५३३.३२ |

उपरोक्त परिशिष्ट-०५ मधील अ.क्र.०१ चे काम महाराष्ट्र जिवन प्राधिकरण विभागामार्फत करण्यात यावे असे नगर अभियंता, तुळजापूर यांनी मा. अध्यक्ष महोदयांना विनंती केली. तेव्हा नगर परिषदेचा सर्व साधारण सभेचा ठराव घेवून सदरील काम महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाकडे वर्ग केल्यास, विहित मुदतीत पूर्ण करण्यात येईल असे कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जिवन प्राधिकरण यांनी मा. अध्यक्ष महोदयांना सांगितले. तेव्हा सदरील प्रस्ताव प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत चर्चेसाठी ठेवण्यात यावा अशा सुचना मा. अध्यक्ष महोदयांनी सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी यांना दिल्या.

शहरात विविध १० ठिकाणी प्रकाशझोत बसविणे, फिरती शौचालय खरेदी करणे व सुलभ शौचालय बांधणे या कामांचे दोन प्रतीत अंदाजपत्रके तांत्रिक मान्यतेसह व परिपूर्ण दस्तऐवजासह प्रशासकीय मान्यतेसाठी प्राधिकरणास सादर करावीत अशा सुचना नगर अभियंता, तुळजापूर यांना मा. अध्यक्ष महोदयांनी दिल्या असता, प्रस्तावित कामांचे अंदाजपत्रके लवकरच सादर करण्यात येतील असे नगर अभियंता यांनी सांगितले.

शहरात व शहराबाहेर प्रवेशद्वार करणे हे काम कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग उस्मानाबाद यांच्याकडे वर्ग करण्यात यावे अशा सुचना नगर अभियंता तुळजापूर यांना मा. अध्यक्ष महोदयांनी दिल्या. व तसेच उक्त कामांचे अंदाजपत्रके तयार करून प्रशासकीय मान्यतेसाठी प्राधिकरणास सादर करणेबाबत मा. अध्यक्ष महोदयांनी सार्वजनिक बांधकाम विभागास सुचना दिल्या.

जुना सरकारी दवाखान्याची रिकामी जागा (मंगळवार पेठ) भूसंपादन करून नाटयगृह, दुकानकेंद्र, सुलभ शौचालय बांधणे या कामासाठी प्रस्तावित केलेली जागा ही जिल्हा परिषदेच्या मालकीची असुन सदरील ठिकाणी दुकानकेंद्र, व इतर विकासकामे करण्याचे जिल्हा परिषदेने प्रस्तावित केलेले आहे. त्यामुळे उक्त कामासाठी जागा उपलब्ध होऊ शकणार नाही. म्हणुन नगर परिषदेच्या सुधारित विकास आराखडयातील आ.क्र. १३ वरील जागेत नाटयगृह, दुकानकेंद्र, सुलभ शौचालय बांधणे या कामाचा फेरबदलाचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या ठरावासह प्राधिकरणास लवकरच सादर येईल असे नगर अभियंता यांनी मा. अध्यक्ष महोदयांच्या निदर्शनास आणुन दिले.

आरोग्य विभाग

ग्रामीण रूग्णालय तुळजापूर विस्तारासाठी जागा भूसंपादन करणेचा प्रस्ताव संबधित विभागास सादर करून जागा तातडीने भूसंपादन करून घ्यावी अशा सुचना मा. अध्यक्ष महोदयांनी आरोग्य विभागास दिल्या. जागा भूसंपादन करण्याची कार्यवाही प्रगती पथावर असल्याची बाब जिल्हा शल्य चिकित्सक उस्मानाबाद यांनी मा. अध्यक्ष महोदयांच्या निदर्शनास आणुन दिली.

## पोलिस विभाग

तुळजापूर शहर विकास आराखडयातंर्गत पोलिस विभागामार्फत प्रस्तावित केलेल्या खालील परिशिष्ट-०६ मधील कामांचे अंदाजपत्रके तातडीने प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करणेबाबत मा. अध्यक्ष महोदयांनी जिल्हा पोलिस अधिक्षक उस्मानाबाद यांना सुचित केले असता, अ.क. १ व २ च्या कामांचे अंदाजपत्रके तयार करणेबाबत सार्वजनिक बांधकाम विभागास कळविण्यात आले असुन, मंदिरात पोलिस चौकी बांधणे या कामास जागा उपलब्ध करून दिल्यास त्याही कामांचे अंदाजपत्रक तातडीने सादर करण्यात येईल असे जिल्हा पोलिस अधिक्षक यांनी मा. अध्यक्ष महोदयांच्या निदर्शनास आणुन दिले.

परिशिष्ट-०६ (रू. लाखात)

| अ.क्र | कामाचे नांव | भूसंपादन किंमत | विकास कामांची किंमत | एकुण अंदा.किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
प्राधिकरणातंर्गत करण्यात येत असलेल्या कामांच्या अंदाजपत्रकात एजन्सी चार्जेस देय वा अनुज्ञेय नाहीत त्यामुळे अंदाजपत्रकात सेन्टेंज चार्जेसचा समावेश करण्यात येवू नये, व तसेच कामे कमीत कमी मुदतीत, मोठी कामे पण एक वर्षात पूर्ण करणे संबंधित यंत्रणा आणि ठेकेदार यांना बंधनकारक राहील, आणि कोणत्याही कामास मुदतवाढ मिळणार नाही अंत्यत अपवादात्मक परिस्थितीत मध्ये मुदतवाढ देण्याचे अधिकार प्राधिकरणाला असतील. तसेच विहीत मुदतीत काम न झाल्यास दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

शहरात यात्राकाळात १० फिरती शौचालये खरेदी करणे या कामाची निविदा मुख्याधिकारी नगर परिषद तुळजापूर यांनी मान्यतेसाठी प्राधिकरणा समोर सादर केली. त्यावर अध्यक्षांनी अशाच प्रकारचे काम सोलापूर जिल्हयात झालं असुन त्याचे दर व तांत्रिक निकष काय होते याची विचारणा केली असता, याच निकषासाठी मागील वर्षी या कामी अंदाजे रू.६.०० लाख किंमतीच्या निविदा प्राप्त झाल्या होत्या. मात्र तुळजापूर नगर परिषदेकडे, न्यु साई फायबर मिरज यांनी रू.८१५६२५/-, अजिल फायब्रोटेक पुणे यांनी रू.८६००००/- व मीरा स्टील फॅब्रीकेशन ॲन्ड फायबर्स मिरज यांनी रू.८९५०००/- इतक्या किंमतीच्या तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत. तसेच याबाबत प्राधिकरणास प्राप्त झालेली एस.एस.एंटरप्राईजेस नाशिक यांची दिनांक निरंक ची तक्रार प्राधिकरणाच्या कार्यालयास दिनांक ६/०८/२००९ रोजी प्राप्त झाली होती ती सर्व सदस्यांना सदस्य सचिवांनी निदर्शनास आणली. सदर तक्रार आणि सोलापूर जिल्हयातील याच कामांचे दर पाहता ही निविदा मान्य न करता फेर निविदा

मागविण्याचा ठराव क्र.१० घेण्यात आला. तसेच या प्रकारच्या तक्रारी उद्‌भवू नयेत म्हणुन यापुढे प्राधिकरणातंर्गत प्रशासकीय मान्यता दिलेल्या कामांच्या निविदा विक्री संबंधित यंत्रणेचे कार्यालय आणि प्राधिकरणाचे कार्यालय (जिल्हा नियोजन समिती जिल्हाधिकारी कार्यालय उस्मानाबाद) या दोन्ही ठिकानी, तर स्विकृती प्राधिकरणाच्या कार्यालयात होईल. असा ठरावा क्र. ११ सर्वानुमते मान्य करण्यात आला. तसेच सर्व निविदांची प्रसिध्दी व्यापक होण्याची काळजी सर्व यंत्रणांनी घ्यावी असेही जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष महोदयांनी सर्वांना निर्देशित केले. तुळजापूर विकास प्राधिकरणातंर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान केलेल्या कामांच्या निविदांची प्रसिध्दी जास्तीत जास्त होण्याच्या दृष्टीने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सर्व कार्यालयातील नोटीस बोर्डावर निविदेची प्रत लावण्यात यावी अशाही सूचना मा. अध्यक्षांनी दिल्या.

शहरात विविध ठिकाणी मार्बल, ब्राँज, भिंती शिल्प बसविणे ही कामे करू नयेत, सदरचा खर्च हा अवास्तव आहे अशी सुचना मा. श्री. नरेन्द्र बोरगावकर यांनी केली असता. सदरचे काम तुर्तास स्थगीत ठेवून याबाबत वास्तु विशारद यांच्या मागदर्शना नंतर निर्णय घेण्यात येईल असे मा. अध्यक्ष महोदयांनी सांगितले.

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्रमांक तिक्षेवि-२००८/प्र.क्र. १३७ नवि-१६, दिनांक ३१/१०/२००८. अन्वये, तिर्थक्षेत्र विकास योजनेतील काही मंजुर कामे ही तुळजा भवानी मंदिर संस्थाने कार्यान्वीत करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. तथापी तुळजापूर विकास प्राधिकरण अधिनियमातील तरतुदी नुसार मंजूर कामे शासकीय / निमशासकीय यंत्राणांनी कार्यान्वीत करावी अशी तरतुद केली आहे. मंदिर संस्थान हे नोंदणीकृत संस्थान असुन, मा. जिल्हाधिकारी उस्मानाबाद हे संस्थानचे पदसिध्द अध्यक्ष आहेत. संस्थानकडे विकास कामांच्या कार्यान्वनासाठी पुरेशी यंत्रणा आहे. त्यामुळे ही बाब शासनाच्या निदर्शनास आणावी व ही मंजूर कामे तुळजाभवानी मंदिर संस्थानानेच कार्यान्वीत करावी असे सर्वानुमते ठरले.

तुळजापूर विकास आराखडयात नव्याने कामे समाविष्ट करणेबाबचा प्रस्ताव स्वतंत्ररित्या शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात येईल, असे मा. अध्यक्ष महोदयांनी सर्वांच्या निदर्शनास आणुन दिले. प्राधिकरणा मार्फत कामनिहाय व यंत्रणानिहाय घेण्यात आलेल्या आढाव्याचा तपशील स्वतंत्ररित्या **परिशिष्ट-अ** मध्ये दर्शविण्यात आला आहे व सन्माननीय सदस्याकडुन प्राधिकरणातंर्गत करण्यात येत असलेल्या कामाबाबत पत्रांच्या स्वरूपात ज्या सुचना प्राप्त झालेल्या आहेत व तसेच आराखडयात नवीन कामांचा समावेश करणे बाबतचे प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत त्याची माहिती सोबतच्या **परिशिष्ट-ब** मध्ये दर्शविण्यात आली आहे.

तुळजापूर विकास प्राधिकरणांतर्गत मंजूर आराखड्यातील सर्व प्रकारच्या इमारती व पार्किंग लॉट्सच्या ठिकाणी रेन वॉटर हार्वेस्टींगसाठी हौद बांधण्याकरिता अंदाजपत्रकामध्ये आवश्यक तरतूद ठेवावी अशा सूचना अध्यक्ष महोदयांनी दिल्या.

नगर परिषद तुळजापूर मार्फत प्राधिकरणाच्या बैठकीत येवून कामांची अंदाजपत्रके व संचिका सादर केल्या गेल्या यापुढे असे न करता बैठकीच्या किमान एक / दोन दिवसापूर्वी अशी प्रकरणे चर्चेसाठी सादर केल्यास त्यावर चर्चा करता येणे शक्य आहे. याची सर्व यंत्रणांनी नोंद घ्यावी.

जिल्हा नियोजन अधिकारी तथा सदस्य सचिव, तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानुन मा. अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने बैठक संपल्याचे जाहीर केले.

स्थळ प्रत मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
तुळजापूर विकास प्राधिकरण यांच्या स्वाक्षरीत.

सदस्य सचिव,
तुळजापूर विकास प्राधिकरण,
उस्मानाबाद.

दिनांक ०७/०८/२००९ रोजी आयोजित बैठकीत खालील सन्माननीय सदस्याकडुन प्राधिकरणातंर्गत करण्यात येत असलेल्या कामाबाबत पत्रांच्या स्वरूपात ज्या सुचना प्राप्त झालेल्या आहेत व तसेच आराखडयात नवीन कामांचा समावेश करणे बाबतचे प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत त्याची माहिती सोबतच्या परिशिष्ट-ब मध्ये दर्शविण्यात आली आहे.

परिशिष्ट-ब

| अ.क्र | मा.सन्मानीय महोदय/ यंत्रणा यांनी सुचविलेली कामे | नवीन कामाचे नांव | सुचना |
|---|---|---|---|
| १. | मा. आ. श्री. मधुकरराव चव्हाण, तथा सदस्य, तुळजापूर विकास प्राधिकरण. | १ः तुळजापूर बसस्थानक-शिवाजी पुतळा ते भवानी मंदिर या रस्त्यावर सोलर लाईटसची व्यवस्था करावी.<br>२ः तुळजापूर येथे लॉन टेनिस कोर्ट बांधावे. | १ः वाहनतळ बांधणेच्या ठिकाणी स्नानगृह शौचालय व विश्रांतीकक्ष बांधण्यात यावे.<br>२ः नगर परिषद हद्यीतील सर्व विकास कामे नगर परिषदेच्या माध्यमातुन राबवावीत.<br>३ः रस्ते विकास करतानां स्थानिक व्यापा-यांना विश्वासात घेऊन रस्ता रूंदीकरण करावे. रस्ता रूंदीकरण करताना कोणही विस्तापीत होणार नाही याची काळजी घ्यावी. |
| २ | मा. सौ.भारती नाराणराव गवळी, अध्यक्षा, नगर परिषद तुळजापूर तथा सदस्य, तुळजापूर विकास प्राधिकरण. | १ः विवेकानंद नगर (सर्कीट हाऊस रस्ता) येथे स्वागत कमान उभारणे.<br>२ः पापणास झोपडपटी येथे सुरक्षा भिंत बांधणे. | १ः प्राधिकरणा मार्फत करण्यात येणा-या विविध विकास कामे करताना नगर परिषद तुळजापूर चा सहभाग असणे आवश्यक आहे.<br>२ः नगर परिषदेची कामे नगर परिषदेच्या वतीने करण्यात यावीत.<br>३ः महाद्वार रोड समोरील राज्य रस्ता क्रमांक २११ लगत नियोजित पार्कींग व धर्मशाळा इ. विकास कामासाठी सर्वे नं.१३८ व १३९ हे ठिकाण निश्चित करावे.<br>४ः जुना सरकारी दवाखान्याच्या जागेत नाटयगृह, सुलभ शौचालय, इ. सुविधा उपलब्ध करणे.<br>५ः विविधी ठिकाणी स्वागत कमानी बांधणे व इतर<br>रस्त्याची कामे करणे याचा प्राथम्याने विचार करणे.<br>६ः भवानी मंदिरासमोरील मोकळया जागेचा विकास करणे. |
| ३ | १ः मा. आ. श्री. मधुकरराव चव्हाण, तथा सदस्य, तुळजापूर विकास प्राधिकरण.<br>२ः मा. सौ.भारती नाराणराव गवळी, अध्यक्षा, नगर परिषद तुळजापूर तथा सदस्य, तुळजापूर विकास प्राधिकरण.<br>३ः मा. श्री. अप्पासाहेब कदम पाटील, सदस्य तुळजापूर विकास प्राधिकरण<br>४ः मा. श्री. नरेन्द्र बोरगावकर सदस्य तुळजापूर विकास प्राधिकरण.<br>५ः सभापती कृषि, उत्पन्न बाजार समिती, तुळजापूर. पत्रे दि.२७/०७/२००९ | १ः कृषि उत्पन्न बाजार समिती, तुळजापूर आवारा तील सर्व रस्ते व नाली सिमेंटचे बांधकाम करणे, व वीजेची सोय उपलब्ध करणे. | |

स्थळ प्रत मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
तुळजापूर विकास प्राधिकरण यांच्या स्वाक्षरीत.

सदस्य सचिव,
तुळजापूर विकास प्राधिकरण,
उस्मानाबाद.

**<u>श्री. क्षेत्र तुळजापूर मंदिर, मंदिर परिसर व शहर विकास कार्यक्रम</u>**

**दिनांक २३/०८/२००९, रोजी तुळजापूर विकास प्राधिकरणाच्या सपंन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.**

श्री क्षेत्र तुळजापूर मंदिर, मंदिर परिसर व शहर विकास आराखडयातील विकास कामाबाबत मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, तुळजापूर विकास प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली, तुळजापूर विकास प्राधिकरणाची तातडीची बैठक, रविवार दिनांक २३/०८/२००९ रोजी सांयकाळी ६.०० वा, सक्रीट हाऊस, तुळजापूर येथे संपन्न झाली. बैठकीच्या प्रारंभी जिल्हा नियोजन अधिकारी तथा सदस्य सचिव, तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष व तसेच प्राधिकरणातील सर्व सन्माननीय सदस्यांचे व उपस्थितांचे शब्द सुमनाने स्वागत केले.

शुक्रवार दिनांक ०७/०८/२००९ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त माहितीस्तव व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव सर्व संबंधिताना पाठविण्यात आलेले आहेत. तरी सदरील बैठकीच्या इतिवृत्तास अंतिम मान्यता देवून इतिवृत्त कायम करावे अशी विनंती मा. अध्यक्ष महोदयांना केली असता, इतिवृत्तातील पृष्ठ ५ बाब क्र.१५ वरिल, सर्कीट हाऊस ते घाटशिळ पायथा (डोंगरकडा) सुशोभिकरण करणे या प्रशासकीय मान्यता दिलेल्या कामाची निविदा प्रसिध्द करावी अशी नोंद करावयाच्या कार्यवाहीसाठी घेतली आहे. तशी नोंद रद्द करावी कारण या कामासाठी निविदा प्रसिद्ध करण्याचा प्रश्न उद्भवत नाही कारण हे काम स्वतः उपविभागीय वन अधिकारी उस्मानाबाद यांचे कार्यालयामार्फत करण्यात येणार आहे. असे मा. अध्यक्ष महोदयांनी सांगितले व यास प्राधिकरणाने मान्यता दिली.

तुळजापूर शहरात यात्राकाळात फिरते शौचालय खरेदी करणे या कामाबाबत दिनांक ०७/०८/२००९ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत ठराव क्रमांक १० नुसार, मुख्याधिकारी नगर परिषद तुळजापूर यांनी दिनांक २४/०८/२००९ रोजी दुपारी २.०० वा पर्यंत निविदा स्विकृती व शक्य झाल्यास त्याची दिवशी निविदा उघडण्यात येतील असे शुध्दीपत्रक प्रसिध्दीस दिले आहे. ही बाब प्रशासकीय दृष्ट्या योग्य नसल्याने व तसेच, आगामी निवडणूक आचार संहिता लागु होण्यापूर्वी या कामास मान्यता प्रदान करणे आवश्यक असल्याने, फिरते शौचालय खरेदी करणे या कामास मूळ आराखड्यातील एकूण रू.७०.०० लाख किंमतीस व तसेच तुळजापूर शहरात विविध सात ठिकाणी स्वयंचलित वाहतुक नियंत्रक दिवे पुरवठा व उभारणी करणे या कामासाठी रू.४७.०१ इतक्या किंमतीच्या दोन स्वतंत्र कामांना दिनांक २३/०८/२००९ रोजी प्रशासकीय मान्यता देण्याचा ठराव क्र.१२ तुळजापूर विकास प्राधिकरणाने एकमताने मान्य केला.

उस्मानाबाद रोड तु तुळजाभवानी (तुळजापूर खुर्द) रस्ता विकसीत करणे हे काम सिंमेट कॉक्रीट करणे असे नमुद केले आहे. परंतु याभागात अंदाजे १५ ते २० फुट काळी माती असल्याने याबाबत प्राधिकरणाने योग्य तो निर्णय घ्यावा असे मा. श्री. अप्पासाहेब माणिकरावा कदम-पाटील, सदस्य तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी मुद्या उपस्थित केला असता, अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ उस्मानाबाद यांच्या निदर्शनास सदरील बाब आणुन दिली जाईल व त्यांचा अहवाल प्राधिकरणास अंतिम राहील असे मा. अध्यक्ष महोदयानी सर्व उपस्थितांच्या निदर्शनास आणुन दिले.

तसेच दिनांक ०७/०८/२००९ रोजीच्या बैठकीत नगर परिषद तुळजापूर साठीच्या कामाची अंदाजपत्रके सादर करण्याबाबत सूचना दिल्या होत्या. संबंधितांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकास या कार्यालयाचे प्रशासकीय मान्यता आदेश क्र. नियोजन/का-५/तुतिक्षेवि/प्र.मा/२००९-१०/, दिनांक ११/०८/२००९ अन्वये पाच कामांना प्रशासकीय मान्यता देऊन १) यात्रा मैदान येथे टप्पा दोन ब्लॉक अ, व टप्पा दोन ब्लॉक ब, येथे प्रत्येकी एक या प्रमाणे दोन धर्मशाळा (भक्त निवास) बांधणे. २) खुर्द तुळजापूर येथे धर्मशाळा (भक्त निवास) बांधणे. ३) उस्मानाबाद रोड सराया धर्मशाळा जवळील सं.नं.२२२ येथे वाहनतळ विकसीत करणे व सुलभ शौचालय बांधणे.

४) पापनास तलावा लगत, शिवाजी चौक / राणी लक्ष्मीबाई उद्यान व भाई उध्दवराव पाटील सभागृह, येथे प्रत्येकी एक या प्रमाणे एकूण तीन सुलभ शौचालये बांधणे. ५) मांतग नगर येथे लहान सभागृह बांधणे. या कामांच्या तात्काळ निविदा जाहीर करण्याची सूचना नगर परिषेदस केली. याबाबत जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष यांनी मागील काही दिवसांपासून मुख्याधिकारी, नगर परिषद यांचेकडे स्वतः पाठपुरावा केला आहे. तरीही अद्यापही याची निविदा जाहीर केलेली नाही. कोणत्याही क्षणी आचारसंहीता लागू होण्याची शक्यता आहे. त्यामुळे ही निविदा प्रसिध्दी न झाल्यामुळे निधी खर्च न झाल्यास त्यास नगर परिषद जबाबदार असेल असे जिल्हाधिकारी यांनी सांगितले. निविदा उदयापर्यंत न आल्यास सदर कामे सार्वजनिक बांधकाम विभागा सारख्या इतर यंत्रणेला देणेचा निर्णय उदया घेण्यात येईल असेही जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी सांगितले.

मा. अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने सदस्य सचिव यांनी बैठक संपल्याचे जाहिर केले.

**मुळ प्रत मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**

**तुळजापूर विकास प्राधिकरण यांच्या स्वाक्षरीत**

सदस्य सचिव,
तुळजापूर विकास प्राधिकरण,
उस्मानाबाद करिता,

## श्री. क्षेत्र तुळजापूर मंदिर, मंदिर परिसर व शहर विकास कार्यक्रम
## दिनांक २४/०८/२००९ रोजी तुळजापूर विकास प्राधिकरणाच्या संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

श्री. क्षेत्र तुळजापूर मंदिर, मंदिर परिसर व शहर विकास आराखडयातील विकास कामाबाबत मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, तुळजापूर विकास प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली तुळजापूर विकास प्राधिकरणाची बैठक सोमवार दिनांक २४/०८/२००९ रोजी सायंकाळी ६.०० वा. जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद येथे संपन्न झाली. बैठकीच्या प्रारंभी जिल्हा नियोजन अधिकारी तथा सदस्य सचिव, तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, व तसेच प्राधिकरणातील सर्व सन्माननीय सदस्यांचे व उपस्थितांचे शब्द सुमनाने स्वागत केले.

रविवार दिनांक २३/०८/२००९ रोजी सक्रीट हाऊस तुळजापूर येथे संपन्न झालेल्या तातडीच्या बैठकीचे इतिवृत्त माहितीस्तव, व आवश्यक कार्यवाहीस्तव सर्व संबंधिताना पाठविण्यात आलेले आहेत. तरी सदरील बैठकीच्या इतिवृत्तास अंतिम मान्यता दयावी अशी विनंती मा. अध्यक्ष महोदयांना केली असता, सर्वानुमते प्राधिकरणाने इतिवृत्तास मान्यता दिली.

तुळजापूर शहरात यात्राकाळात १० फिरते शौचालय खरेदी करणे या कामाच्या विविध कंत्राटदाराकडुन प्राप्त झालेल्या निविदा उघडण्याबाबत चर्चा झाली. निविदा उघडयाबाबत मुख्याधिकारी यांनी असे नमुद केले की, अध्यक्ष, उपाध्यक्ष, नगर अभियंता, लेखापाल व मुख्याधिकारी यांची कमेटी असते. या कमेटी मार्फत सदरील निविदा उघडयास परवानगी दयावी अशी विनंती प्राधिकरणास केली असता, तसा अभिलेख बैठकीत सादर करावा अशा सुचना मा. अध्यक्ष महोदयांनी दिल्या. परंतु तसा अधिनियम नसल्यामुळे, नगर पालिका लेखा संहिता १९७१ मधील कलम १७० नुसार, मुख्याधिकारी, नगर अभियंता, नगर परिषद तुळजापूर यांनी निविदा पेटी उघडावी व त्याची छाननी करून, योग्य निविदा धारकाची शिफारस प्राधिकरणाकडे करावी अशा सुचना मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी संबंधिताना दिल्या व त्यास प्राधिकरणाने मान्यता दिली.

मुख्याधिकारी व नगर अभियंता, नगर परिषद तुळजापूर यांनी पाच कंत्राटदाराकडून प्राप्त झालेल्या निविदांची छाननी करून त्याचा अहवाल दरनिहाय खालील प्रमाणे बैठकीत सादर केला.

(रूपये)

| अ.क्र. | निविदा धारकाचे नाव | प्रति नग दर |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | दिव्यानी इंटरप्रायजेस, नाशिक | ५,७०,६०० |
| २ | मनियार ॲन्ड कंपनी, अहमदाबाद | ४,८७,९७३ |
| ३ | महाराष्ट्र राज्य लघु उद्योग, उस्मानाबाद | ६,४८,००० |
| ४ | निर्मीती इंजिनिअरींग कार्पोरेशन, पिंपरी चिंचवड | ६,००,००० |
| ५ | एस.एस. इंटरप्रायजेस, नाशिक | ५,४०,००० |

वरील प्रमाणे कंत्राटदाराकडून प्राप्त झालेल्या निविदांची संबंधितांनी छाननी करुन अ.क्र.२ वरील मनियार ॲन्ड कंपनी, यांची निविदा सर्वात कमी दराची असल्याने, या कंपणीची निवड करणेसाठी प्राधिकरणाकडे शिफारस केली, फिरते शौचालयाचा दर्जा हा नामाकिंत कंपनीचा असावा, या अटीवर प्राधिकरणाने सर्वानुमते मान्यता दिली. व याबाबत ठराव क्रमांक १३ मान्य करण्यात आला. फिरते शौचालयाचा पुरवठा करणे बाबत मुख्याधिकारी नगर परिषद तुळजापूर यांनी मनियार ॲन्ड कंपनी यांना तात्काळ आदेश देण्यात यावेत अशा सुचना मा. अध्यक्ष महोदयांनी दिल्या. व तसेच फिरते शौचालय प्राप्त होताच त्याचा दर्जा,

गुणवत्ता यांची सक्षम तांत्रिक प्राधिका-यामार्फत (उदा. शासकीय तंत्रनिकेतन) तपासणी करून तसा अहवाल प्राधिकरणास सादर केल्यावर प्राधिकरणामार्फत शौचालयाचा दर्जा व गुणवत्ता पाहुनच देयक अदायगी करण्यात येईल असे मा. अध्यक्ष महोदयांनी सर्वाच्या निदर्शनास आणून दिले.

निविदा सादर करणे, उघडणे, छाननी करणे इत्यादी निविदाविषयक कामे कुणी करावी याबाबत सखोल चर्चा झाली व त्यात सर्वानुमते पुढील प्रमाणे ठरले (ठराव क्रमांक १४)

१: निविदा केवळ प्राधिकरणाची परवानगी झाल्यावरच जाहीर करावी. निविदा प्रसिध्दीपूर्वी प्राधिकरणाच्या कार्यालयात संबंधित संचिका सादर करावी जेणेकरून मा. अध्यक्षांना एकत्रित नियोजनाच्या दृष्टीकोनातून त्यात उचित बदल करता येतील (उदा. विविध तारखा, इ.) तसेच मा. अध्यक्षांनी परवानगी दिल्यावरच निविदा जाहीर करावी.

२: निविदा विक्री संबंधित यंत्रणा आणि तुळजापूर विकास प्राधिकरणाचे चे कार्यालय या दोन्ही ठिकाणी होईल.

३: निविदा स्विकृती केवळ तुळजापूर विकास प्राधिकरणाच्या कार्यालयातच होईल. मात्र ज्या विभागाच्या एकापेक्षा अधिक ठिकाणी स्विकृतीचा शासनाचा आदेश आहे त्या प्रकरणात तुळजापूर विकास प्राधिकरण कार्यालयाशिवाय इतरत्र स्विकृती करता येईल.

४: निविदा उघडणे आणि छाननी करण्याचे काम त्या-त्या विभागाच्या नियमानुसार होईल.

५: वरीलप्रमाणे छाननी झाल्यावर निविदा स्विकृतीसाठी प्राधिकरणाकडे सादर करण्यात येतील.

६: प्राधिकरणाने निविदा स्विकृती केल्यावर पुढील कार्यवाही पुन्हा संबंधित यंत्रणा करेल.

अशा प्रकारे ठराव क्रमांक १४ सर्वानुमते घेण्यात आला.

नगर परिषदेने प्रस्तावित केलेल्या कामांना दिनांक ११/०८/२००९ च्या आदेशान्वये तुळजापूर विकास प्राधिकरणाने प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली असताना सुध्दा, संबंधित कामांच्या निविदा अद्याप प्रसिध्द केलेल्या नाहीत. याबाबत मागील काही दिवसापासून पाठपुराव सुध्दा केला आहे. निवडणूक आचारसंहीता कोणत्याही क्षणी लागू होण्याची शक्यता आहे. ही बाब विचारात घेऊन दिनांक २३/०८/२००९ रोजी संपन्न झालेल्या तातडीच्या बैठकीत दिनांक २४/०८/२००९ रोजीच्या राज्यस्तरीय दैनिक वृत्तपत्रात निविदा प्रसिध्दीस दयावी, निविदा प्रसिध्द न झाल्यास व मंजूर कामावरील निधी खर्च न झाल्यास याची जबाबदारी नगर परिषदेवर राहील व अशा परिस्थितीत सदरील कामे सार्वजनिक बांधकाम विभाग अथवा इतर यंत्रणाकडे वर्ग करण्यात येतील, याचा निर्णय दिनांक २४/०८/२००९ रोजीच्या बैठकीत घेण्यात येईल असे मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष महोदयांनी मुख्याधिकारी यांना सुचना दिलेल्या असताना सुध्दा, अद्याप निविदा प्रसिध्द झालेली नसल्याची बाब मा. अध्यक्ष महोदयानी बैठकीत सर्व उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिली असता मा. श्री. नरेद्र बोरगावकर यांनी असे सांगितले की मी स्वतःअध्यक्षा व इतर नगर सेवकाशी चर्चा करून याबाबतचा निर्णय दुरध्वनीद्वारे कळविण्यात येईल, अशी मा. अध्यक्ष महोदयांना विनंती केली असता, उदया दिनांक २५/०८/२००९ रोजी सकाळी १०.०० वा. मुख्याधिकारी यांनी निविदा प्रसिध्दीस दिल्याबाबत लेखी पुरावा समक्ष सादर करावा अन्यथा सदरील कामे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग उस्मानाबाद यांच्याकडे वर्ग करून त्यांच्या मार्फत निविदा प्रसिध्दीस दिल्या जातील व याची सर्वस्वी जबाबदारी नगर परिषद तुळजापूर वर निश्चित करणेबाबत ठराव क्रमांक १५ सर्वानुमते मान्य करण्यात आला.

मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने सदस्य सचिव यांनी बैठक संपल्याचे जाहीर केले.

स्थळप्रत मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष तु.वि.पा यांच्या स्वाक्षरीत

सदस्य सचिव,
तुळजापूर विकास प्राधिकरण,
उस्मानाबाद

## श्री. क्षेत्र तुळजापूर मंदिर, मंदिर परिसर व शहर विकास कार्यक्रम
## दिनांक २९/०८/२००९ रोजी तुळजापूर विकास प्राधिकरणाच्या संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

श्री. क्षेत्र तुळजापूर मंदिर, मंदिर परिसर व शहर विकास आराखडयातील विकास कामाबाबत मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, तुळजापूर विकास प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली तुळजापूर विकास प्राधिकरणाची तातडीची बैठक शनिवार दिनांक २९/०८/२००९ रोजी सायंकाळी ६.३० वा सक्रीट हाऊस, तुळजापूर येथे आयोजित करण्यात आली होती. बैठकीच्या प्रारंभी जिल्हा नियोजन अधिकारी तथा सदस्य सचिव, तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, व तसेच प्राधिकरणातील सर्व सन्माननीय सदस्यांचे व उपस्थितांचे शब्द सुमनाने स्वागत केले.

सोमवार दिनांक २४/०८/२००९ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद येथे संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्त माहितीस्तव, व आवश्यक कार्यवाहीस्तव सर्व संबंधिताना पाठविण्यात आलेले आहेत. तरी सदरील बैठकीच्या इतिवृत्तास अंतिम मान्यता दयावी अशी विनंती मा. अध्यक्ष महोदयांना केली असता, सर्वानुमते प्राधिकरणाने इतिवृत्तास मान्यता दिली.

श्री. क्षेत्र तुळजापूर मंदिर, मंदिर परिसर व शहर विकास कार्यक्रमातंर्गत, फिरते शौचालय खरेदी करण्याकरिता, कमी दराने पात्र ठरलेल्या अ.क्र.१ वरील मनियार ॲन्ड कंपनी, अहमदाबाद यांनी ५० टक्के अग्रीम मागितला असल्याची बाब, मुख्याधिकारी नगर परिषद तुळजापूर, यांनी बैठकीत निदर्शनास आणुन दिली असता, मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी अशा प्रकारे ५० टक्के अग्रीम देता येइल का ? अशी विचारणा प्रकल्प अधिकारी न.प. प्रशासन उस्मानाबाद यांना विचारणा केली असता, संचालक, नगर पालिका यांचे स्थायी आदेश आहेत. त्यानुसार नगर परिषदेच्या कामांना अग्रीम देता येत नाही अशी माहिती दिली. तदनंतर, मा, अध्यक्ष महोदयांनी अशी विचारणा केली की, या प्रकरणी मनियार ॲन्ड कंपनी, अहमदाबाद यांचे अटी व शर्ती या कार्यालयास बंधनकारक नसून, प्राधिकरणाच्या अटी या कंपनीस बंधनकारक होत्या असे असतांना संबंधितांने मराठी भाषा अवगत नसल्याचे निमित्त पुढे करून अग्रीमाची अट कायम ठेवली आहे. या प्रकरणी मनियार ॲन्ड कंपनी, अहमदाबाद यांचे नाव काळ्या यादीत टाकणे किंवा त्याच्या विरूद्ध एम डी ४ ची कार्यवाही करता येइल का  अशी विचारणा केली असता, पुरवठा दाराने भरलेल्या निविदा उघडतांना, तांत्रीक बाबींशी संबंधित अटी व शर्ती मान्य असल्याशिवाय आर्थिक बाबींचा लिफाफा (पाकिट) उघडता येत नाही. आर्थिक बाबींचा लिफाफा प्रधिकरणामार्फत उघडला गेला म्हणजेच तांत्रिक अटी व शर्ती मान्य आहेत अशी भूमीका मनियार ॲन्ड कंपनी, अहमदाबाद यांनी घेतली असल्याची बाब मा. अध्यक्ष महोदयांनी प्राधिकरणाच्या निदर्शनास आणुन दिल्या नंतर, या बैठकीसाठी उपस्थित सर्व कार्यकारी अभियंता, उप अभियंता व इतर सर्व सदस्यांनी मनियार ॲन्ड कंपनी, अहमदाबाद यांची भूमीका योग्य आहे. त्यामुळे त्यांचे विरूद्ध कोणतीच कार्यवाही न करता त्याची अनामत परत करावी व आता फिरते शौचालय खरेदी करणे करिता अ.क्र.२ वरील कमी दराने निविदा भरणा-या पुरवठादारास आदेश देणेबाबत प्राधिकरणाने निर्णय घ्यावा अशी विनंती मुख्याधिकारी न.प. तुळजापूर यांनी केली असता, याबाबत बैठकीत सखोल चर्चा होऊन अ. क्र.२ वरील एस.एस. इंटरप्रायजेस, नाशिक या पुरवठादारास तुळजापूर शहरात यात्राकाळात १० फिरते शौचालय खरेदी करणेचे आदेश देणेबाबत ठराव क्रमांक १६ सर्वानुमते मान्य करण्यात आला.

तुळजापूर शहरात विविध सात ठिकाणी स्वयंचलित वाहतूक नियंत्रक दिवे पूरवठा व उभारणी करणे. या कामाच्या अंदाजपत्रकाची छाननी करून, अंतिम अहवाल सादर करणेबाबत, उप विभागीय अभियंता,

सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.१ उस्मानाबाद यांना कळविण्यात आले असता, अंदाजपत्रकीय किंमतीच्या बेरजा न तपासता अहवाल सादर केला होता. त्यांनी दिलेल्या अहवालानुसार रू.४७.०१ लाख किंमतीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. परंतु प्रत्यक्ष अदांजपत्रके संबंधित यंत्रणास परत करताना बेरजेमध्ये रू.०.९५ लाखाची तफावत असल्याची बाब, सदस्य सचिव, तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी मा. अध्यक्ष महोदयांच्या निदर्शनास आणुन दिली असता, चुकीची बेरिज असल्याने यास सुधारीत प्रशासकीय मान्यता दयावी व सदरील कामाकरिता देखभाल दुरूस्तीसाठी असलेली पाच वर्षाची अट शिथील करून दोन वर्षाची अट ठेवणेबाबत ठराव क्रमांक.१७ सर्वानुमते मान्य करण्यात आला.

तुळजा भवानी मंदिर संस्थानाशी संबंधित कामांच्या निविदा, विक्री तुळजा भवानी मंदिर संस्थान, तुळजापूर व तुळजापूर विकास प्राधिकरण (नियोजन विभाग) जिल्हाधिकारी कार्यालय उस्मानाबाद या कार्यालयात तर निविदा स्वीकृती तुळजापूर विकास प्राधिकरण (नियोजन विभाग) जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद येथे राहील.

तुळजापूर विकास प्राधिकरणातंर्गची कामे करण्यासाठी भारतीय दुरसंचार निगम यांनाही समाविष्ट करावे अशी विनंती संबंधित उप अभियंता यांनी मा. अध्यक्ष महोदयांना केली असता, निविदा फॉर्म विकत घेऊन विहित वेळेत रितसर प्राधिकरणास सादर करावेत म्हणजे कामांचा अनुभव, गुणवत्ता ई. बाबी तपासुन याबाबत प्राधिकरणामार्फत योग्य तो निर्णय घेण्यात येईल असे मा. अध्यक्ष महोदयांनी संबधिताच्या निदर्शनास आणुन दिले व तसेच याबाबत म्हाडा, सिडकोशी संबंधित यंत्रणा इच्छुक असल्यास त्यांनीही निवीदा फार्म विकत घेउन भरावेत अशा सूचना दिल्या.

तुळजापूर शहरात जलतरण तलाव बांधणे या कामांचे दरसुचीप्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी तंज्ञ व्यक्ती नसल्याची बाब जिल्हा क्रिडा अधिकारी यांनी मा. अध्यक्ष महोदयांच्या निदर्शनास आणुन दिली. सार्वजनिक बांधकाम विभगाकडुन सुधारित दरसुची उपलब्ध करून घेवून त्याप्रमाणे सविस्तर अंदाजपत्रक तयार करावे. परंतु जलतरणाचा दैनदिंन खर्च भागविण्यासाठी काय उपाय योजना केली आहे याबाबत सविस्तर अहवाल सादर करावा अशी सुचना जिल्हा क्रिडा अधिकारी यांना केली असता, सदरील कामाच्या नावात जलतरण तलाव (घाट) असा बदल करावा आणि तुळजा भवानी मंदिरात अस्तित्वात असलेले कल्लोळ तिर्थाच्या धरतीवर त्यांचे बांधकाम करावे आणि सदरील ठिकाणी स्नानासाठी येणा-या भाविकांसाठी माफक दरात सुविधा उपलब्ध करून दिल्यास दैनदिंन खर्च भागविणे सुलभ होईल असा सल्ला मा. श्री. अप्पासाहेब माणिकराव कदम-पाटील यांनी दिला.

मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने सदस्य सचिव यांनी बैठक संपल्याचे जाहीर केले.

स्थळप्रत मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
तुळजापूर विकास प्राधिकरण यांच्या स्वाक्षरीत.

सदस्य सचिवा,
तुळजापूर विकास प्राधिकरण,
उस्मानाबाद करिता

**श्री. क्षेत्र तुळजापूर मंदिर, मंदिर परिसर व शहर विकास कार्यक्रम**

**दिनांक २७/११/२००९ रोजी तुळजापूर विकास प्राधिकरणाच्या संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.**

श्री. क्षेत्र तुळजापूर मंदिर, मंदिर परिसर व शहर विकास आराखडयातील विकास कामाबाबत मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, तुळजापूर विकास प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली तुळजापूर विकास प्राधिकरणाची बैठक, शुक्रवार दिनांक २७/११/२००९ रोजी सकाळी ११.०० वा सर्किट हाऊस, तुळजापूर येथे आयोजित करण्यात आली होती. बैठकीच्या प्रारंभी जिल्हा नियोजन अधिकारी तथा सदस्य सचिव, तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, व तसेच प्राधिकरणातील सर्व सन्माननीय सदस्यांचे व उपस्थित अधिका-यांचे शब्द सुमनाने स्वागत केले.

शनिवार दिनांक २९/०८/२००९ रोजी सर्किट हाऊस तुळजापूर येथे तातडीच्या संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्त माहितीस्तव, व आवश्यक कार्यवाहीस्तव सर्व संबंधिताना पाठविण्यात आलेले आहेत. तरी सदरील बैठकीच्या इतिवृत्तास अंतिम मान्यता दयावी अशी विनंती मा. अध्यक्ष महोदयांना केली असता, सर्वानुमते प्राधिकरणाने इतिवृत्तास मान्यता दिली.

तुळजापूर विकास प्राधिकरणातंर्गतची कामे गुणवत्ता पूर्वक व दर्जात्मक होण्यासाठी त्या-त्या क्षेत्रातील वास्तु विशारदाची नियुक्ती करणेसाठी, दिनांक ०७/०८/२००९ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत ठराव क्र.०७ सर्वानुमते मान्य करण्यात आला आहे. त्यास अनुसरून, पॅकेज क्र.१ रस्ते व फुटपाथ विकास, पॅकेज.क्र.२ इमारती बांधकाम व पॅकेज क्र.३ सुशोभिकरण करणे, असे तीन पॅकेज तयार करण्यात येवून, निविदा मागविण्यात आल्या होत्या. प्राप्त निविदांच्या तांत्रिक बाबींची छाननी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद यांच्यामार्फत करण्यात आली आहे, तांत्रीक बाबींच्या छाननीमध्ये पात्र ठरलेल्या निविदा धारकांच्या आर्थिक बाबीसाठी पात्र ठरणा-या निविदा धारकास मान्यता देण्यासाठीचा प्रस्ताव प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी लवकरच सादर करण्यात येईल. अशी माहिती सदस्य सचिव यांनी बैठकीत दिली.

तुळजापूर विकास प्राधिकरणातंर्गत आत्तापर्यंत २६ कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. व तसेच शासनाकडून आत्तापर्यंत प्राप्त झालेल्या रू.२५.०० कोटी निधीतुन कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग उस्मानाबाद यांना १४.०० कोटी, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग, उस्मानाबाद यांना १०.६० कोटी, व उप विभागीय वन अधिकारी उस्मानाबाद यांना रू.२५.०० लाख याप्रमाणे एकुण रू.२४.८५ कोटी निधी वितरीत केलेला असुन, रू.१५.०० लाख निधी या कार्यालयाकडे शिल्लक असल्याची बाब सदस्य सचिव, तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी बैठकीत सर्वांच्या निदर्शनास आणुन दिली.

मा. श्री. नरेन्द्र बोरगावकर, सदस्य तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी पॅकेजच्या संदर्भात सविस्तर मार्गदर्शन करावे अशी मागणी केली. त्यास अनुसरून श्री. नन्नवरे, उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी पॅकेज क्र.१ रस्ते व फुटपाथ यासाठी एकुण ८ फर्मच्या निविदा प्राप्त झाल्या असुन, त्यापैकी ४ फर्मच्या निविदा तांत्रिक बाबी विचारात घेता पात्र ठरल्या आहेत. आणि पॅकेज क्र.२ इमारत बांधकाम करणे यासाठी ११ फर्मच्या निविदा प्राप्त झाल्या असुन, ४ फर्मच्या निविदा तांत्रिक बाबी विचारात घेता पात्र ठरल्या आहेत. व तसेच पॅकेज क्र.३ सुशोभिकरण करणे यासाठी १२ फर्मच्या निविदा प्राप्त झाल्या असुन फक्त २ फर्मच्या निविदा तांत्रिक दृष्ट्या पात्र ठरलेल्या आहेत या निविदा किमान तीन पेक्षा कमी असल्याने या पॅकेजच्या फेर निविदा मागविणे आवश्यक असल्याची बाब प्राधिकरणाच्या निदर्शनास आणुन

दिली. सदरील कामाच्या फेर निविदा मागविण्यासाठी ठराव क्र. १८ सर्वानुमते मान्य करण्यात आला. व तसेच निविदा धारकाची निवड करणेकरिता त्यांची काम करण्याची गुणवत्ता, कामाचा पूर्व अनुभव, उपलब्ध असलेले अधिकारी / कर्मचारी, सदरील कंपनीने यापूर्वी केलेली कामे, शैक्षणीक पात्रता, यांची तपासणी करण्यात येवून तांत्रिक बाबतीत ७० गुण व आर्थिक बाबतीत ३० गुण याप्रमाणे गुणांची विभागणी करण्यात आली होती.

तांत्रिक सल्लागाराच्या नियुक्ती नंतर, प्रस्तावित कामांची अंदाजपत्रके नकाशे सल्लागार तयार करतील व त्यास तांत्रिक मान्यतेसाठी संबंधित सक्षम कार्यालयास सादर करण्यापासून कामे पूर्ण होईपर्यंत कामांची पाहणी करतील अशीही माहिती बैठकीत दिली.

तुळजापूर शहरात विविध ७ ठिकाणी स्वयंचलित वाहतुक नियंत्रक दिवे (सिग्णल) बसविणे या कामाच्या निविदा उघडणेसाठी, दिनांक २४/१०/२००९ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय उस्मानाबाद येथे बैठक संपन्न झाली. मे. बिटा इलेक्ट्रील्स औरंगाबाद यांची निविदा तांत्रिक व आर्थिकदृष्टया पात्र ठरलेली आहे. तरी संबंधितास कार्यरंभ आदेश देणेकरिता प्राधिकरणाने मान्यता दयावी, अशी विनंती कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग, उस्मानाबाद यांनी केली. स्वयंचलित वाहतुक नियंत्रक दिवे (सिग्णल) बसविणे या कामाच्या संदर्भात सविस्तर माहिती देणेबाबत, मा. श्री. नरेन्द्र बोरगावकर, मा. श्री. अप्पासाहेब माणिकराव कदम-पाटील, सदस्य, तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी सुचित केले. सदरील कामाकरिता ५ निविदा प्राप्त झाल्या असुन, त्यापैकी ४ निविदा पात्र ठरल्या होत्या. मे. बिटा इलेक्ट्रील्स औरंगाबाद यांची निविदा ३० टक्के कमी दराची असल्याने व संबंधीचा कामाचा अनुभव लक्षात घेऊन, त्यांना पात्र ठरविण्यात आले आहे. उक्त कामे करताना नामांकित कपंनीचेच दर्जात्मक साहित्य वापरून कामे करावीत. व साहित्याबाबतची माहिती सर्व सदस्यांना दयावी. आणि ही कामे करताना, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग उस्मानाबाद व मुख्याधिकारी नगर परिषद तुळजापूर यांच्याशी एकत्रित चर्चा करून, जागा निश्चित करावी व कामाचे योग्य नियोजन करावे. व तसेच घाटशिळ पायथ्याशी म्हणजेच क्रांतीसिह नाना पाटील चौक येथे स्वयंचलित वाहतुक नियंत्रक दिवे बसविण्याऐवजी, मुख्याधिकारी नगर परिषद तुळजापूर ज्या जागेची निवड करतील त्या ठिकाणी उक्त काम करावे असे सर्वानुमते मान्य करण्यात येवून, मे. बिटा इलेक्ट्रील्स औरंगाबाद यांना कामांचे कार्यारंभ आदेश देणेबाबत ठराव क्र.१९ सर्वानुमते मान्य करण्यात आला. व याची अंमलबजावनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग, उस्मानाबाद यांनी तातडीने करावी अशा सुचना जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी दिल्या.

तुळजापूर विकास प्राधिकरणातंर्गत, तुळजापूर-नळदुर्ग रस्त्याची सुधारणा करणे किमी ५०/०० ते ७४/०० रामा.१५३ रू.१६.१० कोटी किंमतीचे अंदाजपत्रक, प्रशासकीय मान्यतेकरिता अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांनी या कार्यालयास सादर केले आहे. तरी प्राधिकरणाने त्यास मान्यता दयावी अशी विनंती सदस्य सचिव यांनी बैठकीत केली असता. सदरील कामाबाबत बैठकीत सविस्तर चर्चा होऊन या कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत सर्वानुमते ठराव क्रमांक २० मान्य करण्यात आला. याकामाच्या निविदेची जाहिरात राज्यस्तरीय दैनिकात व्यापक स्वरूपात दयावी व रस्त्याच्या दर्जाबाबत ५ वर्षाची हमी संबंधित ठेकेदाराकडून घ्यावी. तोपर्यंत त्यांची सुरक्षाठेव देऊ नये. आणि सदरील कामाच्या निविदा २० जानेवारी २०१० रोजी मान्यतेसाठी प्राधिकरणास सादर कराव्यात, अशा सुचना मा. अध्यक्ष महोदयांनी उपस्थित अभियंता यांना दिल्या. सदरील कामाची माहिती देताना संबंधित अभियंता यांनी खालील प्रमाणे माहिती सादर केली, तुळजापूर-नळदुर्ग रस्ता दोन टप्प्यात असुन, पहिला टप्पा शिवाजी चौक ते हेलीपॅड

पर्यंत चार पदरी आहे. व दुसरा टप्पा हेलीपॅड ते नळदुर्ग पर्यंत परंतु नॅशनल हायवे पर्यंत तीन पदरी स्वरूपाचा आहे.

तुळजापूर-मंगरूळ-इटकळ-अक्कलकोट या रस्त्याबाबतची माहिती देणेबाबत मा. श्री. नरेंन्द्र बोरगावकर यांनी सुचना दिल्या. सदरील रस्ता हा तीन पदरी असुन, १२ मीटर रूंद आहे. पैकी १० मीटर रूंद डांबरीकरणाचा भाग आहे. व तसेच सदरील रस्त्यावर असणा-या पुलांची रूंदी वाढविणे अशा कामांचा समावेश असल्याची बाब, उपस्थित अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग उस्मानाबाद यांनी सर्वांच्या निदर्शनास आणुन दिली. तुळजापूर- नळदुर्गसाठी बाहय वळण रस्ता BOT तत्वावर करणे हे काम शासन स्तरावर प्रलंबित असल्याचीही बाब सर्वाच्या निदर्शनास आणुन दिली.

सर्कीट हाऊस ते घाटशिळ पायथा डोंगरकडा सुशोभिकरण करणे याकामाची सविस्तर माहिती बैठकीत दयावी अशा सुचना मा. श्री. नरेन्द्र बोरगावकर, व मा. श्री. अप्पासाहेब माणिकराव कदम-पाटील, सदस्य, तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी उप विभागीय वन अधिकारी, उस्मानाबाद यांना दिल्या. डोंगरकडा सुशोभिकरणातंर्गत एकुण ७००० हजार वृक्षाची लागवड करण्याचे प्रस्तावित आहे. त्यापैकी आत्तापर्यंत ३००० हजार खडडे खोदण्याचे काम झाले असुन, आणखी ४००० हजार खडडे खोदण्याचे काम प्रगतीत आहे. सदरील योजनेअंतर्गत आंबा, चिंच, जांभळ, वड, लिंब ई. प्रकारची झाडे लावण्यात येणार आहेत. सध्यस्थितीत ३००० हजार रोपे कर्नाटक राज्यातुन खरेदी करण्यात आलेली आहेत. त्यांची लागवड करण्याचे काम प्रगतीत आहे. आणि वृक्ष लागवडीसाठी खोदलेल्या खड्यांच्या दोन रांगेमध्ये डीप सिसिटीचे खोदकाम इत्यादी कामे प्रगतीत असल्याची माहिती, उप विभागीय वन अधिकारी यांनी बैठकीत दिली. डोंगरकडा सुशोभिकरण करण्याचे काम दोन टप्प्यात करावे. पहिल्या टप्प्यात फक्त ३००० वृक्षाची लागवड करावी व ४००० हजार वृक्षाचा दुसरा टप्पा जून-जुलै दरम्यान करणेबाबत बैठकीत ठरले.

तुळजापूर विकास प्राधिकरणातंर्गत तुळजापूर शहरासाठी रामदरा तलावातून नवीन पाणी पुरवठा योजना प्रस्तावित आहे. पाणी आरक्षणाचा प्रस्ताव पाटबंधारे खात्याकडे पाठविण्यात आला असता, श्रीकृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पाच्या उपसा सिंचन योजना पूर्ण करून, तलावामध्ये अतिरिक्त पाणी साठवण करण्या करिता ५ ते ७ वर्षाचा कालावधी अपेक्षित आहे. तुळजापूर शहराची पाणी पुरवठा योजना सन २०१० पर्यंत कार्यान्वित करणे अपेक्षित असल्यामुळे, पाणी आरक्षण करता येणार नाही असे पाटबंधारे विभागाने कळविले आहे. त्यामुळे बोरी धरणावरून सदरील योजना राबविणे योग्य होईल, याबाबत कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग उस्मानाबाद यांनी मार्गदर्शन करणेबाबत बैठकीत विनंती केली. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी बैठकीत असे निदर्शनास आणुन दिले की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातंर्गतची कामे विहित वेळेत पूर्ण केली जात नाहीत. प्रलंबित कामांना मुदतवाढ मागण्याचे प्रकार सर्रास चालतात. परंतु तुळजापूर विकास प्राधिकरणातंर्गतच्या कोणत्याच कामांना मुदतवाढ मिळणार नाही. कामे विहित मुदतीत पूर्ण न केल्यास (नैसर्गिक आपत्ती वगळता) ठेकेदाराचा निधी गोठवला जाईल. याची सर्वानी नोंद घ्यावी व तशी अट कार्यारंभ आदेशात नमुद करावी. अशा सुचना मा. अध्यक्ष महोदयांनी सर्व संबंधिताना देवून, याची अंमलबजावणी करण्यासाठी **ठराव क्र.२१** सर्वानुमते मान्य करण्यात आला. तुळजापूर शहरासाठीची पाणी योजना बोरी धरणावरून किंवा रामदरा तलावातुन राबवावयाची याचा निर्णय तुळजापूर विकास प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत घेण्यात येईल. या योजनेसाठी पाण्याच्या स्त्रोतावर

निर्णय झाल्यावर या योजनेचा सर्वसाधारण भाग व पाण्याच्या स्त्रोतापासुन म्हणजेच (रामदरा तलाव किंवा बोरी धरण) असे दोन टप्पे या योजनासाठी करावेत अशा सुचना मा. अध्यक्ष महोदयांनी दिल्या.

पाचुंदा विहिर ते मंगळवार पेठ पाण्याची टाकी नवीन पाईप लाईन करणे या कामाची निविदा मागविण्यात आली होती . सदरील कामाची किंमत रू १.०० कोटी एवढी आहे. परंतु २३ टक्के वाढीव किंमतीने निविदा प्राप्त झाल्या आहेत. व तसेच तुळजापूर शहरात भूयारी गटार करणे या कामाच्या निविदा प्रसिध्द केल्या असता, त्यास निविदा धारकाकडुन प्रतिसाद मिळाला नसल्याची बाब संबंधित कार्यकारी अभियंता यांनी मा अध्यक्ष महोदयांच्या निदर्शनास आणुन दिली. त्यामुळे सदरील दोन्ही कामांच्या फेर निविदा प्रसिध्दीस दयाव्यात व त्यांची जाहिरात राज्य स्तरीय दैनिकात देवून व्यापक प्रसिध्दी दयावी. व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सर्व सर्कलच्या नोटीस बोर्डावर तशी सुचना लावण्यात यावी अशा सुचना मा. अध्यक्ष महोदयांनी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, उस्मानाबाद यांना दिल्या. भूयारी गटार योजनेतंर्गत मलःशुध्दीकरण केंद्र क्र.१ व केंद्र क्र.२ साठी अनुक्रमे १६ एकर, ५ एकर जागेची आवश्यक असल्याने तसा प्रस्ताव प्राधिकरण कार्यालयास पाठविला आहे. तरी सदरील जागा उपलब्ध करून दयावी अशी विनंती कार्यकारी अभियंता केली.

या कार्यालयास वरील प्रमाणे प्राप्त झालेला प्रस्ताव पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी उप विभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय उस्मानाबाद यांच्याकडे पाठविण्यात आला आहे अशी माहिती सदस्य सचिव यांनी बैठकीत दिली.

तुळजापूर विकास प्राधिकरणास, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६५ चे कलम ४० अन्वये विशेष नियोजन प्राधिकरणाचा दर्जा मिळणेबाबतचा प्रस्ताव नगर रचनाकार उस्मानाबाद यांच्याकडुन प्राधिकरण कार्यालयास अप्राप्त असल्याने तो शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला नसल्याची बाब सदस्य सचिव यांनी मा. अध्यक्ष महोदयांच्या निदर्शनास आणुन दिली. यांचा खुलासा करणेबाबत मा. अध्यक्ष महोदयांनी नगर रचनाकार यांना सुचना दिल्या असता, तालुका निरीक्षक भूमिलेख अधिकारी यांच्याकडून, गावांचे नकाशे मागविण्यात आलेले आहेत परंतु संबंधिताकडुन प्राप्त झालेले नाहीत. त्यामुळे प्रस्ताव सादर करण्यास विलंब होत असल्याची बाब नगर रचनाकार यांनी मा. अध्यक्ष महोदयांच्या निदर्शनास आणुन दिली असता, MRTP ची Process ही नगर परिषदेच्या अधिकारात आहे. Section ४० चा अधिकार नगर परिषदेच्या हद्यीच्या बाहेर आहे. तरी प्रस्ताव तातडीने सादर करणेबाबत मा. अध्यक्ष महोदयांनी संबंधिताना सुचना दिल्या.

नगर परिषद तुळजापूरच्या वतीने, पारीत केलेल्या विविध विकास कामाच्या ठरावावर निर्णय घेतला जात नाही. व तसेच श्री. तुळजाभवानी मंदिर महाद्वारा समोरील १०० मीटर मोकळया जागेचा विषय, तुळजापूर विकास प्राधिकरणामध्ये घेतला जात नाही किंवा त्यावर कसल्याही प्रकारची चर्चा होत नाही. जोपर्यंत १०० मीटर जागेचा विषय विषयपत्रिकेवर घेतला जात नाही, तोपर्यंत नगर परिषदेच्या वतीने प्राधिकरणाच्या व तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या बैठकीवर बहिष्कार टाकण्यात येत आहे असा उल्लेख असलेले संदर्भीय पत्र व मुख्याधिकारी, नगर परिषद तुळजापूर यांचे दिनांक ०४/११/२००९ चे पत्र दिनांक २७/११/२००९ रोजीच्या तुळजापूर विकास प्राधिकरणाच्या बैठकीत खासदूतामार्फत सादर केले होते. याबाबत मा. जिल्हाधिकारी यांनी सदरील प्रकरण कोणाकडे प्रलंबित आहे. याला कोण जबाबदार आहेत अशी विचारणा करून सर्व संबंधित अधिकारी, नगर रचनाकार, प्रकल्प अधिकारी, न.प.प्रशासन व तसेच सदस्य सचिव तुळजापूर विकास प्राधिकरण यांचेकडे विचारणा केली असता, मुख्याधिकारी न.प. तुळजापूर यांनी असे सांगितले की, सदरिल

पत्रावर मुख्याधिकारी यांनी स्वाक्षरी केल्यानंतर ते निर्गमित करण्यात आलेले नसल्याची बाब मुख्याधिकारी नगर परिषद तुळजापूर यांनी बैठकीत सर्वांच्या निदर्शनास आणुन दिली. याबाबत मा. अध्यक्ष महोदयांनी दिनांक ०४/११/२००९ रोजीच्या पत्रासोबत सर्वसाधरण ठराव क्र.७३१ या कार्यालयास रितसर सादर करण्यात आला होता का? सादर केला असल्यास त्याची पोच दयावी व सादर केला नसल्यास त्याच्या खुलाशासह त्याची कारणे तातडीने सादर करणेबाबत मुख्याधिकारी, नगर परिषद तुळजापूर यांना सुचना दिल्या. नगरअध्यक्षा यांचे दिनांक २७/११/२००९ चे पत्र व त्यासोबत नगर परिषदेच्या सर्व साधारण सभेतील ठराव क्र.७३१ मधील कामे, महाद्वारा समोरील १०० मीटर मोकळया जागेचा विकास करणे, तुळजापूर प्राधिकरण बैठकीवरील व तुळजाभवानी मंदिर सस्थानच्या बैठकीवरील बहिष्कार, ईत्यादी विषयावर पुढील बैठकीत सर्व सदस्याच्या उपस्थितीत चर्चा केली जाईल किंवा दिनांक ३०/११/२००९ रोजी मा. अध्यक्षा न.प तुळजापूर व . मा. श्री. नरेन्द्र बोरगावकर, सदस्य तुळजापूर विकास प्राधिकरण यांना चर्चा करावयाची तयारी मा. जिल्हाधिकारी यांनी दर्शविली.

सर्व कार्यान्वयीन यंत्रणांनी आपल्या विभागाशी संबंधित असणा-या मुद्याचा अनुपालन अहवाल तीन दिवसात प्राधिकरण कार्यालयास सादर करावा. व तसेच वितरीत केलेल्या निधीतुन झालेल्या खर्चाचा मासिक प्रगती अहवाल या कार्यालयाने दिलेल्या विहित नमुन्यातच दरमहा ५ तारखेपर्यंत पाठविण्यात यावा, अशा सुचना सदस्य सचिव, तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी सर्व संबंधितांना देवून मा. अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने बैठक संपल्याचे जाहीर केले.

स्थळप्रत मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष तु.वि.प्रा यांच्या स्वाक्षरीत

सदस्य सचिव,<br>
तुळजापूर विकास प्राधिकरण<br>
उस्मानाबाद.

## श्री. क्षेत्र तुळजापूर मंदिर, मंदिर परिसर व शहर विकास कार्यक्रम
## दिनांक ०६/१२/२००९ रोजी, तुळजापूर विकास प्राधिकरणाच्या संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

दिनांक ०६/१२/२००९ रोजी तुळजापूर विकास प्राधिकरणातंर्गत १: सल्लागार (वास्तु विशारद) नियुक्तीबाबत चर्चा करणे. २: मुख्याधिकारी, नगर परिषद, तुळजापूर यांच्या दिनांक ०४/११/२००९ रोजीच्या पत्रावर चर्चा करणे. या दोन विषयाबाबत मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, तुळजापूर विकास प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली, तुळजापूर विकास प्राधिकरणाची बैठक, रविवार दिनांक ०६/१२/२००९ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद येथे आयोजित करण्यात आली होती. बैठकीच्या प्रारंभी जिल्हा नियोजन अधिकारी तथा सदस्य सचिव, तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, व तसेच प्राधिकरणातील सर्व सन्माननीय सदस्यांचे व उपस्थित अधिका-यांचे शब्द सुमनाने स्वागत केले.

सदरील बैठकीमध्ये प्रामुख्याने वरील दोन विषय ठेवण्यात आले होते. महाद्वारा समोरील १०० मीटर मोकळया जागेचा विकास करणे या मुद्यावर चर्चेला सुरूवात झाली असता, मा. जिल्हाधिकारी तथा अघ्यक्ष महोदयांनी मुख्याधिकारी, नगर परिषद तुळजापूर व नगर रचनाकार, उस्मानाबाद यांना अशी विचारणा केली की, महाद्वारा समोरील १०० मीटर जागेचे भूसंपादन कसे होणार. याबाबत नगर रचनाकार उस्मानाबाद यांनी असे सांगितले की, खरेदी-विक्री व्यवहारानुसार बाजारमुल्य तक्त्यावर (Ready Recknor) तयार करण्यात आलेले आहे. याच्या आधारे भूसंपादनाचा मावेजा देता येईल. परंतु सध्य:स्थितीत तुळजापूर येथील जमिनीचे दर खुप मोठया प्रमाणात वाढलेले आहेत. ही बाब विचारात घेता, सध्य:स्थितीत व्यवहारानुसार बाजारमुल्य तक्त्यापेक्षा (Ready Recknor) सव्वा पटीने जास्त मावेजा देता येईल. अशी माहिती नगर रचनाकार यांनी बैठकीत सर्वाच्या निदर्शनास आणुन दिली.

महाद्वारा समोरील १०० मीटर मोकळया जागेचा विकास करावयाचा असल्यास, जागा आणि इमारती यांच्या भूसंपादनासाठी सुमारे रू.४०.०० कोटी एवढी रक्कम आवश्यक असल्याचा मुद्या, मुख्याधिकारी, नगर परिषद, तुळजापूर व नगर रचनाकार, उस्मानाबाद यांनी बैठकीत उपस्थित केला. याबाबत मा. आ. श्री. मधुकरराव चव्हाण, तथा सदस्य, तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी असा मुद्या उपस्थितीत केला की, शासनाने पूनर्वसन आणि कामासाठी भूसंपादन यापूर्वी केलेले आहे. त्यासाठी शासनाकडून वेगळा निधी मिळतो. परंतु तुळजापूर विकास प्राधिकरणातंर्गत कामासाठी भूसंपादनाकरिता अधिक निधीची गरज भासल्यास शासनाने उपलब्ध करून दयावी. असे शासनास कळविणे योग्य राहील. परंतु सर्व निधी भूसंपादावर खर्च केल्यावर कामांसाठी निधी शिल्लक राहणार का? असाही मुद्या उपस्थितीत करून, प्राधिकरणातील सन्माननीय सदस्यांनी आपले मत स्पष्ट करावे व आजच याबाबत प्राधिरणाने निर्णय घ्यावा अशी सुचना मा. आमदार महोदयांनी केली.

महाद्वारा समोरील १०० मीटर मोकळया जागेच्या ऐवजी १०० फुट जागा विचारात घ्यावी. आणि रस्त्याची रूंदी वाढवावी. असे केल्यास रू.४.१६ कोटी इतका निधी भूसंपादनासाठी लागेल. अशी माहिती मा. श्री. नरेन्द्र बोरगावकर, सदस्य तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी दिली. याबाबत मा. श्री. अप्पासाहेब माणिकराव कदम-पाटील, सदस्य, तुळजापूर विकास प्राधिकरण यांना विचारणा केली असता, त्यांनी तटस्थ भूमिका घेतली.

उपरोक्त विषयाबाबत मा. जिल्हाधिकारी तथा, अध्यक्ष, तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी असे सांगितले की, एंकदरीत पारिस्थिती पाहता, महाद्वारा समोरील मोकळया जागेत काय विकास करणार? हे प्रथम स्पष्ट करावे. व तसेच महाद्वारा समारील १०० मीटर बाबत सर्वांनी एकमताने निर्णय घ्यावा. परंतु यास्थितीत काहीच बदल न झाल्यास सदरील जागेचा निर्णय शासनावर सोपवावा. याप्रकरणी शासनाने घेतलेला निर्णय जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष तुळजापूर यांना मान्य राहील. व तसेच सर्व सन्माननीय सदस्यांनी सुचविलेल्या नवीन कामांचा प्रस्ताव मान्यतेसाठी शासनास सादर करण्याच्या सुचना मा. अध्यक्ष महोदयांनी दिल्या.

महाद्वारा समोरील १०० मीटर जागेचा विषय मा. मुख्यमंत्री, महाराष्ट शासन, यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करून, सदरील बैठकीत या बाबत चर्चा करावी. मा. मंत्री महोदयांची मी प्रत्यक्ष भेट घेऊन, बैठकीचा दिनांक लवकरच प्राप्त करून घेईन व तसे जिल्हाधिकारी यांना कळविण्यात येईल असे मा. आ. श्री. मधुकरराव चव्हाण, तथा सदस्य तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी सांगितले. ही बाब प्राधिकरणाने एकमताने मान्य केली.

तुळजापूर विकास प्राधिकरणातील कामे गुणवत्ता पूर्वक व दर्जात्मक करण्यासाठी त्या-त्या क्षेत्रातील सल्लागार नियुक्ती करणेबाबत निविदा मागविण्यात आल्या असता, पॅकेज क्र.१ रस्ते व फुटपाथ यासाठी एकुण ८ फर्मच्या निविदा प्राप्त झाल्या असुन, त्यापैकी ४ फर्मच्या निविदा तांत्रिक बाबी विचारात घेता पात्र ठरल्या होत्या. यामधुन या कामासाठी Kashec Engineers.pvt.ltd.pune ही संस्था आर्थिक आणि तांत्रिकदृष्टया प्राप्त ठरली आहे. सदरील संस्था ही प्राधिकरणातील कामांचे अंदाजपत्रके, नकाशे, आराखडे तयार करून, कामांची बीले तयार करणे, भूसंपादनाचे प्रस्ताव तयार करणे ई. कामे करणार असुन, संपूर्ण कामासाठी एकुण ९ अधिकारी व कर्मचारी वर्ग यासाठी राबणार आहे. त्यापैकी ६ कर्मचारी हे कामे पूर्ण होईपर्यंत तुळजापूर येथे स्वखर्चाने कार्यालय स्थापन करतील. या पॅकेज अंतर्गत त्यांना १.८६ टक्के इतका मोबदला देय राहील. व तसेच पॅकेज क्र.२ इमारत बांधकाम करणे यासाठी ११ फर्मच्या निविदा प्राप्त झाल्या असुन, ४ फर्मच्या निविदा तांत्रिक बाबी विचारात घेता पात्र ठरल्या होत्या. त्यापैकी S.N.Bhobe & Associates pvt. ही संस्था तांत्रिक व आर्थिक दृष्टया पात्र ठरली आहे. या पॅकेजतंर्गत संबधितांना १.२३ टक्के मोबदला देय राहील. अशी माहिती कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग उस्मानाबाद यांनी बैठकीत दिली.

पॅकेज क्र.३ सुशोभिकरण करणे यासाठी १२ फर्मच्या निविदा प्राप्त झाल्या असुन फक्त २ फर्मच्या निविदा तांत्रिक दृष्ट्या पात्र ठरलेल्या आहेत या निविदा किमान तीन पेक्षा कमी असल्याने, या पॅकेजच्या फेर निविदा मागविणे आवश्यक असल्याने याबाबत फेर निविदा मागविण्यासाठी दिनांक २७/११/२००९ च्या बैठकीत ठराव क्र. १८ सर्वानुमते मान्य करण्यात आला असुन, या कामाच्या फेर निविदा प्रसिध्दीस देण्यात आली आहे. असे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी सांगितले.

तुळजापूर विकास प्राधिकरणातंर्गत १० फिरते शौचालय खरेदी करणेकरिता एस.एस. एंटरप्रायजेस, नाशिक यांना पुरवठा करणेसाठी दिनांक ३०/०८/२००९ च्या पत्रान्वये आदेश देण्यात आलेले आहेत. त्याची मुदत दिनांक ३०/११/२००९ रोजी संपली आहे. परंतु अद्याप त्यांनी पुरवठा केलेला नाही. व तसेच एक फिरते शौचालय तयार केले असुन त्याची पाहणी नाशिक येथे येवून करावी. व तसेच फिरते शौचालयाचा पुरवठा करण्यासाठी संबंधितानी मुदतवाढ मागितलेली असल्याची बाब मुख्याधिकारी नगर परिषद तुळजापूर यांनी बैठकीत सर्वांच्या निदर्शनास आणुन दिली. तुळजापूर विकास प्राधिकरणातंर्गच्या कोणत्याच कामांना मुदतवाढ मिळणार नाही असा ठराव क्र.२१ दिनांक २७/११/२००९ च्या बैठकीत सर्वानुमते मान्य करण्यात आला आहे. त्यास अनुसरून कार्यवाही करावी व संबंधितावर नियमानुसार दंडात्मक कार्यवाही करावी आणि फिरते शौचालयाची पाहणी करणेकरिता ते तुळजापूर किंवा उस्मानाबाद येथे उपलब्ध करून देणेबाबतची कार्यवाही तातडीने करावी अशा सुचना मा अध्यक्ष महोदयांनी मुख्याधिकारी नगर परिषद तुळजापूर यांना दिल्या.

तुळजापूर विकास प्राधिकरणातंर्गत नगर परिषदेच्या हद्यीतील कामे करताना मुख्याधिकारी व अध्यक्ष यांना विश्वासात घेवूनच कामे केली जातील. यामध्ये मुख्याधिकारी, व नगर अभियंता यांचे सर्व अधिकार अबाधित राहतील याची काळजी घेण्यात आलेली आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा कडील कामे वगळुन नगर परिषद हद्यीतील रस्ते, इमारत, सुशोभिकरण ही कामे सल्लागाराच्या मदतीने नगर परिषद करतील. याबाबत ठराव क्र. २२ सर्वानुमते मान्य करण्यात आला.

सर्व कार्यान्वयीन यंत्रणांनी आपल्या विभागाशी संबंधित असणा-या मुद्याचा अनुपालन अहवाल तीन दिवसात प्राधिकरण कार्यालयास सादर करावा. व तसेच वितरीत केलेल्या निधीतुन झालेल्या खर्चाचा मासिक प्रगती अहवाल या कार्यालयाने दिलेल्या विहित नमुन्यातच दरमहा ५ तारखेपर्यंत पाठविण्यात यावा, अशा सुचना सदस्य सचिव, तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी सर्व संबंधितांना देवून मा. अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने बैठक संपल्याचे जाहीर केले.

स्थळप्रत मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, तु.वि.प्रा. यांच्या स्वाक्षरीत

सदस्य सचिव,<br>
तुळजापूर विकास प्राधिकरण<br>
उस्मानाबाद.

## श्री. क्षेत्र तुळजापूर मंदिर, मंदिर परिसर व शहर विकास कार्यक्रम
## दिनांक २९/१२/२००९ रोजी, तुळजापूर विकास प्राधिकरणाच्या संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

तुळजापूर विकास प्राधिकरणातंर्गत १: तुळजापूर-सोलापूर रामा.२११ भाग ०१ व तुळजापूर-उस्मानाबाद रामा.२११ भाग ०२ या रस्ते विकासाच्या निविदाधारकाची निवड करणेकरिता, तुळजापूर विकास प्राधिकरणाची बैठक, मंगळवार दिनांक २९/१२/२००९ रोजी सर्कीट हाऊस उस्मानाबाद येथे आयोजित करण्यात आली होती. बैठकीच्या प्रारंभी मा.ना. श्री. मधुकरराव चव्हाण, विधानसभा उपसभापती यांचे मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. व तसेच मा. श्री. अप्पासाहेब माणीकराव कदम-पाटील, मा. श्री. नरेद्र बोरगावकर सदस्य, तुळजापूर विकास प्राधिकरण यांचे, कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प विभाग, उस्मानाबाद यांनी पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. आणि जिल्हा नियोजन अधिकारी तथा सदस्य सचिव, तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी प्राधिकरणातील सर्व सन्माननीय सदस्यांचे व उपस्थित अधिका-यांचे शब्द सुमनाने स्वागत केले.

दिनांक २७/११/२००९ व दिनांक ०६/१२/२००९ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्त माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव सर्व संबंधिताना पाठविण्यात आलेले आहेत. तरी सदरील बैठकीच्या इतिवृत्तास अंतिम मान्यता दयावी अशी विनंती मा. अध्यक्ष महोदयांना केली असता, सर्वानुमते प्राधिकरणाने दोन्ही बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता दिली.

श्री. क्षेत्र तुळजापूर मंदिर, मंदिर परिसर व शहर विकास आराखडयात समाविष्ट असलेल्या व तुळजापूर विकास प्राधिकरणाने प्रशासकीय मान्यता प्रदान केलेल्या रामा.क्र.२११ तुळजापूर-सोलापूर भाग.१ या कामाची व रामा.क्र.२११ तुळजापूर उस्मानाबाद भाग.२ या दोन कामांच्या निविदा कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प विभाग, उस्मानाबाद यांच्या मार्फत मागविण्यात आल्या होत्या. भाग क्र.१ च्या कामासाठी एकुण १६ निविदांची विक्री झाली होती. पैकी ५ मोहोरबंद निविदा प्राप्त झाल्याचे संबंधितांनी कळवून तीन कंत्राटदार पात्र ठरले होते. याकामासाठी मे अजवानी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. मुंबई यांचा देकार सर्वात कमी दराचा आढळून आला असुन, त्यांचा देकार कामाच्या अंदाजित किंमतीपेक्षा (२१,७२,२४,५८१/-) १२.२४% कमी दराचा म्हणजे रू.१९,०६,३६,२९२/- असा आहे. व तसेच कंत्राटदाराचा वर्ग.१ (अ) असुन नोदंनीची मुदत दि.०४/०३/२०१० पर्यंत ग्राहय आहे. देकाराची विधीग्राहयता १२० दिवस म्हणजे दि.२२/०३/२०१० पर्यंत असल्याची बाब विचारात घेऊन मे अजवानी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. मुंबई यांच्या निविदेची शिफारस प्राधिकरणाने केली. सदरील रस्ता हा किमी.३५/०० ते ३७/५०० आणि ३९/६३० ते ४१/२२० (घाट) चार पदरी आहे. व तसेच किमी.३७/५०० ते ३९/६८०, किमी.४१/२२० ते ४२/३६५ हा सहा पदरी असल्याची माहिती कार्यकारी अभियंता, यांनी दिली.

रामा.क्र.२११ तुळजापूर-उस्मानाबाद भाग.क्र.२ या कामासाठी एकुण १९ कंत्राटदारानी निविदा खरेदी केल्या होत्या. त्यापैकी फक्त ३ मोहोरबंद निविदा प्राप्त झाल्या होत्या. या कामासाठी श्री. एस.एम. औताडे, कंत्राटदार, सोलापूर यांचा देकार सर्वात कमी दराचा आढळून आला असुन, त्यांचा देकार कामाच्या अंदाजित किंमतीपेक्षा (३४२१३७८०/-) ४.९५% कमी दराचा म्हणजे रू.३२५२०१९८/- असा आहे. यांची नोंदणी कंत्राटदाराच्या वर्ग.१ (बी) असा असुन, नोदंनीची मुदत २८/०२/२०१० पर्यत ग्राहय आहे. देकाराची विधीग्राहयता १२० दिवस म्हणजे दि.२२/०३/२०१० पर्यंत असल्याने श्री. एस.एम. औताडे, कंत्राटदार, सोलापूर

यांच्या निविदेची शिफारस प्राधिकरणाकडे केली. हा रस्ता किमी. ४२/३६५ ते ४३/१५०, किमी.४३/१५० ते ४३/२०० सहा पदरी रस्ता असल्याची माहिती संबंधितानी दिली.

वरील प्रमाणे दोन्ही कामांसाठी निविदाधारकाची शिफारस करून त्यास अंतिम मान्यता देणेबाबत कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प विभाग, उस्मानाबाद यांनी प्राधिकरणाकडे विनंती केली. तेव्हा मा. ना. श्री. मधुकरराव चव्हाण, विधानसभा उपसभापती, मा. श्री. अप्पासाहेब माणिकराव कदम-पाटील, मा. श्री. नरेंद्र बोरगावकर, सदस्य तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी या दोन्ही कामासाठी विक्री झालेल्या निविदा व प्राप्त झालेल्या निविदा धारकाची यादी सदस्यांना उपलब्ध करून देणेबाबत संबंधित कार्यकारी अभियंता यांना सांगितले असता, यादी लवकरच उपलब्ध करून देण्यात येईल असे कार्यकारी अभियंता यांनी सांगितले. या कामासाठी ३० मीटर जागा या विभागाच्या ताब्यात असुन, यापैकी २५ मीटर जागा रस्ते विकासाठी उपयोगात आणली जाणार आहे. इतर जागा नाली, फुटपाथ, दुभाजकासाठी वापरात येणार आहे. अशी माहिती कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प विभाग यांनी दिली. या दोन्ही कामासाठीच्या निविदा धारकांची निवड अंतिम करण्यात येवून याबाबत सर्वानुमते ठराव **क्रमांक २३** प्राधिकरणाने मान्य केला.

सदरील काम करताना कोणत्याही प्रकारचे अतिक्रमन होणार नाही याची काळजी घ्यावी. रस्त्याच्या दर्जाबाबत ठेकेदाराकडून ५ वर्षाची हमी घ्यावी. तोपर्यंत त्यांची सुरक्षाठेव देऊ नये. रस्त्यासाठी जागा काठोकाठ (Full Road land width) पकडण्यात यावी आणि पावसाच्या पाण्याच्या निचरा (Storm water Drainage) होण्याची व्यवस्था करणे. रस्त्याच्या दुतर्फा वृक्षारोपन करून शहरतंर्गत पथदिवे बसविण्यात यावीत. व तसेच कोणत्याही कामासाठी मुदतवाढ मिळणार नाही. तुळजापूर-सोलापूर घाटातील काम करताना अवघड असणारे वळण कमी करण्यासाठी योग्य उपाययोजना करावी आणि रस्ता रूंदीकरण करताना योग्य काळजी घ्यावी. अशा सुचना मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प विभाग यांना दिल्या. तुळजापूर-सोलापूर-उस्मानाबाद या रस्त्यावर विविध ठिकाणी धोकादायक वळणे आहेत. त्यामुळे अपघाताचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. तरी अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी अपघाती ठिकाणा पासुन २०० मीटर किंवा ३०० मीटर सूचनांचे फलक बसविण्यात यावेत अशी विनंती जिल्हा पोलीस अधीक्षक उस्मानाबाद तथा सदस्य तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी केली असता, अशा प्रकारचे फलक बसविण्या बाबत योग्य कार्यवाही करण्यात येईल असे कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प विभाग यांनी नमुद केले.

सोलापूर-तुळजापूर-उस्मानाबाद बाहयवळण रस्त्याचे काम संथ गतीने चालु असल्याबाबत मा.ना. श्री. मधुकरराव चव्हाण, विधानसभा उपसभापती तथा सदस्य तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. व तसेच या रस्त्याच्या कामाकरिता काही खाजगी मालकीच्या जमीनी आहेत. त्यांना नोटीसा पाठविण्यात आल्या का? यांची विचारणा केली असता. याबाबत उपस्थितीत उप अभियंता यांना योग्य माहिती देता आली नाही. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग उस्मानाबाद यांच्यासह प्राधिकरणातील सदस्यासह याकामाची प्रत्यक्ष पाहणी करण्यात येईल असे मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी बैठकीत स्पष्ट केले.

तुळजापूर शहरात विविध सात ठिकाणी स्वयंचलित वाहतूक नियंत्रक दिवे बसविणे याकामासाठी मे. बिटा इलेक्ट्रिकल्स औरंगाबाद यांची सर्वात कमी दराची म्हणजेच निविदा दरापेक्षा ३०% कमी दराची असल्याने, त्यांची निविदा प्राधिकरणाने मंजूर केली होती. ही बाब विचारात घेऊन संबंधिताना सुरक्षाठेव दिनांक

२८/१२/२००९ पर्यंत जमा करणे बाबत कळविण्यात आले होते. परंतु अद्याप त्यांनी सुरक्षाठेव जमा केलेली नाही. व तसेच निविदे मधील अटी व शर्ती नुसार परिशिष्ट-ll मध्ये नमुद केलेले साहित्य न वापरता मे. बिटा इलेक्ट्रिकल्स स्वतःचे उत्पादन असणारे साहित्य वापरणार असल्याची बाब उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग उस्मानाबाद यांनी बैठकीत निदर्शनास आणुन दिली. जर निविदेतील अटी व शर्तीचे पालन संबंधीताकडुन केले जाणार नसल्याने आणि विहीत मुदतीत त्याने सुरक्षाठेव देखील भरली नाही त्यामुळे त्यांची निविदा रद्द करून, अ.क्र.२ वरील कमी दराने निविदा भरणा-या निवदाधारकास वाटाघाटासाठी बोलावून कार्यारंभ आदेश देणेबाबत प्राधिकरणाने **ठराव क्रमांक २४** सर्वानुमते मान्य करण्यात आला. मान्य केलेल्या ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी अशा सुचना मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग उस्मानाबाद यांना दिल्या.

पाचुंदा विहिर ते मंगळवार पेठ पाण्याची टाकी नवीन पाईप लाईन करणे व तसेच तुळजापूर शहरात भूयारी गटार करणे या दोन्ही कामांच्या फेर निविदा प्रसिध्दीस दयाव्यात व त्यांची जाहिरात राज्य स्तरीय दैनिकात देवून व्यापक प्रसिध्दी दयावी. व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सर्व सर्कलच्या नोटीस बोर्डावर तशी सुचना लावण्यात यावी अशा सुचना मागील बैठकीत कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग यांना दिल्या होत्या. त्याबाबत काय कार्यवाही केली. आणि भवानी रोड व तुळजापूर शहरातील नवीन वस्त्यामध्ये व जिथे जागा उपलब्ध आहे अशा ठिकाणी भूयारी गटारीची कामे तातडीने करण्यात यावी असा मुद्या मा. श्री. नरेद्र बोरगावकर, सदस्य तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी उपस्थितीत केला. परंतु संबंधित कार्यकारी अभियंता किंवा प्रतिनिधी बैठकीस उपस्थितीत नसल्यामुळे याची माहिती प्राप्त झाली नाही. बैठकीसाठी उपस्थितीत राहणेकरिता लेखी पत्राद्वारे व दिनांक २४/१२/२००९ व दिनांक २९/१२/२००९ रोजी दुरध्वनीद्वारे कळविण्यात आले होते. अशी माहिती जिल्हा नियोजन अधिकारी तथा सदस्य सचिव, यांनी सर्वाच्या निदर्शनास आणुन दिली. विना परवानगी बैठकीस अनुपस्थितीत का राहीले याचा लेखी खुलासा संबंधिताकडून मागविणेबाबत, मा. अध्यक्ष महोदयांनी व मा.ना. श्री. मधुकरराव चव्हाण, विधानसभा उपसभापती तथा सदस्य तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी सदस्य सचिव यांना सूचना दिल्या व तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण शहरासाठी पाणी पुरवठा करणे भूयारी गटाराची कामे करणे याबाबत कांहींच प्रगती केलेली नाही. या दोन्ही कामांसाठी केवळ पाईप खरेदीची प्रक्रिया पूर्ण झाल्यास जास्तीत जास्त निधी खर्च झाला असता. याकामासाठी अनेकवेळा सूचना देवून कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कामे करित नाहीत. याबाबी विचारात घेऊन, तुळजापूर शहरात भूयारी गटार करणे हे काम सल्लागाराच्या मदतीने करणे अधिक चांगले राहील. यासाठी सल्लागार नियुक्ती करणे योग्य राहील असा मुद्या मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष यांनी उपस्थितीत केला. याबाबत पुढील आवश्यक कार्यवाही कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष तुळजापूर विकास प्राधिकरण यांच्याशी चर्चा करून तातडीने करण्याबाबत सूचना दिल्या.

मा. ना. श्री. मधुकरराव चव्हाण, विधानसभा उपसभापती तथा सदस्य तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी सोलापूर घाटात असलेले प्रवेशद्वार खुपच लहान आहे. सदरील प्रवेशद्वार मोठे करून प्रवेशद्वार व घाटातील पाय-या आकर्षक कराव्यात अशा सुचना बैठकीत दिल्या. तेव्हा मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष यांनी असे सांगितले की घाटशिळ परिसरात बागबगीचा तयार करणे याकामासाठी निधी मंजूर आहे. सदरील निधीतुन घाटशिळ प्रवेशद्वार व पाय-याचे काम करता येणे शक्य आहे त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

तुळजापूर विकास प्राधिकरणातंर्गत कामांचा आढावा घेण्यासाठी मा. सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी श्री. क्षेत्र तुळजापूर शहरास भेट दयावी व तसेच योग्य मार्गदर्शन आणि सल्ला देणेसाठी विनंती करावी यासाठी लेखी पत्राद्वारे मा. सचिव यांना कळविण्यात यावे. आणि चालु वर्षाचा उर्वरित निधी तुळजापूर विकास प्राधिकरणास वितरीत करणेबाबत मा. सचिव यांना विनंती करणे आवश्यक आहे. तरी त्याप्रमाणे योग्य कार्यवाही जिल्हा नियोजन अधिकारी तथा सदस्य सचिव यांनी तातडीने करावी अशा सुचना मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष महोदयांनी दिल्या.

तुळजापूर विकास प्राधिकरणातंर्गत १० फिरते शौचालय खरेदी करणेकरिता एस.एस. एंटरप्रायजेस, नाशिक यांना पुरवठा करणेसाठी दिनांक ३०/०८/२००९ च्या पत्रान्वये आदेश देण्यात आलेले होते. त्याची मुदत दिनांक ३०/११/२००९ रोजी संपलेली असल्याने संबंधितावर दंडात्मक कार्यवाही करणेबाबत मुख्याधिकारी नगर परिषद तुळजापूर यांना कळविण्यात आले होते. परंतु दंडात्मक कार्यवाही करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष तुळजापूर विकास प्राधिकरण यांना असल्याने याबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी यांनीच करावी असे मुख्याधिकारी यांनी कळविल्याची बाब जिल्हा नियोजन अधिकारी तथा सदस्य सचिव यांनी बैठकीत सर्वाच्या निदर्शनास आणुन दिली. तुळजापूर विकास प्राधिकरणातंर्गच्या कोणत्याच कामांना मुदतवाढ मिळणार नाही असा ठराव क्र.२१ दिनांक २७/११/२००९ च्या बैठकीत सर्वानुमते मान्य करण्यात आलेला आहे. त्यामुळे प्राधिकरणातंर्गत कोणत्याच कामांना मुदतवाढ मिळणार नाही. ही बाब सर्व कार्यान्वयीन यंत्रणांनी पून्हा लक्षात ठेवावी अशा  सूचना मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी दिल्या. व याची अंमलबजावणी करण्यासाठी **ठराव क्रमांक २५** सर्वानुमते मान्य करण्यात आला. आणि मुख्याधिकारी नगर परिषद तुळजापूर यांनी दिनांक ३०/११/२००९ पर्यत प्रतिदिन रू.१०००/- व त्यापुढे प्रतिदिन रू.२०००/- याप्रमाणे एस.एस. एंटरप्रायजेस, नाशिक यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करणेबाबत **ठराव क्रमांक २६** सर्वानमते मान्य करण्यात आला. सर्व कार्यान्वयीन यंत्रणांनी आपल्या विभागाशी संबंधित असणा-या मुद्याचा अनुपालन अहवाल तीन दिवसात प्राधिकरण कार्यालयास सादर करावा. अशा सुचना सदस्य सचिव, तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी सर्व संबंधितांना देवून मा. अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने बैठक संपल्याचे जाहीर केले.

स्थळप्रत मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
तु.वि.प्रा. यांच्या स्वाक्षरीत

सदस्य सचिव,
तुळजापूर विकास प्राधिकरण,
उस्मानाबाद.

## श्री. क्षेत्र तुळजापूर मंदिर, मंदिर परिसर व शहर विकास कार्यक्रम
## दिनांक २७/०२/२०१० रोजी, तुळजापूर विकास प्राधिकरणाच्या संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

श्री. क्षेत्र तुळजापूर मंदिर, मंदिर परिसर व शहर विकास आराखडयातील विकास कामांच्या शुभारंभास मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन, हे दिनांक ०८/०३/२०१० रोंजी उपस्थित राहणार असल्याने त्यांच्या दौ-याचे नियोजन करणेकरिता, शनिवार दिनांक २७/०२/२०१० रोजी सर्कीट हाऊस तुळजापूर येथे दुपारी ३.०० वा. तुळजापूर विकास प्राधिकरणाची बैठक, आयोजित करण्यात आली होती. बैठकीच्या प्रारंभी मा.ना. श्री. मधुकरराव चव्हाण, उपाध्यक्ष, विधानसभा, महाराष्ट्र शासन यांचे मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी शब्द सुमनाने स्वागत केले. व तसेच मा. श्री. अप्पासाहेब माणीकराव कदम-पाटील, मा. श्री. नरेद्र बोरगावकर सदस्य, तुळजापूर विकास प्राधिकरण यांचे, व सर्व उपस्थितांचे जिल्हा नियोजन अधिकारी तथा सदस्य सचिव, तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी शब्द सुमनाने स्वागत केले.

दिनांक २९/१२/२००९ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्त माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव सर्व संबंधिताना पाठविण्यात आलेले आहेत. तरी सदरील बैठकीच्या इतिवृत्तास अंतिम मान्यता दयावी अशी विनंती मा. अध्यक्ष महोदयांना केली असता, सर्वानुमते प्राधिकरणाने बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता दिली.

बैठकीच्या प्रारंभी मा. मुख्यमंत्री तुळजापूर विकास प्राधिकरणातील कामांचा शुभारंभ करण्यास दिनांक ०८/०३/२०१० रोजी तुळजापूर दौ-यावर येणार आहेत. तरी त्यांच्या दौ-याचे नियोजन करण्यासाठी आजची बैठक केल्याची मा. अध्यक्ष महोदयांनी सर्वाच्या निदर्शनास आणुन दिले. मा. मुख्यमंत्री महोदयाच्या हस्ते कोण कोणत्या कामांचा शुभारंभ करावे यावी माहिती सर्व विभाग प्रमुख्यानी दयावी अशा सुचना सर्वाना दिल्या. तेव्हा मा. श्री. नरेद्र बोरगावकर सदस्य, तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी सुचित केले की, शिवाजी चौक ते उस्मानाबाद रोड या रस्त्याचे उद्घाटन करावे. कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प उस्मानाबाद यांनी असे सांगितले की, सोलापूर-तुळजापूर- धुळे भाग १ व भाग २ या दोन रस्त्याच्या कामाची निविदा अंतिम झालेली आहे. व तसेच सुरक्षा अनामत रक्कम भरण्याच्या अतिम दिनांक २५/०२/२०१० होता. परंतु संबंधित निविदाधारकानी अनामत रक्कम न भरल्याने सुरक्षा अनामत दिनांक ०५/०३/२०१० पर्यंत भरणेबाबत अनुक्रमे अजवानी इन्फ्रास्टक्चर प्रा.लि. मुंबई व श्री. एस.एम औताडे, मंगळवेडा यांना कळविण्यात आले आहे. दोन्ही रस्त्याच्या कामाची सुरक्षा अनामत दिनांक ०५/०३/२०१० पर्यंत अ.क्र.१ वरील निविदा धारकाने भरल्या नाही तर अ.क्र.२ वरील निविदाधारकाला काम देण्यात यावे. व दिनांक ०८/०३/२०१० च्या आत संबंधितांना कार्यारंभ आदेश देण्यात यावे या अटीच्या अधीन राहुन सदरील रस्त्याचे भमीपुजन मा. मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते करण्यात यावे. व कोनशिला तयार करून घेणेबाबत मा. अध्यक्ष महोदयांनी कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प विभाग उस्मानाबाद यांना सुचना दिल्या. याबाबत **ठराव क्रमांक २६** सर्वानुमते मान्य करण्यात आला. व तसेच तुळजापूर विकास प्राधिकरणातंर्गत कोणत्याच कामांना मुदतवाढ मिळणार नाही असा ठराव क्रमांक २१ दिनांक २७/११/२००९ रोजीच्या बैठकीत झालेला आहे. याची अंमलबजावणी करण्यासाठी पुन्हा दिनांक २९/१२/२००९ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत ठराव क्रमांक २५ सर्वानुमते मान्य करण्यात आला. त्याचे काटेकोर पालन करण्याच्या सुचना पुन्हा एकदा मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी सर्वच कार्यान्वयीन यंत्रणाना दिल्या.

मा. मुख्यमंत्री महोदयांच्या आगमना निमित्त कार पार्कीग घाटशिळ रोड तुळजापूर येथे पाच हजार खुर्ची, भव्य मंडप, स्पीकर, जनरेटर ई सुविधांची व्यवस्था कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग उस्मानाबाद यांनी करावी असा मुद्या मा.ना. श्री. मधुकरराव चव्हाण, उपाध्यक्ष विधानसभा तथा सदस्य तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी उपस्थित केला असता उक्त सर्व व्यवस्था कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद यांनी करावी अशा सुचना मा. अध्यक्ष महोदयांनी दिल्या. आणि स्वच्छतेची सर्व जबाबदारी मुख्याधिकारी, नगर परिषद तुळजापूर यांनी करावी अशाही सुचना मा. अध्यक्ष महोदयांनी दिल्या.

तुळजापूर विकास प्राधिकरणाची कार्यकक्षा ही फक्त प्राधिकरणाशी संबंधित असणा-या मंत्रालयीन व जिल्हास्तरीय कार्यालयाशी आहे. त्यामुळे जिल्हास्तरीय यंत्रणेच्या वरिष्ट कार्यालयाशी तुळजापूर विकास प्राधिकरणामार्फत कोणत्याही कामासाठी पाठपुरावा केला जाणार नाही. याची सर्व जबाबदारी संबंधित जिल्हास्तरीय अधिका-याची आहे. त्यामुळे आपल्या वरिष्ट कार्यालयाशी आपण स्वत: पाठपुरावा करावा याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी अशा सुचना मा. अध्यक्ष महोदयांनी दिल्या. व आजच्या बैठकीत प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी असणा-या विषयावर चर्चा करणेकरिता सदस्य सचिव, तुळजापूर विकास प्राधिकरण यांना मा. अध्यक्ष महोदयीन सांगितले.

**विषय क्रमांक ०१:- मौजे तुळजापूर येथील सर्वे नं. १५५/७ व १५५/१० क्षेत्र ०० हे.२६ आर या जमिनीस पेट्रोल पंप या वाणिज्य कारणासाठी बिनशेती परवानगी देणे.**

तुळजापूर विकास प्राधिकरणाची कार्यकक्षा ही ५ कि.मी. पर्यंत असल्याने व तसेच सदरील जागा नगर परिषदेच्या हद्यीच्या बाहेर असल्याची बाब विचारात घेऊन, नगर रचनाकार, उस्मानाबाद यांनी वरील ठिकाणी परवानगी देणेबाबत तुळजापूर विकास प्राधिकरणाची परवानगी देणबाबत या कार्यालयास विनंती केली होती. याबाबत मुख्याधिकारी नगर परिषद तुळजापूर यांच्याकडून उक्त जागेत आरक्षण प्रस्तावित आहे किंवा नाही याची विचारणा केली असता, दिनांक ३१/१२/२००९ च्या पत्रान्वये याठिकाणी कसलेही आरक्षण नाही असे या कार्यालयास कळविले आहे. जर तुळजापूर विकास प्राधिकरणाचे आक्षेप नसतील तर पेट्रोल पंप या वाणिज्य कारणासाठी बिनशेती परवानगी तुळजापूर विकास प्राधिकणाने दयावी अशी विनंती सदस्य सचिव यांनी केली.

वरील प्रमाण प्रस्ताव बैठकीत ठेवण्यात आला असता मा.ना. श्री. मधुकरराव चव्हाण, उपाध्यक्ष विधानसभा तथा सदस्य, तुळजापूर विकास प्राधिकरण, मा. श्री. नरेंद्र बोरगाव, सदस्य आणि श्री. अप्पासाहेब माणिकराव कदम-पाटील यांनी सदरील जागा (L○cation) नेमकी कोठे आहे, कोणत्या रस्त्यावर आहे याची माहिती देणेबाबत नगर रचनाकार यांना विचारणा केली. तुळजापूर-उजणी-औसा- लातुर या रस्त्यावरील पेट्रोल पंपाच्या पढे सदरील जागा असुन खाजगी मालकीची आहे अशी माहिती नगर रचनाकार यांनी दिली. सदरील रस्त्यावर तुळजापूर शहरात प्रवेश करताना प्राधिकरणातंर्गत प्रवेशद्वार करणे हे काम प्रस्तावित आहे. त्यामुळे प्रवेशद्वार ज्या ठिकाणी करावयाचे आहे त्याची जागा निश्‍चित करावी तद्‌नंतर पुढील बैठकीत सदरील विषय ठेवण्यात यावा अशा सुचना नगर रचनाकार, उस्मानाबाद व मुख्याधिकारी नगर परिषद तुळजापूर आणि कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग उस्मानाबाद यांना मा. अध्यक्ष महोदयांनी सुचना दिल्या.

**विषय क्रमांक ०२:- तुळजापूर शहरतील ३० खाटाच्या रूग्णालयाचे १०० खाटाच्या रूग्णालयात रूपांतर करणे याकामासाठी निधी वितरीत करणेबाबत.**

मराठवाडा विकास कार्यक्रम २००७ अंतर्गत वरील कामाच्या रू.२२८.६० लाख किंमतीच्या कामास महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.उपनि/२००८/४०/प्र.क्र.३७/०८/आ-४, दिनांक २५/०२/२००८ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त असुन, सदरील कामावर रू.१७१.४२ लाख निधी खर्च झालेला आहे. व तसेच रू.६०.०० लाख रक्कमेचे देयक प्रलंबति असल्याचे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग उस्मानाबाद यांनी दिनांक २५/०१/२०१० च्या पत्रान्वये या कार्यालयास कळविले आहे. आणि प्रत्यक्ष काम करतेवेळी संरचनेत बदल झालेमुळे कामाच्या परिमाणात तसेच किंमतीत वाढ झाली असल्याने सुधारित किंमत रू.३४३.७४ लाख किंमतीचें अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेसाठी सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन यांच्याकडे सादर केले आहे असे नमुद करून, तुळजापूर विकास प्राधिकरणातंर्गत रू.९०.०० लाख निधी वितरीत करावा अशी विनंती कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधाकाम विभाग यांनी केली असल्याची बाब सदस्य सचिव यांनी सर्वाच्या निदर्शनास आणुन दिली.

वरील कामास मराठवाडा विकास कार्यक्रमातंर्गत निधी प्राप्त असल्याने तुळजापूर विकास आराखडयामध्ये फक्त कामाचा समावेश करण्यात आलेला आहे. परंतु निधीची मागणी करण्यात आलेली नसल्याची बाब सदस्य सचिव यानी बैठकीत सर्वाना अवगत करून दिली. मराठवाडा विकास पॅकेल आता बंद झालेला आहे. सदरील काम पूर्ण होणे अंत्यत महत्वाचे आहे तरी या कामास तुळजापूर विकास प्राधिकरणातंर्गत निधी उपलब्ध करून देण्यास हरकत नसावी असा मुद्या मा. ना. श्री. मधुकरराव चव्हाण, उपाध्यक्ष विधानसभा, महाराष्ट्र शासन, तथा सदस्य तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी उपस्थित केला. सदरील काम करणेकरिता यापूवी कधी कार्यारंभ आदेश दिले होते त्याची मुदत किती कालावधीची होती. पुन्हा सुधारित कार्यारंभ कधी देण्यात आले आणि त्याची मुदत काय आहे याची माहिती देणेबाबत मा. अध्यक्ष तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी उपस्थितीत उप अभियंता, श्री. काळे यांना केली असता याबाबत अचुक माहिती संबंधितांना देता आली नाही. मा. अध्यक्ष महोदयांनी असे निदर्शनास आणुन दिले की, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर येथे दिनांक १७/०२/२०१० रोजी जिल्हा वार्षिक योजना सन २०१०-११ राज्य स्तर बैठकीत स्टेटपुल/राज्य योजनेतुन ग्रामीण रूग्णालयासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल असे सांगितले आहे. याबाबत जिल्हा शल्य चिकित्सक व कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी मा. पालकमंत्री, उस्मानाबाद जिल्हा यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा करावी व सदरील निधी प्राप्त करण्यासाठीचा, प्रस्ताव मंत्रालयीन प्रशासकीय विभागास पाठवुन निधी उपलब्ध करून घेणेबाबत आवश्यक कार्यवाही करावी. जर स्टेटपुल मधुन निधी प्राप्त झाला नाही तर तुळजापूर विकास प्राधिकरणामधुन निधी उपलब्ध करून दिला जाईल अशा सुचना मा. अध्यक्ष महोदयांनी दिल्या.

**विषय क्रमांक ०३:-** तुळजापूर शहरात यात्राकाळात राज्य परिवहन महामंडळाच्या बस पार्कींग करणेकरिता प्राधिकरणाने सरकारी जागा उपलब्ध करून देणे व अस्तित्वातील बस स्थानकाचे सुशोभिकरण करणेसाठी रू.२५०.०० लाख निधी उपलब्ध करून देणेबाबत विभाग नियंत्रक, रा.प. उस्मानाबाद यांनी या कार्यालयास विनंती केल्याचा मुद्या सदस्य सचिव यांनी बैठकीत उपस्थित केला. मा. अध्यक्ष महोदयांनी असे सांगितले मंजूर आराखडयातील कामाशिवाय कोणतेही कामे या योजनेत करू नये. विभाग नियंत्रक, रा.प. उस्मानाबाद यांनी प्रस्तावित केलेली कामे नवीन परंतु अंत्यत महत्वाची आहेत. याचा सविस्तर प्रस्ताव शासनास पाठविण्यात येईल असा निर्णय बैठकीत घेण्यात आला.

**विषय क्रमांक ०४:-तुळजापूर विकास प्राधिकरण अंतर्गत अपसिंगा - तुळजापूर रस्ता ५ कि.मी. रूंदीकरण करणे.**

संरपंच व ग्रामस्थ, अपसिंगा ता. तुळजापूर यांनी तुळजापूर विकास प्राधिकरणातंर्गत तुळजापूर-अपसिंगा रस्ता ५ किंमी रूंदीकरण करणेकरिता, या कार्यालयाकडे विनंती केल्याचा मुद्या सदस्य सचिव यांनी बैठकीत चर्चेसाठी मांडला असता, मा. ना. श्री. मधुकराव चव्हाण, उपाध्यक्ष विधानसभा तथा सदस्य तुळजापूर विकास प्राधिकरण, मा. श्री. अप्पासाहेब माणिकराव कदम-पाटील व मा. श्री. नरेंद्र बोरगावकर सदस्य, तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी हा रस्ता विकसीत करणे आवश्यक आहे कारण उस्मानाबाद-तुळजापूर साठी हा पर्यायी रस्ता आहेत शिवाय तो पालकी मार्ग आहे. त्यामुळे तुळजापूर-अपसिंगा रस्ता ५ कि.मी रूंदीकरण करावे अशी विनंती मा. अध्यक्ष महोदयाना केली असता सदरील कामास शासनाची मान्यता घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल अशी माहिती मा. अध्यक्ष महोदयांनी दिली.

**विषय क्रमांक ०५:-** तुळजापूर आराखडयात मंजूर असलेले तुळजापूर-उजणी-औसा-लातुर रस्त्याची सुधारणा करणे (तीन पदरी) किमी.४१७/०० ते ४४४/०० प्ररामा-३ रू.१३५०.०० लाख या कामाचे अंदाजपत्रक, प्रशासकीय मान्यतेसाठी अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग उस्मानाबाद यांनी या कार्यालयास सादर केल्याची बाब सदस्य सचिव यानी बैठकीत निदर्शनास आणुन दिली. सदरील रस्ता हा बांधा वापरा व हस्तातंर करा (BOT) या तत्वावर बांधण्यात आलेला आहे. व त्याची करवसुली खाजगी कंत्राटदारामार्फत चालु आहे. त्यामुळे याकामासाठी होणा-या खर्चाचा खाजगी कंत्राटदाराचा वाटासुध्दा घेणे आवश्यक आहे. किंवा याकामामध्ये प्राधिकरणाचा व खाजगी कंत्राटदाराचा समान वाटा पाहिजे आणि त्याचा करवसुलीचा कालावधी कमी करणे याबाबतची सविस्तर माहिती पुढील तुळजापूर विकास प्राधिकरणाच्या बैठकीत दयावी अशा सुचना मा. अध्यक्ष महोदयांनी दिल्या.

तुळजापूर-उजणी-औसा-लातुर रोड रस्ता करणे व तुळजापूर- नळदुर्ग रस्ता करणे ही दोन्ही कामे बांधा-वापरा व हस्तातंरित करा (BOT) तत्वावर झालेली आहेत. व तसेच याची करवसुलीही खाजगी कंत्राटदारामार्फत चालु आहे. त्यामुळे या कामाकरिता खाजगी कंत्राटराचा वाटा सुध्दा याकामात घेणे आवश्यक आहे. आणि सदरील दोन्ही रस्ते फक्त ५ कि.मी पर्यंतच करावेत असा मुद्या मा. ना. श्री. मधुकरराव चव्हाण, उपाध्यक्ष विधानसभा तथा तुळजापूर विकास प्राधिकरण, आणि मा. श्री. नरेंद्र बोरगावकर, सदस्य, तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी उपस्थित केला. याकामाबाबत बैठकीत सविस्तर चर्चेअंती असा निर्णय घेण्यात आला की, संबंधित कंत्राटदाराचा कालावधी कमी करावा किंवा सदरील रस्त्याच्या कामात प्राधिकरणाची आणि कंत्राटदाराची गुंतवणुक असावी याबाबत **ठराव क्रमांक २७** सर्वानुमते मान्या करण्यात आला. याबाबत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद यांनी पुढील बैठकीत सविस्तर अहवाल सादर करावा

**विषय क्रमांक ०६:-** तुळजापूर येथे पोलीस अधिकारी व कर्मचा-यासाठी निवासस्थान बांधणे (प्रकार २ व ३) रू.४२५.०० लाख या प्रशासकीय मान्यता प्रदान केलेल्या कामाच्या निविदा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, उस्मानाबाद यांच्या मार्फत मागविण्यात आल्या होत्या. मे. यशश्री कन्स्ट्रक्शन उस्मानाबाद यांची निविदा सर्वात कमी दराची म्हणजे १५% असल्याने व कंत्राटदाराचा वर्ग २ मध्ये असुन नोंदणीची मुदत दिनांक २६/०२/२०१२ पर्यंत ग्राहय आहे. निविदा धारकाची अंतिम निवड करण्याचे अधिकार तुळजापूर विकास प्राधिकरणास असल्याने संबंधिताच्या नावाची शिफारस मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग औरंगाबाद यांनी या कार्यालयाकडे केली आहे. तरी त्यास मान्यता दयावी अशी विनंती उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद यांनी प्राधिकरणास केली. सदरील कामास प्रशासकीय मान्यता कधी प्रदान करण्यात आली, कामाच्या निविदा कधी मागविण्यात आल्या, निविदा विक्री व स्वीकृती तुळजापूर विकास प्राधिकरण कार्यालयात का ठेवण्यात आली नाही याची माहिती देणेबाबत सुचित केले असता याबाबत उपस्थित उप अभियंता यांना अचुक माहिती सांगता आली नाही. अपूरी माहिती सादर केल्यामुळे या कामाचा प्रस्ताव पुढील तुळजापूर विकास प्राधिकरणाच्या बैठकीत ठेवणेबाबत मा. अध्यक्ष महोदयांनी संबंधितांना सुचना दिल्या.

**विषय क्रमांक ०७:-** तुळजापूर शहर भुयारी गटार योजना राबविणे या कामाची मुळ आराखडयातील मंजूर किंमत रू. २००१.०० लाख किंमतीपेक्षा वाढीव रू.२७०१.७८ लाख किंमतीच्या अंदाजपत्रकास दिनांक ११/०८/२००९ च्या आदेशान्वये प्राधिकरणाने प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. परंतु मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, औरंगाबाद यांनी दिनांक ०९/१२/२००९ रोजी तुळजापूर शहरास भेट देवून योजनेची पाहणी केली व योजनेमध्ये दुरूस्ती केली आहे. त्यानुसार मलशुध्दीकरण केंद्राची जागा उपलब्ध करून दिल्यानंतर पुन्हा सर्वेक्षण करण्यात आले आहे. त्यामुळे या कामाची आता रू. ३१८९.८६ लाख इतकी किंमत झाली आहे. तरी यास सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करावी. आणि तुळजापूर शहरात पाणी पुरवठा योजना राबविणे या कामाचे भाग क्र.१ चे रू.२७८१.९० लाख किंमतीचे अंदाजपत्रक तयार केले आहे. तरी तुळजापूर विकास प्राधिकरणाने यास प्रशासकीय मान्यता प्रदान करावी अशी विनंती कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, उस्मानाबाद यांनी केली असता दोन्ही कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यासाठी **ठराव क्रमांक २८** सर्वानुमते मान्य करण्यात आला.

पाचुंदा विहिर ते मंगळवार पेठ पाण्याची टाकी नवीन पाईपलाईन करणे या प्रशासकीय मान्यता प्रदान केलेल्या कामाच्या निविदा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग उस्मानाबाद यांच्या मार्फत मागविण्यात आल्या होत्या. या कामासाठी जादा दराने निविदा प्राप्त झालेली असल्याने दिनांक २७/११/२००९ रोजी संपन्न झालेल्या तुळजापूर विकास प्राधिकरणाच्या बैठकीत फेर निविदा मागविण्याबाबत संबधित अभियंता सुचना दिल्या होत्या. फेर निविदा काढण्याची प्रक्रिया चालु असुन निविदा काढुन निविदा स्वीकृतीसाठी लागणारा कालावधी, निविदा जास्तीच्या दराने प्राप्त होण्याची शक्यता व कामाची किंमत कमी असल्याची बाब विचारात घेऊन, सदरील काम सुशिक्षीत बेरोजगार अभियंता यांचे मार्फत अंदाजपत्रकीय दराने करून घेणे योग्य वाटते असे कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग उस्मानाबाद यांनी सांगितले. व तसेच तुळजापूर शहरासाठी मोठी पाणी पुरवठा राबविण्यात येणार आहे. व तसेच पांचुदा विहिरीमध्ये उन्हाळयाच्या दिवसात पाणी साठा नसतो त्यामुळे या कामावरील खर्च अनावश्यक होणार आहे. अशी माहिती कार्यकारी अभियंता यांनी दिली असता याबाबत पुढील बैठकीत चर्चा करून अंतिम निर्णय घेण्यात येईल असे मा. अध्यक्ष महोदयांनी सांगितले.

तुळजापूर शहरात भुयारी गटार योजना राबविणे व नगर परिषद तुळजापूर करिता पांचुदा विहिर ते मंगळवार पेठ पाण्याची टाकी नवीन पाईप लाईन करणे या दोन कामासाठी रू.१०६०.०० लाख वितरीत केलेला निधी मार्च २०१० पर्यंत खर्च होणार नाही तरी प्राधिकरणाकडे समर्पित करावा किंवा कसे याबाबत मार्गदर्शन करावे अशी विनंती कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग उस्मानाबाद यांनी केली. याबाबत पुढील बैठकीत निर्णय घेण्यात येईल असे मा. अध्यक्ष महोदयांनी सांगितले.

यंत्रणानिहाय कामांचा आढावा घेत असताना तुळजापूर शहरात यात्राकाळात १० फिरते शौचालय खरेदी करणे यासाठी श्री.एस.एस.एंटरप्रायझेस, नाशिक यांना कार्यारंभ आदेश देण्यात आले असता त्यांनी तपासणी साठी फिरते शौचालयाचा पुरवठा केला आहे. व तसेच याची तपासणी करण्यासाठी प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, उस्मानाबाद यांना विनंती करण्यात आली असुन अद्याप त्यानी तपासणी अहवाल सादर केला नसल्याची बाब मुख्याधिकारी, नगर परिषद तुळजापूर यांनी मा. अध्यक्ष महोदयांच्या निदर्शनास आणुन दिली. याबाबत सदस्य सचिव यांनी अशी माहिती दिली की श्री.एस.एस. एंटरप्रायझेस, नाशिक यांनी विहित मुदतीत फिरते शौचालयाचा पुरवठा न केल्यामुळे मुख्याधिकारी नगर परिषद तुळजापूर यांच्या विनंती वरून, दिनांक ३०/११/२००९ ते दिनांक ३१/१२/२००९ पर्यंत प्रतिदिन रू.१०००/- याप्रमाणे व त्यापुढे म्हणजेच फिरते शौचालय पूर्णपणे पुरवठा होईपर्यंत प्रतिदिन रू.२०००/- या प्रमाणे दंडात्मक कार्यवाहीचा प्रस्ताव दिनांक १६/०१/२०१० च्या पत्रान्वये पाठविण्यात आला आहे.

वरील मुद्याच्या अनुषंगाने फिरते शौचालय तपासणी अहवाल मुख्याधिकरी नगर परिषद तुळजापूर यांनी प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन यांचा किंवा कोणत्याही सक्षम तांत्रिक यंत्रणेचा तपासणी अहवाल तातडीने मागवून घ्यावा व तसेच जर विहित मुदतीत शौचालयाचा पुरवठा श्री.एस.एस.एंटरप्रायझेस, नाशिक यांनी केला नाही तर त्यांच्याकडून फरकाची रक्कम वसुल करण्यात येवून अ.क्र.३ वरील निविदा धारकास पुरवठा करणे करिता तातडीने कार्यारंभ आदेश देण्यात यावे व आधीच्या कंत्राटदारावर कायदेशीर कार्यवाही करावी अशा सुचना मुख्याधिकारी नगर परिषद तुळजापूर यांना मा. अध्यक्ष महोदयांनी दिल्या.याबाबत **ठराव क्रमांक २९** सर्वानुमते मान्य करण्यात आला.

तुळजापूर शहरात येणा-या प्रमुख रस्त्यावर व शहरअंतर्गत प्रवेशद्वारे बसविणे काम समाविष्ट आहे. परंतु संदरील प्रवेशद्वारे हे आकर्षक / पुरातन कालीन वाटावेत अशा दर्जाचेच होणे गरजेचे आहे. परंतु याकामाची किंमत १००.०० लाख ते १५०.०० लाखापर्यंत वाढण्याची शक्यता आहे. तरी काही प्रवेशद्वाराची संख्या कमी करावी असा मुद्या मा. अध्यक्ष महोदयांनी बैठकीत उपस्थित केला. प्रवेशद्वार महत्वाच्या ठिकाणीच असावीत अनावश्यक जागेत प्रस्तावित केलेली असल्यास याबाबत मुख्याधिकारी नगर परिषद यांनी कोणती प्रवेशद्वारे कमी करावीत याची माहिती पुढील बैठकीत सादर करावी असे सर्वानुमते ठरले. आणि ज्या ठिकाणी प्रवेशद्वार आहेत त्या ठिकाणी रस्ता जास्तीचा रूंद करावा अशाही सुचना मा. अध्यक्ष महोदयांनी दिल्या.

तुळजापूर शहरात विविध सात ठिकाणी स्वंयचलित वाहतुक नियंत्रक दिवे बसविणे या कामाचा आढावा घेत असताना उपस्थित अभियंता यांनी असे सांगितले की, सदरील कामाचे कार्यारंभ आदेश देण्यात आलेले असुन दिनांक ०२/०३/२०१० पासुन काम चालु होत आहे व दिनांक २५/०३/२०१० पर्यत कामपूर्ण होईल अशी माहिती दिली.

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपणी मार्फत तुळजापूर शहरात विविध कामे प्रस्तावित आहेत. या कामास विलंब होणार नाही यांची दक्षता घ्यावी अशा सुचना कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपणी तुळजापूर यांना मा. अध्यक्ष महोदयानी दिल्या.

तुळजापूर-मंगरूळ-अक्कलकोट रस्ता तयार करणे याकामाबाबत चर्चा चालु असताना उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग उस्मानाबाद यांनी असे सांगितले की, सदरील रस्त्याचे काम प्रगतीत असुन सदरील रस्ता तीन पदरी आहे. या कामाचा Bar Chart पुढील बैठकीत सादर करण्याच्या सुचना मा. अध्यक्ष महोदयांनी संबंधित अंभियंतास दिल्या.

तुळजापूर विकास आराखडयात मंजूर असलेले बार्शी-तुळजापूर रस्त्याची सुधारणा करणे रामा-१५३ कि.मी. ४२/४०० ते ४८/८०० रू.३५०.०० लाख या प्रशासकीय मान्यता प्रदान केलेल्या कामाची निविदा मागविण्यात आली होती. निविदा धारकाची अंतिम निवड करण्याचे अधिकार तुळजापूर विकास प्राधिकरणास असल्याने त्यास मान्यता दयावी अशी विनंती उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद यांनी केली. या कामाच्या किती निविदा विक्री झाल्या त्यापैकी किती पात्र ठरल्या आणी निविदा विक्री व स्वीकृती तुळजापूर विकास प्राधिकरण कार्यालयात ठेवणबाबत दिनांक ०७/०८/२००९ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत ठराव क्रमांक ११ सर्वानुमते मान्य करण्यात आलेला असताना, निविदा विक्री व स्वीकृती प्राधिकरण कार्यालयात का ठेवण्यात आली नाही. याची माहिती देण्यास सांगितले असता संबंधित उप अभियंतास परिपूर्ण माहिती देता आली नाही. अपूर्ण माहिती दिल्यामुळे सदरील प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी नामंजूर केला व पुढील बैठकीत परिपूर्ण माहितीसह प्रस्ताव ठेवण्यात यावा अशाही सुचना दिल्या.

तुळजापूर विकास प्राधिकरण बैठकीत आयत्या वेळच्या विषयात मा. अध्यक्ष महोदयांच्या परवानगीनेच विषय ठेवण्यात यावेत आणि याची माहिती सर्व सन्माननीय सदस्यांना देण्यात यावी. बैठक चालु असताना कोणतेही विषय चर्चेसाठी ठेवण्यात येवू नये अशा सुचना मा. ना. श्री. मधुकरराव चव्हाण, उपाध्यक्ष विधानसभा, मा. ना. श्री. अप्पासाहेब माणिकराव कदम-पाटील, मा. श्री. नरेंद्र बोरगावकर, सदस्य तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी सर्व संबंधितांना दिल्या.

तुळजापूर विकास प्राधिकरणाची पुढील बैठक गुरूवार दिनांक ११/०३/२०१० रोजी सकाळी ११.०० वा सर्कीट हाऊस, शिंगोली उस्मानाबाद येथे होईल याची सर्वांनी नोंद घ्यावी याबाबत बैठकीची लेखी अथवा दुरध्वनीद्वारे सुचना दिली जाणार नाही.

वरील प्रमाणे मा. अध्यक्ष महोदयांनी सुचना दिल्यानंतर सदस्य सचिव, तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी सर्व उपस्थितांचे आभार माणुन मा. अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने बैठक संपल्याचे जाहिर केले.

स्थळप्रत मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
तु.वि.प्रा. यांच्या स्वाक्षरीत.

सदस्य सचिव,
तुळजापूर विकास प्राधिकरण,
उस्मानाबाद.

**श्री. क्षेत्र तुळजापूर मंदिर, मंदिर परिसर व शहर विकास कार्यक्रम**
**दिनांक ११/०३/२०१० रोजी, तुळजापूर विकास प्राधिकरणाच्या संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.**

श्री. क्षेत्र तुळजापूर मंदिर, मंदिर परिसर व शहर विकास आराखडयातील विकास कामांचा आढावा घेणे संदर्भात गुरूवार दिनांक ११/०३/२०१० रोजी, सर्कीट हाऊस शिंगोली, उस्मानाबाद येथे सकाळी ११.०० वा. तुळजापूर विकास प्राधिकरणाची बैठक, आयोजित करण्यात आली होती. बैठकीच्या प्रारंभी मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, तुळजापूर विकास प्राधिकरण, मा. श्री. अप्पासाहेब माणीकराव कदम-पाटील, मा. श्री. नरेद्र बोरगावकर सदस्य, तुळजापूर विकास प्राधिकरण यांचे, व सर्व उपस्थितांचे जिल्हा नियोजन अधिकारी तथा सदस्य सचिव, तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी शब्द सुमनाने स्वागत केले.

तुळजापूर शहराचा विकास हा एकात्मिक रित्या नियोजनबध्द, गुणवत्तापूर्वक, दर्जात्मक, वैशिष्टपूर्ण, आकर्षक व विहीत मुदतीत पूर्ण होणे आवश्यक असल्याची बाब विचारात घेऊन, तुळजापूर विकास आराखडयातील कामांची अनुक्रमे १) रस्ते व फुटपाथ विकास करणे २) इमारती बांधकाम करणे ३) सुशोभिकरणाची कामे करणे. अशा तीन पॅकेजमध्ये विभागणी करण्यात आली होती. दर आणि कामाचा दर्जा / पूर्वानुभव / उपलब्ध मनुष्यबळ इत्यादी सर्व निकषांचा विचार करून निवड करण्याच्या दृष्टीने सार्वजनिक बांधकाम विभागाला निविदा कागदपत्रे तयार करण्याचे सूचित केले होते. दिनांक ०५/१०/२००९ व १५/१२/२००९ च्या निविदापूर्व बैठकीमध्ये त्यात काही बदल केले गेले. दरम्यान करीत असलेल्या कार्यवाहीबाबत शासनास या कार्यालयाचे पत्र.क्र.२००९/तु.वि.प्रा/का-५/सल्लागार नियु/०९-१०/सीआर-२३, दिनांक ०३/०१/२०१० द्वारे अवगत करण्यात आले. इच्छुक सल्लागारांच्या निविदा मागविण्यात आल्या होत्या. सल्लागारांच्या तांत्रिक प्रस्तावाची छाननी पूर्ण करुन तांत्रिक प्रस्तावात १०० पैकी ७५ पेक्षा अधिक गुण प्राप्त करणा-या सल्लागारांचे आर्थिक बोलीस ३०% Weightage व तांत्रिक प्रस्तावास ७०% Weightage देऊन सर्वाधिक गुण प्राप्त करणा-या सल्लागाराच्या आर्थिक बोली मध्ये सर्वात कमी बोली सादर करणा-या सल्लागारास सर्वाधिक गुण हया पध्दतीने गुण देण्यात येवून तांत्रिक गुण व आर्थिक गुण यांच्या एकत्रित सर्वाधीक गुण असलेल्या सल्लागारांची खालील प्रमाणे निवड करण्यात येवून त्यास शासनाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात असता, त्यास नगर विकास विभाग, पत्र. क्र. तिक्षेवि/बैठक-२०१०/मूमंस ०१/प्र.क्र.१८/नवि-१६ दिनांक १०/०३/२०१० अन्वये मान्यता दिलेली आहे. तरी यास तुळजापूर विकास प्राधिकरणाने अंतिम मान्यता प्रदान करावी असा मुद्या सदस्य सचिव यांनी बैठकीत मांडला.

| अ.क्र | पॅकेज | सल्लागार |
|---|---|---|
| १ | रस्ते व फुटपाथ विकास करणे | Kashek Engineering Private Ltd. Pune |
| २ | इमारती बांधकाम करणे | S.N. Bhobe & Associate Mumbai |
| ३ | सुशोभिकरणाची कामे करणे. | Saraha Consultant Nasik |

वरील प्रमाणे तीन सल्लागाराच्या नियुक्त्या करणेसाठी तुळजापूर विकास प्राधिकरणाने सर्वानुमते मान्यता प्रदान केली. याबाबत **ठराव क्रमांक ३०** मान्य करण्यात आला.

मौजे तुळजापूर येथील सर्वे नं. १५५/७ व १५५/१० क्षेत्र ०० हे.२६ आर या जमिनीस पेट्रोल पंप या वाणिज्य कारणासाठी बिनशेती परवानगी देणेविषयी बैठकीत चर्चा झाली. तुळजापूर विकास प्राधिकरणाची कार्यकक्षा ही ५ कि.मी. पर्यंत आहे. सदरील जागा तुळजापूर-उजणी-औसा- लातुर रस्त्यावर बस स्थानकापासुन एक ते दीड कि.मी. अंतरावर नगर परिषदेच्या हद्यीच्या बाहेर आहे. अशी माहिती नगर रचनाकार उस्मानाबाद यांनी दिली. सदरील

रस्त्यावर दोन कि.मी अंतरावर प्रवेशद्वार करण्याचे प्रस्तावित आहे. त्यामुळे सदरील जागा प्रवेशद्वारा जवळ येते किंवा कसे याची मुख्याधिकारी नगर परिषद तुळजापूर व कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद यांनी पाहणी करून, दिनांक १५/०३/२०१० रोजी अहवाल सादर करणेबाबत मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी सुचना दिल्या. अहवाल प्राप्त होताच पुढील बैठकीत यास नाहरकत देता येईल अशाही सुचना मा. अध्यक्ष महोदयांनी दिल्या.

तुळजापूर विकास आराखडयात मंजूर असलेल्या विकास कामांच्या किंमतीत आणि भूसंपादन किंमतीत वाढ झालेली असल्यास ती विहित प्रपत्रात भरून दिनांक ०६/०३/२०१० पर्यंत प्राधिकरणास उपलब्ध करून देणेबाबत सर्व संबंधिताना कळविण्यात आले असता, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, उस्मानाबाद, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपणी, तुळजापूर, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग, उस्मानाबाद, उप विभागीय वन अधिकारी, उस्मानाबाद, तुळजा भवानी मंदिर संस्थान, तुळजापूर यांच्याकडून माहिती अप्राप्त असल्याची बाब सदस्य सचिव यांनी मा. अध्यक्ष महोदयांच्या निदर्शनास आणुन दिली. सर्व कार्यान्वयीन यंत्रनाकडून वाढ झालेल्या किंमतीची माहिती प्राप्त झाल्याशिवाय किती रक्कमेची वाढ होणार आहे हे स्पष्ट होणार नाही. व तसेच कोणती कामे वगळावयाची व कोणती कामे प्राथम्याने करावयाची याबाबत चर्चा करणे आवश्यक आहे. तरी सदरील माहिती दिनांक ११/०३/२०१० रोजी सांयकाळी ६.०० वा. पर्यंत तातडीने सादर करण्याच्या सुचना सर्व संबंधिताना मा. अध्यक्ष महोदयांनी दिल्या.

तुळजापूर येथे पोलीस अधिकारी व कर्मचा-यासाठी निवासस्थान बांधणे (प्रकार २ व ३) रू.४२५.०० लाख व बाहेरून बंदोबस्तासाठी येणा-या पोलीस अधिका-यांना थाबंण्यासाठी नियोजित विश्रांती गृहाचे बांधकाम करणे रू.१३०.१८ लाख किंमतीच्या दोन कामांना दिनांक ११/०८/२००९ च्या आदेशान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केली होती. सदर कामाची तांत्रिक मान्यता दिनांक २५/०८/२००९ रोजीची असताना निविदा दिनांक १३/०७/२००९ च्या पत्रान्वये कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी प्रसिध्द केली आहे. असे करता येते काय ?. याबाबत विचारणा केली असता, असे करणे गैर नाही असे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद यांनी सांगितले. मात्र प्राधिकरणातंर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान केलेल्या कामांच्या निविदा विक्री संबधित कार्यालय व तुळजापूर विकास प्राधिकरण कार्यालयात तर निविदा स्वीकृती तुळजापूर विकास प्राधिकरण कार्यालयात होईल याबाबत दिनांक ०७/०८/२००९ रोजीच्या बैठकीत ठराव क्रमांक ११ व दिनांक २४/०८/२००९ रोजीच्या बे्ठकीत ठराव क्रमांक १४ सर्वानुमते मान्य करण्यात आलेला असताना याची अंमलबजावणी न झाल्याबाबत कारण विचारले असता, त्याबद्यल कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद यांनी दिलगिरी व्यक्त केली. व यापुढे काळजी घेण्याचे आश्वासन देऊन निवेदेला मान्यता देण्याची विनंती केली. तथापी सांगोपांग चर्चा होऊन शेवटी प्राधिकरणाच्या ठरावानुसार सर्व यंत्रणांनी काम करणे आवश्यक असल्याने, तुळजापूर येथे पोलीस अधिकारी व कर्मचा-यासाठी निवासस्थान बांधणे व बाहेरून बंदोबस्तासाठी येणा-या पोलीस अधिका-यांना थाबंण्यासाठी नियोजित विश्रांती गृहाचे बांधकाम करणे या दोन्ही कामासाठी फेर निविदा मागविण्याचे **ठराव क्र.३१** द्वारे ठरविण्यात आले.

तुळजापूर विकास आराखडयात मंजूर असलेले बार्शी-तुळजापूर रस्त्याची सुधारणा करणे रामा-१५३ कि.मी. ४२/४०० ते ४८/८०० रू.३५०.०० लाख या प्रशासकीय मान्यता प्रदान केलेल्या कामाची निविदा सार्वजनिक बांधकाम विभागा मार्फत मागविण्यात आली होती. मे. रेडडी कन्स्ट्रक्शन, लातुर यांची निविदा सर्वात कमी दराची म्हणजे १० % असल्याने व कंत्राटदाराचा वर्ग १(अ) मध्ये असुन नोंदणीची मुदत दिनांक २/११/२०११ पर्यंत ग्राहय आहे. निविदा धारकाची अंतिम निवड करण्याचे अधिकार तुळजापूर विकास प्राधिकरणास असल्याने त्यास मान्यता देणेबाबत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी प्राधिकरणास विनंती केली. कार्यकारी अभियंता

यांनी दिनांक ०७/०८/२००९ रोजीच्या बैठकीतील ठराव क्रमांक ११ व दिनांक २४/०८/२००९ रोजीच्या बे्ठकीतील ठराव क्रमांक १४ चे पालन केलेले नसल्याची बाब मा. अध्यक्ष महोदयांनी प्राधिकरणाच्या निदर्शनास आणुन दिली. या कामाबाबत बैठकीत सांगोपांग चर्चा करण्यात येवून प्राधिकरणातील सर्व संदस्यांच्या मान्यतेने सदरील कामाची फेर निविदा प्रसिध्द करण्याबाबत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद यांना मा. अध्यक्ष महोदयांनी सुचना दिल्या व याबाबत **ठराव क्र.३२** सर्वानुमते मान्य करण्यात आला.

पाचुंदा विहिर ते मंगळवार पेठ पाण्याची टाकी नवीन पाईपलाईन करणे या कामाची वरिष्ट भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण, उस्मानाबाद यांच्या मार्फत अस्तित्वातील उद्‌भवाची पाहणी करून, दिनांक १५/०३/२०१० रोजी त्यांचा अभिप्राय सादर करण्याच्या सुचना कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना मा. अध्यक्ष महोदयांनी दिल्या.

तुळजापूर विकास प्राधिकरण कार्यालयाचे कार्यालयीन कामकाज करण्यासाठी श्री. प्रदिप प्रभाकर कुलकर्णी, कनिष्ट सहाय्यक, लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांची अंशकालीक तत्वावर सेवा अधिग्रहित करण्यात आलेली होती. परंतु सदरील कर्मचारी प्राधिकरण कार्यालयात उपस्थितीत राहत नाही. व तसेच दुरध्वनी केला असता उर्मट बोलतो व भ्रमणध्वनी द्वारे संदेश पाठविल्यास त्याचे अनुपालन करित नाही. अशी माहिती सदस्य सचिव यांनी मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, तुळजापूर विकास प्राधिकरण यांच्या निदर्शनास आणुन दिली. यापढे आठवडयातील पहिले चार दिवस प्राधिकरण कार्यालयात काम करणे बंधनकारक राहील. गैरहजर राहिल्यास अथवा कामचुकारपणा केल्यास विभागीय चौकशीचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्याकडे पाठविण्यात येईल अशी सुस्पष्ट ताकीद मा. अध्यक्ष महोदयांनी संबंधितास दिली.

मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०४/०१/२०१० रोजी तुळजापूर विकास प्राधिकरणाच्या विकास आराखडया संदर्भात संपन्न झालेल्या बैठकीत, श्री. बाळासाहेब भाऊराव डोंगरे यांना तुळजापूर विकास प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये निमंत्रीत सदस्य म्हणुन उपस्थित राहणेबाबत मा. मुख्यमंत्री महोदयांनी निर्देश दिले होते. परंतु सदरील निर्णय कोणत्या कारणाने इतिवृत्तात घेण्यात आला नाही. याचा अर्थबोध होत नाही. व तसेच नगर परिषदे मार्फत भवानी मंदिर समोर ५० मीटर इतके अर्धवर्तुळाकार खुले क्षेत्र ठेवणे बाबतचा ठराव घेऊन विकास आराखडयात दर्शविण्यात आला आहे. सदर आराखडा मंजूरीसाठी महाराष्ट्र शासनाकडे दिनांक २४/०२/२०१० रोजी सादर केला आहे. परंतु प्राधिकरणाच्या कोणत्याही बैठकीत लेखी पत्र वारंवार देऊन सुध्दा यावर चर्चा होत नाही. हा विषय हेतुपूरस्सर टाळला जातो. सदरील दोन्ही विषय प्राधिकरणाच्या बैठकीत चर्चेला घेतला जात नाही तो पर्यंत माझा तुळजापूर विकास प्राधिकरणाच्या बैठकीवर बहिष्कार राहील असे सौ. भारती गवळी, अध्यक्षा, नगर परिषद तुळजापूर यांनी दिनांक ११/०३/२०१० रोजीच्या पत्रान्वये कळविले असल्याची बाब मा. अध्यक्ष महोदयांनी प्राधिकरणाच्या निदर्शणास आणुन दिली.

भवानी मंदिर समोर ५० मीटर इतके अर्धवर्तुळाकार खुले क्षेत्र ठेवणे या विषयावर चर्चा होत असताना मा. अध्यक्ष महोदयांनी मा. श्री. नरेंद्र बोरगावकर, व मा. श्री. अप्पासाहेब पाटील, सदस्य, तुळजापूर विकास प्राधिकरण यांना याबाबत अभिप्राय देणेबाबत विनंती केली. मा. श्री. अप्पासाहेब पाटील, यांनी असे सांगितले की, सदरील काम तुळजापूर विकास प्राधिकरण आराखडयाच्या बाहेरचे असुन त्यास शासनाची मान्यता नसताना हा विषय प्राधिकरणात का समाविष्ट करण्यात आला आहे याचा अर्थबोध होत नाही. याकामासाठी माझा ठाम विरोध आहे असे सांगितले. मा. श्री. नरेंद्र बोरगावकर यांनी असे सांगितले की, सदरील विषय गंभीर स्वरूपाचा आहे त्यामुळे मा. ना. श्री. मधुकरराव चव्हाण, उपाध्यक्ष विधानसभा, महाराष्ट्र राज्य यांच्या उपस्थितीत या विषयावर चर्चा करावी असे सुचित केले.

वरील दोन्ही विषयाच्या संदर्भात मा. अध्यक्ष महोदयांनी असे सांगितले की, मा. मुख्यमंत्री महोदयाच्या बैठकीचे इतिवृत्त हे या कार्यालया मार्फत तयार केलेले नसुन शासनाच्या नगर विकास विभागाने तयार केले आहेत.

शासनाने इतिवृत्तात समावेश केला नाही यास जिल्हाधिकारी कार्यालय जबाबदार नाही. व तसेच नगर परिषद अध्यक्षाना सदस्य सचिव यांनी दुरध्वनी केला असता त्यास प्रतिसाद देत नाहीत. त्याच प्रमाणे नगर पालीकेची T.P. Scheme तयार करण्याबाबत M-R T.P कायदयानुसार प्राधीकरणाला काहीएक अधिकार नाहीत. त्यामुळे या विषयावर निर्णय घेण्याचा अधिकार प्राधीकरणाला नसुन या प्रक्रियेत केवळ नगरपालीका, संचालक, नगररचना आणि शासन यांचा सहभाग आहे. त्याचप्रमाणे मा. नगराध्यक्षांनी यापूर्वीही दिनांक २७/११/२००९ रोजीच्या पत्राप्रमाणे बहिष्कार टाकून त्यात त्यांनी दिनांक ०७/०७/२००९ रोजी दिलेल्या पत्राचा संदर्भ होता. मात्र त्यांचे दिनांक ०४/११/२००९ चे पत्र नगरपालकेने तुळजापूर विकास प्राधिकरणाच्या कार्यालयात आणुनच दिले नव्हते. ही बाब मा. जिल्हाधिकारी यांनी प्राधीकरणाच्या निदर्शनास आणून दिली. तसेच याविषयी अंतिम निर्णय शासनाचा राहील असे देखील चर्चेत ठरले होते ही बाब देखील जिल्हाधिकारी यांनी सांगितले व यापुढे सर्वांनी समन्वयाने व सहकार्याने काम करण्याबाबत विनंती केली.

यात्रा काळात तुळजापूर शहरात फिरते शौचालयाचा पुरवठा करणेबाबत दिनांक २७/०२/२०१० रोजी संपन्न झालेल्या बैठकीतील ठराव क्रमांक २९ बाबत काय कार्यवाही केली असे मा. अध्यक्ष महोदयांनी मुख्याधिकारी नगर परिषद तुळजापूर यांना विचारणा केली असता, त्यांनी अशी माहिती दिली की, फिरते शौचालयाचा पुरवठा विलंबाने होत आहे व त्याचा दर्जा निकृष्ट असल्याचा अहवाल प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन यांनी कळविला आहे. याबाबत मा. अध्यक्ष महोदयांनी मुख्याधिकारी नगर परिषद, तुळजापूर अशा सुचना दिल्या की, फिरत्या शौचालयाचा निकृष्ट दर्जा व विलंबाने पुरवठा केल्याची बाब विचारात घेऊन, अ.क्र.३ वरील कंत्राटदारास पुरवठा आदेश देण्यात यावे. व तसेच अ.क्र.२ वरील पुरवठा धारकाकडून निविदेच्या फरकाची रक्कम वसुल करून घ्यावी व कठोर कायदेशीर कार्यवाही नगर पालीकेने करावी असा **ठराव क्रमांक ३३** सर्वानुमते मान्य करण्यात आला.

वरील प्रमाणे मा. अध्यक्ष महोदयांनी सुचना दिल्यानंतर सदस्य सचिव, तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी सर्व उपस्थितांचे आभार माणुन मा. अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने बैठक संपल्याचे जाहिर केले.

स्थळप्रत मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
तु.वि.प्रा. यांच्या स्वाक्षरीत

सदस्य सचिव,
तुळजापूर विकास प्राधिकरण,
उस्मानाबाद.